रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८९ ▌अंक १६९ ▌पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## ‘माहे’ युद्धनौका नौदलाच्या ताफ्यात

**मुंबई :** मुंबईतील नेव्हल डॉकयार्डमध्ये पाणबुडीविरोधी युद्धनौका ‘माहे’चं सोमवारी (दि. २४) अनावरण करण्यात आलं असून, भारतीय नौदलात ती युद्धनौका सामील झाली. पश्चिम नौदल कमांडचे फ्लॅग ऑफिसर कमांडिंग इन चीफ व्हाइस ॲडमिरल कृष्णा स्वामिनाथन यांच्या उपस्थितीत लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ पार पडला. ‘माहे’ युद्धनौकेत समुद्रातील खोलवर लपलेल्या पाणबुड्या शोधून नष्ट करण्याची क्षमता आहे. कोचीन शिपयार्डमध्ये बांधलेली स्वदेशी बनावटीची ती पाणबुडीविरोधी युद्धनौका आहे. या प्रकल्पांतर्गत एकूण आठ युद्धनौका तयार करण्यात येणार आहेत.

रायगड, मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹


## बैलगाडी शर्यतींना नव्या नियमांची वेसण

**मुंबई :** अखिल भारतीय बैलगाडा शर्यत संघटनेच्या वरिष्ठ समितीकडून बैलगाडा शर्यतींच्या शिस्तीमध्ये आणि प्राण्यांच्या सुरक्षिततेमध्ये अधिक काटेकोरपणा आणण्यासाठी नवीन नियमावली जाहीर करण्यात आली आहे. नव्या नियमांनुसार बैलगाडा शर्यत सुरू होण्यापूर्वीपासून संपूर्ण शर्यतीदरम्यान कोणत्याही समर्थक किंवा गाडामालकाच्या हातात चाबूक, काठी किंवा अशाच प्रकारचे कोणत्याही वस्तू आढळल्यास कठोर कारवाई केली जाणार आहे. नुकताच असा प्रकार ठाणे जिल्ह्यात बैलगाडा संघटनेच्या निदर्शनास आला होता. त्यामुळे अखिल भारतीय बैलगाडा संघटनेने कठोर नियमावली जारी केली आहे.






# अलविदा धरमपाजी!



**। मुंबई । प्रतिनिधी ।** ज्येष्ठ बॉलिवूड अभिनेते धर्मेंद्र यांचे सोमवारी (दि. २४) जुहू येथील राहत्या घरी निधन झालं. वयाच्या ८९ वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. कित्येक दिवसांपासून त्यांच्यावर राहत्या घरी उपचार सुरू होते. अखेर उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. ‘ही-मॅन’, शोलेतला ‘वीरु’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धर्मेंद्र यांच्या निधनानं देशभरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिवावर विलेपार्ले येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. धर्मेंद्र यांचा थोरला लेक सनी देओलनं मुखाग्री दिला आणि तब्बल सहा दशकं सिनेसृष्टीवर राज्य करणारा बॉलिवूडचा ही-मॅन अनंतात विलीन झाला.

**ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र पंचत्वात विलीन**



### 65 वर्षांची कारकीर्द

१९६० मध्ये ‘दिल भी तेरा हम भी तेरे’ या चित्रपटातून धर्मेंद्र यांनी अभिनय कारकीर्दीला सुरुवात केली. त्यानंतर १९६१ मध्ये आलेल्या ‘बॉयफ्रेंड’ या चित्रपटात ते सहाय्यक अभिनेत्याच्या भूमिकेत दिसले. धर्मेंद्र ६५ वर्षे अभिनयात सक्रिय राहिले. त्यांनी असंख्य हिट, सुपरहिट आणि ब्लॉकबस्टर चित्रपट दिले. त्यांनी शोले (१९७५), चुपके चुपके (१९७५), सीता और गीता (१९७२), धरमवीर (१९७७), फूल और पत्थर (१९६६), जुगनू (१९७३) आणि यादों की बारात (१९७३) यांसारख्या सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केलं.

### वैयक्तिक आयुष्य

धर्मेंद्र यांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल बोलायचं झाल्यास त्यांनी दोन लग्न केली आहेत. त्यांचे पहिले लग्न प्रकाश कौर यांच्याशी झालं. त्यांच्यापासून त्यांना चार अपत्य आहेत. सनी देओल, बॉबी देओल, विजेता देओल आणि अजिता देओल अशी त्यांची नावं आहेत. यानंतर दुसरं लग्न अभिनेत्री हेमा मालिनी यांच्याशी झालं. धर्मेंद्र आणि हेमा मालिनी या ईशा देओल आणि अहाना देओल या दोन मुली आहेत.

### शेवटचा चित्रपट

धर्मेंद्र ८९ व्या वर्षीही काम करत होते. त्यांच्या निधनानंतर, त्यांचा शेवटचा चित्रपट या वर्षी प्रदर्शित होणार आहे. धर्मेंद्र यांनी ‘२१’ या चित्रपटात भूमिका साकारली आहे. या चित्रपटात ते अगस्त्य नंदाच्या वडिलांची भूमिका साकारणार आहेत. हा चित्रपट २५ डिसेंबर २०२५ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होईल.

## वेधक

### अनंत गर्जेला अटक

**मुंबई :** राज्याच्या पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांच्या पीए अनंत गर्जे यांना त्यांच्या पत्नीच्या आत्महत्येच्या प्रकरणात वरळी पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी रात्री १ वाजता त्याला ताब्यात घेतले. सोमवारी सकाळी ११ वाजता गर्जेला कोर्टात हजर करण्यात येत आहे. त्याच्यासह इतह दोघांवरही गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अनंत गर्जेची पत्नी डॉक्टर गौरी पालवे-गर्जे या राहत्या घरात मृतावस्थेत आढळून आल्या. त्यांनी शनिवारी आत्महत्या केल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र त्यांच्या माहेरच्या लोकांनी ही आत्महत्या नसून हत्या असल्याचा दावा केला. मुंबईतील वरळी येथील राहत्या घरी गळफास घेतला होता.

### चिमुकलीवर अत्याचार

**बीड :** मालेगावच्या डोंगराळे येथील घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला असून, सर्वत्र संतापाची भावना आहे. ३ वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करून तिची निर्दयीपणे हत्या केल्याची घटना ताजी असतानाच आता बीडमध्ये एका साडेपाच वर्षीय चिमुरडीवर लैंगिक अत्याचार झाला आहे. विशेष म्हणजे, नात्यातीलच मुलाने अत्याचार केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. तर, धक्कादायक बाब म्हणजे गावातील लोकांनी गुन्हा दाखल न होण्यासाठी मुलीच्या आईवर दबाव आणल्याचे देखील प्राथमिक तपासात समोर आलं आहे. पीडित मुलीवर बीडच्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

### धनंजय मुंडे नीच माणूस : जरांगे

**जालना :** परळीमध्ये आयोजित एका प्रचारसभेमध्ये धनंजय मुंडे यांनी वाल्मिक कराडची आठवण काढली आहे. दरम्यान, मुंडे यांच्या या वक्तव्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी त्यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. धनंजय मुंडे असे काही बोलले असतील तर त्यांच्यासारखा नीच माणूस नाही, संतोष देशमुख यांची क्रूर हत्या करून त्याला उणीव भासत असेल तर त्या धनंजय मुंडे इतका नीच माणूस या पृथ्वीतलावर असूच शकत नाही. तो मित्र असो किंवा सोयरा असो, जर त्याने वाईट कृत्य केले असेल, तर त्याचं समर्थन कधीच करू नये. अजित पवार यांचे आता तरी डोळे उघडले पाहिजे, असे मनोज जरांगेंनी म्हटले आहे.

# मिनीबस दरीत कोसळली

**२२ जखमी प्रवाशांपैकी दहाजण गंभीर । कळंबणी उपजिल्हा रुग्णालयात उपचार**

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर रायगड जिल्ह्यातील पोलादपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भोगाव बुद्रुकनजीक सोमवार, दि. २४ नोव्हेंबर रोजी पहाटेसाडेचारवाजण्याच्यासुमारास भीषण अपघात झाला. स्वारगेट-पुणे ते दापोलीपर्यंत जाणारी खासगी मिनीबस महामार्गावरील पुलाच्या अलीकडे रिफ्लेक्टर नसलेल्या लोखंडी संरक्षक कठड्यांना धडक देत लोखंडी कठड्यांसह अंदाजे ४५ ते ५० फूट खोल दरीत कोसळली. या अपघातात २२ प्रवासी जखमी झाले असून, त्यातील दहा प्रवाशांची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे.

गेल्या काही दिवसांपासून पोलादपूर ते खेडदरम्यानच्या भुयारी मार्गाकडे जाणाऱ्या महामार्गाचे



काम सुरू असल्याने मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील एक लेन बंद ठेवण्यात आली आहे. पहाटे धुके असल्याने रिफ्लेक्टर नसलेले लोखंडी संरक्षक कठडे चालक सूरज गागनाथ अलकुंटे (२५, रा. कात्रज, पुणे, मूळ रा. अलकुंटे, जि. सोलापूर) याच्या नजरेस न पडल्याने या लोखंडी संरक्षक कठड्यांना श्रीसाई ट्रॅव्हल्सची मिनीबस (एमएच १२ वायबी २८३५)ची धडक बसताच लोखंडी कठडेदेखील काँक्रिटने जमिनीत ठासले नसल्याने लोखंडी कठड्यांसह मिनीबस थेट दरीकडे कोसळली. यावेळी बसमधील प्रवाशांच्या किंचाळण्यासह बसच्या धडकेमुळे लोखंडी कठड्यांचा कर्णकर्कश्य आवाज झाल्याने स्थानिक नागरिकांनी तात्काळ अपघातस्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले आणि मिनीबसमधील जखमींना महामार्गावर आणले. पोलादपूर पोलीस व महामार्ग सुरक्षा पथकानेही घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य सुरू करीत जखमींना खेड-कळंबणी येथील रत्नागिरी उपजिल्हा रूग्णालयामध्ये दाखल केले.

खेड तालुक्यातील कळंबणी उपजिल्हा रुग्णालयात शामल विजय आंजर्लेकर (४०, रा. गिम्हवणे, दापोली), काजल मारुती शिगवण (२३, रा. दमामे, दापोली), दिलीप शिवराम मोहिते (५५, रा. तळसर, चिपळूण), अमरनाथ मिलिंद कांबळे (२७, किल्लारी, रा. लातूर), दिपाली दत्ताराम काचरे (२७, रा. भडवणे, दापोली), प्रतिक •> पान २ वर

#### संरक्षक कठडे कमकुवत

पहाटेच्या सुमारास अपघातस्थळी वाहतूक कोंडी झाल्याने महामार्ग पोलिसांनी वाहतूक सुरळीत करण्यासाठी विशेष पथके तैनात केली. महामार्गाचे काम सुरू असताना रिफ्लेक्टर नसलेल्या आणि विनाकाँक्रिट कमकुवत लोखंडी संरक्षक कठड्यांमुळे अपघात झाला.

#### चालकावर गुन्हा दाखल

एका शिक्षिकेने या अपघाताची माहिती पोलिसांना दिली. त्यानंतर पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान, मिनीबस चालक सूरज गागनाथ अलकुंटे याच्याविरूद्ध पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या अपघाताबाबत अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## दिवेआगर-भरडखोल मार्गावरील पूल रखडला



**। दिघी । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यातील शेखाडी मार्गावरील दिवेआगर गावाजवळ नव्याने होत असलेल्या पुलाच्या कामाला दिरंगाई झाल्याने संताप व्यक्त केला जात आहे. पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असणारा पूल लवकरच सुरळीत करून वाहतुकीसाठी सुरू करावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

बोर्लीपंचतनहून श्रीवर्धनकडे जाणारा हा मार्ग समुद्रकिनाऱ्यालगत जोडला आहे. या सतरा किलोमीटर अंतरातील मार्गावर मुंबईतील नरिमन पॉईंटची अनुभवती येते. त्यामुळे हा मार्ग पर्यटनाच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण ठरत आहे. मात्र, याच मार्गावरील पूल निधीअभावी •> पान २ वर

- **पावसाळा संपला तरी कामाला दिरंगाई**
- **तात्पुरता मार्गावरील प्रवाशांची दगदग संपणार कधी?**

> **पूल बांधकामातील पाण्याचा अडथळा कमी होत आहे. पिलर्सचे काम आता सुरू करणार असून, डिसेंबरपर्यंत पूल पूर्ण होईल.**
> – **अक्षय महाजन,** अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभाग

## यंत्रणा लागली कामाला

**निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील दहा नगरपरिषदांच्या निवडणुकीचे मतदान दोन डिसेंबरला होणार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली आहेत. मतदानापासून मतमोजणीसाठी लागणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे. त्यामुळे ही यंत्रणा निवडणुकीसाठी सज्ज असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. सुमारे दोन हजारांहून अधिक कर्मचारी या निवडणुकीच्या कामासाठी लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

जिल्ह्यातील अलिबाग, खोपोली, श्रीवर्धन, मुरूड-जंजिरा, रोहा, महाड, पेण, उरण, कर्जत, माथेरान या नगरपरिषदांमध्ये नगराध्यक्षपदासाठी ३४ आणि नगरसेवकपदासाठी ५९५ असे एकूण ६२९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. या नगरपरिषदांच्या हद्दीत १०७ प्रभाग आहेत. नगराध्यक्षपदाच्या दहा आणि नगरसेवकपदाच्या २१७ जागांसाठी ही निवडणूक होणार आहे. खोपोलीमध्ये नगराध्यक्षपदासाठी सात व नगरसेवकपदासाठी ११८, अलिबागमध्ये नगराध्यक्षपदासाठी दोन व नगरसेवक पदासाठी ४२, श्रीवर्धनमध्ये नगराध्यक्षपदासाठी चार आणि नगरसेवक पदासाठी ६०, मुरूडमध्ये नगराध्यक्षपदासाठी तीन व नगरसेवक पदासाठी ५८, रोहामध्ये नगराध्यक्षपदासाठी दोन व नगरसेवकपदासाठी ५१, महाडमध्ये नगराध्यक्षपदासाठी पाच व नगरसेवक पदासाठी ५३, पेणमध्ये नगराध्यक्ष पदासाठी तीन व नगरसेवक पदासाठी ७२, उरणमध्ये नगराध्यक्षपदासाठी चार आणि नगरसेवक पदासाठी ४९, कर्जतमध्ये नगराध्यक्षपदासाठी दोन आणि नगरसेवक पदासाठी ४६, माथेरानमध्ये नगराध्यक्षपदासाठी दोन व नगरसेवक पदासाठी ४६ उमेदवार आहेत.

गेल्या काही दिवसांपासून प्रचार सुरु असून, तो आता अंतिम टप्प्यात आला आहे. ३० नोव्हेंबरला रात्री बारा वाजेपर्यंत प्रचाराची मुदत आहे. त्यामुळे प्रचारासाठी अवघे •> पान २ वर

## १५ नक्षलींचे आत्मसमर्पण

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले आहे. १५ कुख्यात नक्षलवाद्यांनी सोमवारी सुरक्षा दलांसमोर शरणागती पत्करली. यापैकी ९ जणांवर एकूण ४८ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर होते. आत्मसमर्पण करणाऱ्यांमध्ये पाच महिला नक्षलवाद्यांचाही समावेश आहे. सुकमाचे पोलीस अधीक्षक किरण चव्हाण यांनी दिलेल्या माहितीनुसार, या नक्षलवाद्यांनी पोलीस आणि सीआरपीएफच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर नियंत्रण केंद्रात आत्मसमर्पण केले. शरणागती पत्करणाऱ्यांमध्ये बटालियन क्रमांक १ मधील चार हार्डकोर नक्षलवादी आहेत. प्रत्येकावर ८ लाख रुपये बक्षीस जाहीर होते.

## प्रभाग सातमध्ये प्रचाराचा जल्लोष

**ॲड. मानसी म्हात्रे, अभय म्हामुणकर यांचे मतदारांकडून स्वागत**



● (छायाचित्र : समीर मालोदे)

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीचा प्रचार महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून करण्यात आला आहे. प्रभाग सातमधील नगरसेवकपदाचे उमेदवार ॲड. मानसी म्हात्रे आणि अभय म्हामुणकर यांचा प्रचार सोमवारी सायंकाळी मारुती नाकासह वेगवेगळ्या परिसरात करण्यात आला. घरोघरी जाऊन मतदान करण्याचे आवाहन उमेदवारांनी केले. यावेळी उत्स्फूर्त प्रतिसाद मतदारांकडून मिळत असल्याचे चित्र दिसून आले. यावेळी प्रचाराचा जल्लोष पाहावयास मिळाला.

थेट नगराध्यक्षपदासाठी अक्षया प्रशांत नाईक, नगरसेवकपदासाठी प्रभाग एकमधून संतोष मधुकर गुरव, संध्या शैलेश पालवणकर. •> पान २ वर

## न्यायमूर्ती सूर्यकांत नवे सरन्यायाधीश

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी ।**

न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी ५३ वे सरन्यायाधीश म्हणून सोमवारी (दि. २४) शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात न्यायमूर्ती सूर्यकांत यांना सरन्यायाधीश म्हणून शपथ दिली. सरन्यायाधीश भूषण गवई हे २३ नोव्हेंबर रोजी निवृत्त झाले. त्यांच्या जागेवर सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती सूर्यकांत हे कामकाज पाहतील.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी जम्मू काश्मीरमधील कलम ३७० हटवणं, जम्मू काश्मीरचा विशेष दर्जा रद्द करणं, बिहार मतदार यादी प्रकरण तसेच पेगासस स्पायवेअर



प्रकरण आदी ऐतिहासिक निकाल दिले आहेत. न्यायमूर्ती सूर्यकांत यांची ३० ऑक्टोबरला पुढील सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. न्यायमूर्ती सूर्यकांत हे १५ महिने या पदावर राहतील. ९ फेब्रुवारी २०२७ रोजी वयाच्या ६५ व्या वर्षी ते निवृत्त होतील. राष्ट्रपती भवनात झालेल्या या सोहळ्याला उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रमुख उपस्थिती होती.

**सहा महिन्यांपूर्वी बांधलेले शौचालय, बसथांबा तोडणार | लाखो रुपयांचा खर्च जाणार वाया**

# पालिकेकडून जनतेचा पैसा खड्ड्यात?

**दिपक घरत**

**। पनवेल ।**

सायन-पनवेल मार्गावरील कळंबोलीसर्कलच्याविस्तारीकरणाचे काम सध्या सुरु आहे. या कामामुळे या ठिकाणी पालिकेच्या माध्यमातून सुरु करण्यात आलेले सार्वजनिक शौचालय आणि आधुनिक बस थांबा बाधित होण्याची शक्यता आहे. लाखो रुपये खर्च करून अवघ्या सहा महिन्यांपूर्वी बांधण्यात आलेले शौचालय आणि बसथांबा तोडावा लागणार आहे. मात्र, याची पालिकेला कल्पना नव्हती का? आणि होती तर जनतेच्या पैशांची अशी उधळपट्टी प्रशासनाकडून का करण्यात आली, असा सवाल



शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर यांनी उपस्थित केला आहे.

शिव-पनवेल महामार्गावरील कळंबोली सर्कलच्या विस्तारीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. याकरिता या ठिकाणी उड्डाणपूल बांधण्यात येणार आहे. या कामाकरिता या भागातील वृक्षांची मोठ्या प्रमाणात तोड करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे काही बांधकामदेखील यात बाधित होणार असल्याने संबंधित बांधकामधारकांना त्याबाबतची माहिती नोटीसद्वारे देण्यात आली होती. असे असताना पालिकेच्य माध्यमातून विस्तारीकरण केले जात असलेल्या भागातील सार्वजनिक शौचालायचे नव्याने बांधकाम करण्यात आले.आता मात्र विस्तारीकरणाच्या कामात नव्याने बांधलेले हे शौचालय बाधित होण्याची शक्यता असल्याने शौचालय बांधण्यासाठी ३० ते ३५ लाख रुपये खर्च करून •> पान २ वर

#### बसथांबा हलवला जाण्याची शक्यता

सार्वजनिक शौचालयाला खेटूनच पालिकेच्या माध्यमातून आधुनिक बसथांबा उभारण्यात आला आहे. याकरिता लाखो रुपये खर्च करण्यात आला आहे. हा थांबादेखील बांधकामात अडथळा ठरण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

> ३० सार्वजनिक शौचालय बाधित होऊ नये या करता प्रशासन प्रयत्न करत आहे. तशा स्वरूपाची बोलणी संबंधित बांधकाम विभागासोबत सुरु आहेत.
> – डॉ. वैभव विधाते. उपायुक्त.


**भावपूर्ण श्रद्धांजली**



**कै. श्रीमती विद्या वसंत पाटील**
(१५/०९/१९४७ ते २०/११/२०२५)

यांचे दीर्घ आजाराने दिनांक ,२० नोव्हेंबर२०२५ रोजी सकाळी ७.३० वाजता दु:खद निधन झाले. मयूर बेकरी च्या त्या संस्थापिका होत्या. त्याबरोबरच एक आदर्श शिक्षक, व्यावसायिक, सामाजिक कार्यकर्त्या, पर्यावरण स्नेही,आदर्श व्यक्ती अशी त्यांची बहुआयामी ओळख होती.

**त्यांच्या आत्म्यास शांती व सद्गती लाभो हीच ईश्वरचरणी मनापासून प्रार्थना.**
**पाटील, पळसोकर, व माईणकर परिवार**

# उलवेमध्ये पेट्रोलचा काळाबाजार

## प्रशासनाचे दुर्लक्ष, नागरिक संतप्त



**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

उलवे हा परिसर प्रशासकीयदृष्ट्या रायगड जिल्ह्यात येतो. येथे एकही अधिकृत पेट्रोल पंप नसल्याचा फायदा घेत काही ठिकाणी अवैध पेट्रोल विक्रीचे मोठे रॅकेट निर्भयपणे सुरू असल्याचे समोर आले आहे. वाहनचालकांकडून प्रतिलीटर ३० ते ३५ रुपये अधिक आकारले जात असून, पेट्रोलचे दर काही ठिकाणी तब्बल १३५ ते १४० रुपये लीटरपर्यंत पोहोचल्याची चर्चा आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, गल्लीबोळातील दुकाने, गॅरेज आणि घरांमध्ये पेट्रोल ड्रम, कॅन आणि बाटल्यांमध्ये साठवून खुलेआम विकले जाते. अधिकृत दरापेक्षा मोठ्या फरकाने वाढवलेले हे दर नागरिकांना लुटण्यासारखे असल्याची भावना व्यक्त होत आहे. अधिकाऱ्यांच्या 'बंद पाकिटां'मुळे धंदा वाढतोय, अशी जनतेत खुलेआम जोरदार चर्चा होत आहे. गृहखात्याचे प्रमुख मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असताना, त्यांच्या अखत्यारीतील काही कामचुकार वरिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आशीर्वादामुळे हा अवैध धंदे उद्योग सुरू राहतो, अशी चर्चा उलवे व रायगड परिसरात वाढत चालला आहे.

नागरिकांनी प्रशासन आणि पोलीस यांना वारंवार तक्रारी दिल्यानंतरही ठोस कारवाई न झाल्याने स्थानिकांमध्ये संताप निर्माण झाला आहे. अनेकांच्या मते, काहींच्या पाठबळामुळेच हा धंदा निर्भयपणे सुरू आहे. अलीकडेच उलवेत झालेल्या आगीत दुकानात अवैध पेट्रोल आणि सिलिंडरचा साठा असल्याचे तपासात उघड झाले होते. त्यामुळे हे रॅकेट सुरू राहिले तर भविष्यात आणखी मोठी दुर्घटना घडू शकते, असा इशारा अग्निशमन अधिकाऱ्यांनीही दिला आहे.

या पार्श्वभूमीवर नागरिकांनी रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक अचल दलाल यांनी तातडीने हस्तक्षेप करून या अवैध पेट्रोल विक्रीवर कडक कारवाई करावी, अशी जोरदार मागणी केली आहे. उलवे परिसरातील सुरक्षितता आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

# शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



**। खरोशी । प्रतिनिधी ।**

स्वर्गीय तुषार विनोद म्हात्रे याच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त रा.जि.प. प्राथमिक शाळा गोवठणे येथे विद्यार्थ्यांना खाऊ आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. मनुष्याचे खरे सुख त्याच्या स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यात नसून, इतरांना मदत करण्यात आहे. समाजऋण फेडण्याची जाणीव असणे हे माणूसपणाचे लक्षण आहे. याच जाणिवेतून चिरंजीव स्वर्गीय तुषार विनोद म्हात्रे याच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्ताने रा.जि.प. प्राथमिक शाळा गोवठणे उरण येथील शालेय मुलांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी विनोद म्हात्रे, संध्या म्हात्रे, संतोष म्हात्रे, सुगिंद्र म्हात्रे, किशोर म्हात्रे, जागृती म्हात्रे, संकेत, चिन्मय, श्रीया म्हात्रे, वि.स. म्हात्रे, कोल्हे सर, राजेंद्र पाटील, तृप्ती वर्तक, पूजा वर्तक हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष म्हात्रे यांनी केले.आभार प्रदर्शन श्री. कोल्हे यांनी केले.

# शेडूंग-बेलवली रस्त्याची डागडुजी करा

## शेतकरी कामगार पक्षाची मागणी



**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

शेडुंगपासून ते बेलवलीकडे जाणाऱ्या खराब रस्त्याची डागडुजी करण्याची मागणी शेतकरी कामगार पक्षाचे चिटणीस मंडळ सदस्य, पनवेल तालुका वसंत काशिनाथ फडके यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे पत्राद्वारे केली.

पनवेल तालुक्यातील ग्रामपंचायत भिंगारमधील शेडुंग ते बेलवलीकडे जाणारा रस्ता खराब झालेला आहे. ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. या रस्त्या संदर्भात अनेकदा फोनवर आणि प्रत्यक्षात पत्र देखील देऊन चर्चा झाली. मात्र अद्यापही या रस्त्याचे डागडुजी करण्यात आलेली नाही. पावसाळा संपला असून गणपती, दसरा, दिवाळी देखील संपली. सध्या लग्नसराई सुरू झाल्याचे दिसत आहे.

काही दिवसांनी नवीन वर्ष सुरू होईल असे असतानाही या खराब रस्त्याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग पाहत नाही. खराब रस्त्यामुळे बाजारहाट करण्यासाठी येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत आहे. या रस्त्याची तातडीने डागडुजी होणे गरजेचे असल्याचे वसंत फडके यांचे म्हणणे आहे. येत्या दहा दिवसात रस्ता दुरुस्त झाला नाही तर शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने कार्यालयावर मोर्चा, आंदोलन करावे लागेल, असा इशारा वसंत फडके यांनी दिला आहे.

# विठोबा ठमके यांचे निधन

**। सुकेळी । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील बाळसई येथील विठोबा दौलत ठमके यांचे शुक्रवार, दि.२१ रोजी सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले.



निधनसमयी ते ७९ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाची बातमी समजताच संपूर्ण बाळसईगावामध्येशोकाकूल वातावरण पसरले होते. कै. विठोबा यांच्या पार्थिवावर शनिवारी (दि२२) बाळसई येथील वैकुठभूमीत सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुली, जावई, नातवंडे व मोठा ठमके परिवार आहे. कै. विठोबा यांचे दशक्रिया विधी रविवार, दि. ३० रोजी, तर उत्तरकार्य बुधवार, दि.३ डिसेंबर रोजी करण्यात येणार असल्याचे ठमके परिवाराकडून सांगण्यात आले.

# गुणवंत विद्यार्थ्यांना स्मार्टवॉचचे वितरण

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**



खारघरमधील इयत्ता दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांना स्मार्टवॉच आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आलेला कार्यक्रम अजित अडसुळे व उषा अडसुळे यांच्या पुढाकारातून मोठ्या उत्साहात पार पडला.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त २३ नोव्हेंबर रोजी हा विशेष सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यानिमित्ताने परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक यशाबद्दल प्रोत्साहन देत भविष्याची दिशा अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या कार्यक्रमात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, माजी विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे कौतुक करत त्यांना भविष्यात अधिक मोठे यश मिळावे अशा शुभेच्छा दिल्या. गुणवंत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी सोहळ्याचा अनुभव लाभल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य दिसून येत होते.

### मोरे महाविद्यालयामध्ये

# रक्तदान शिबीर

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

शिवाई शिक्षण प्रसारक मंडळ, महाड संचलित पोलादपूर तालुक्यातील चोळई येथील सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये संस्थापक व महाराष्ट्राचे माजी ग्रामविकास मंत्री कै. प्रभाकर मोरे यांच्या जयंतीचे औचित्य साधून शनिवार, दि. २९ नोव्हेंबर २०२५रोजी सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती प्राचार्य प्रा. सुनील बलखंडे व उपप्राचार्य डॉ. महेश वल्ले यांनी दिली. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि आजीवन अध्ययन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिबिरासाठी महाड येथील जनकल्याण रक्तपेढीचे विशेष सहकार्य दरवर्षीप्रमाणे मिळणार आहे.

# अलिबाग-नारायणपूर पायी दिंडीचे आज प्रस्तान

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

सालाबादप्रमाणे यंदाही नारायण महाराज, दत्त देवस्थान सेवाभावी ट्रस्ट, श्रीक्षेत्र नारायणपूर, ता. पुरंदर, जि. पुणे यांच्यावतीने दत्त जयंतीनिमित्त अलिबाग ते श्रीक्षेत्र नारायणपूर पायी दिंडीचे उद्या मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर रोजी प्रस्थान होणार आहे. यंदा हे दिंडीचे ३१ वे वर्ष आहे.

अलिबाग शहर व तालुका परिसरातून सुमारे ३०० दत्तभक्त या दिंडी सोहळ्यामध्ये सहभागी होणार आहेत. अलिबाग एसटी आगारातील श्री गणेश मंदिरामध्ये अभिषेक-पूजा, आरती करून दिंडी समुद्रकिनारी पोहोचेल. तेथे गंगा-सागरपूजन, पादुकापूजन, कलश व कावड सागर तीर्थाने भरून पालखीचे प्रस्थान होईल. अलिबाग बाजारपेठ, कोळीवाडा, चेंढरे, पिंपळभाटमार्गे खंडाळे येथे दुपारच्या प्रसादासाठी थांबणार आहे. पुढे तीनवीरा, कामार्ली, खोपोली, कामशेत, निगडी, रहाटणी-काळेवाडी, रास्तापेठ-पुणे, सासवड असा प्रवास करत दिंडी ३ डिसेंबर रोजी श्री क्षेत्र नारायणपूर येथे पोहोचणार आहे.

दरम्यान, २ डिसेंबर रोजी श्री क्षेत्र नारायणपूर येथे २०० कोटी शिवदत्त नाम यज्ञाचा २५ वा वर्धापन दिन होणार आहे. ३ डिसेंबर रोजी दुपारी येणाऱ्या सर्व दिंड्यांचे स्वागत-सांगता व संध्याकाळी ७ वाजून ०३ मिनिटांनी दत्त जन्म सोहळा होणार आहे. ४ डिसेंबर रोजी रुद्र अभिषेक, होम हवन, पालखी ग्राम प्रदक्षिणा, चंद्रभागा कुंडावर देवांना स्नान, अभिषेक व मिरवणुकीने परत मंदिरामध्ये प्रवेश, मानपान, श्री टेंबे स्वामी महाराजांचे प्रवचन, मार्गदर्शन, महाआरती व महाप्रसाद असा कार्यक्रम होणार आहे. तरी ज्ञ्ञयाची देही याची डोळा ज्ञ्ञ आपण सर्वांनी कार्यक्रमास उपस्थित राहून या उत्सव पर्वाचा लाभ घ्यावा, असे नारायणपूर ट्रस्टच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

# चंदू काका सराफ आयोजित फॅशन शो दिमाखात

**। पनवेल । प्रतिनिधी ।**



पनवेलमध्ये संपन्न झालेल्या चंदू काका सराफ यांच्यातर्फे आयोजित फॅशन शो २०२५ मोठ्या दिमाखात पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अभिनेत्री कोमल शेटे उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते त्यांच्या विवाह तस्मै या सेगमेंटचे आणि संपूर्ण कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. याप्रसंगी चंदू काका सराफ पनवेल शाखेचे व्यवस्थापक अमेय जोशी, सहव्यवस्थापक योगिता चोगले, कार्यक्रमाचे व्यवस्थापन करणारे मंदार काणे एंटरटेनमेंटचे मंदार प्रमोद काणे, कोरिओग्राफर शुभांगी खैरे, तसेच उपस्थित मान्यवर आणि रसिकप्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, अभिनेत्री कोमल शेटे यांना शाल, नारळ आणि सुंदर असे चंदू काका सराफ यांच्यातर्फे गिफ्ट देऊन सन्मानित करण्यात आले.

फॅशन शोच्या परीक्षक स्वाती सोनावणे, कोरिओग्राफर शुभांगी खैरे यांना ट्रॉफी आणि चंदू काका सराफ यांच्यातर्फे गिफ्ट देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून इंस्टाग्राम क्रिएटर प्रणया साळवी, सौरभ भोईर, लागू बंधू २०२५ ची विजेती अक्षता शिर्के या सर्वांना ट्रॉफी आणि चंदू काका सराफ यांच्यातर्फे गिफ्ट देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये मिसेस २०२५ च्या विजेत्या प्रज्ञा इंगळे, मिसेस २०२५ च्या विजेत्या मयुरी हुडेर या दोघीनांही क्राऊन, साश, ट्रॉफी आणि चंदू काका सराफ यांच्यातर्फे गिफ्ट देऊन सन्मानित करण्यात आले.


प्रोसेस फी जमा रु.

अर्जदार तर्फे वकील
ॲड.महेंद्र यशवंत धामणे

**रोहे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (क स्तर) यांचे न्यायालयात**

दिवाणी चौ.अर्ज क्र.३२/२०२५

१) श्रीम.आरती निरंजन निराला
२) कु.नाव्या निरंजन निराला — अर्जदार
३) कु.अनायारा निरंजन निराला
वरील सर्व
रा. मु. सुकेळी (पाईपनगर), ता. रोहा,
जि. रायगड ४०२ १०६

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ यांचे पती आणि क्र.२ व ३ यांचे त्यांचे वडील कै. निरंजन कुमार निराला यांचा मृत्यू मौजे-सुकेळी ता.रोहा येथे दि ०२/११/२०२४ रोजी झाला असून कै. निरंजन निराला व श्रीम.आरती निरंजन निराला यांचे संयुक्तिक नावे मौजे - देवद, ता.पनवेल येथे सर्व्हे नं.४५, हिस्सा नं.१ अ मध्ये संगीता अपार्टमेंट, तिसरा मजला, सदनिका नं.३०६, क्षेत्र ६०७ चौ. फुट बिल्टअप एरिया अशी फ्लॅट मिळकत आणि हिरो कंपनीच्या बनावटीची लाल रंगाची PASSION PRO मोटार सायकल क्र. MH06BB8442 असून, कै. निरंजन कुमार निराला यांना अर्जदार क्र. १ ते ३ हे कायदेशीर वारस आहेत, या शिवास अन्य कोणीही वारस नाहीत, अर्जदार हे हिंदू धर्मीय आहेत, मौजे-देवद येथील फ्लॅट मिळकतीस आणि मोटार सायकलीस नाव मोबदला करणेसाठी अर्जदार यांनी मे. कोर्टाकडे वारसपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे, सबब सदरचे वारसपत्र वरील अर्जदार यांना देणेसंबंधी कोणा इसमाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाले तारखेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात, मुदतीत हरकती न आल्यास, कोणतीही हरकत नाही असे समजून, अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल. मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दि. ३०/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**कनिष्ठ लिपिक** — **अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर रोहा** — **दिवाणी न्यायालय क स्तर रोहा**



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे हेदवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक पंढरी बाबू जोशी वैगेरे १३ यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १७ | ५ | ०-२०-०० | ०-१४ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २५/११/२०२५

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं.०९,कोर्ट व्हयू बिल्डींग,
तळ मजला, दिवाणी व फौजदारी
न्यायालयासमोर, कर्जत,
ता.कर्जत,जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३


## पान १ वरून

## अलविदा धरमपाजी!

धर्मेंद्र बऱ्याच काळापासून आजारी होते. त्यांना काही दिवसांपासून मुंबईच्या ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. उपचारानंतर त्यांना घरी पाठवण्यात आलं होतं, घरीच त्यांच्यावर उपचार सुरू होते. धर्मेंद्र यांचे पूर्ण नाव धर्मेंद्र केवल कृष्ण देओल होतं. त्यांचा जन्म ८ डिसेंबर १९३५ रोजी पंजाबमधील नसराणी गावात झाला.

धर्मेंद्र यांना ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी नियमित तपासणीसाठी ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यांना श्वास घेण्यास त्रास होत होता. १० नोव्हेंबर रोजी त्यांची प्रकृती बिघडली. अशा स्थितीत त्यांचं संपूर्ण कुटुंब त्यांना भेटण्यासाठी रुग्णालयात पोहोचलं होतं. हेमा मालिनी, सनी देओल, ईशा देओल, करण देओल, राजवीर देओल आणि अभय देओल हे सर्वजण पोहोचले होते.

धर्मेंद्र यांचे चुंबन चर्चेत

२०२३ मध्ये आलेल्या रॉकी और रानी की प्रेम कहानी या चित्रपटातील त्यांच्या भूमिकेची खूप चर्चा झाली. या चित्रपटात त्यांनी शबाना आझमींना किस केलं होतं. या किसची खूप चर्चा झाली. २०२४ मध्ये प्रदर्शित झालेल्या तेरी बातों में ऐसा उलझा जिया या चित्रपटातही ते दिसले होते.

## मिनीबस दरीत कोसळली

प्रकाश गुरव (२२, रा. शिरवली, खेड), प्रिया प्रकाश गुरव (२३ रा. शिरवली, खेड), आनंदी बालाजी नाचरे (७४ रा. दमामे, दापोली), सर्वेश दीपक गुहागरकर (२२ रा. आडे, दापोली), मुजिब अल्लाबकाश दलाल (१९, काळकाई कोंड, दापोली), मयुरी मारुती शिगवण (४५ रा. दमामे, दापोली) याशिवाय चालक, वाहक तसेच इतर नऊ प्रवाशांना चिपळूण येथील खासगी रुग्णालयात तसेच डेरवण रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आले आहे.

या अपघाताची फिर्याद नयना स्वप्नील कालेकर (३५, रा. जालगाव, ता. दापोली) या प्रवासी महिला शिक्षिकेने दिल्यानुसार पोलादपूर पोलीस ठाण्यात सहायक पोलीस निरीक्षक आनंद रावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार बामणे यांनी मिनीबस चालक सूरज गागनाथ अलकुंटे याच्याविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पहाटेच्या सुमारास अपघातस्थळी वाहतूक कोंडी झाल्याने महामार्ग पोलिसांनी वाहतूक सुरळीत करण्यासाठी विशेष पथके तैनात केली. थंडी-धुके पसरले असताना, महामार्गाचे काम सुरू असताना रिफ्लेक्टर नसलेल्या आणि विनाकाँक्रिट कमकुवतपणे ठासलेल्या लोखंडी संरक्षक कठडे यामुळे हा अपघात झाला असून, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाप्रमाणेच महामार्गालगतचे लोखंडी संरक्षक कठडेदेखील कमकुवत असल्याचे या अपघातावेळी लोखंडी संरक्षक कठडे मिनीसोबतच दरीमध्ये झेपावल्याने उघड झाले आहे.

## यंत्रणा लागली कामाला

पाच दिवस शिल्लक राहिले आहेत. आरोप-प्रत्यारोपांसह वेगवेगळे व्हिजन घेऊन ही निवडणूक लढविण्यासाठी सर्वच राजकीय पक्षाचे उमेदवार कामाला लागले आहे. मतदारांपर्यंत पोहोचून त्यांना मतदान करण्याचे आवाहन केले जात आहे.

निवडणूक प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली आहे. मतदान दोन डिसेंबरला होणार असून, ३०८ केंद्रांमध्ये ही प्रक्रिया पार पडणार आहे. दोन लाख ३७ हजार ५०३ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. तीन डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासाकडून तयारी जोरात सुरु केली आहे. मतदान केंद्रांची पाहणी करण्यापासून कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहेत. जिल्ह्यातून सुमारे दोन हजार कर्मचारी मतदान व मतमोजणीच्या कामासाठी लागण्याची शक्यता आहे. तसेच या कालावधीत कोणताही गैरप्रकार घडू नये, म्हणून पोलीस यंत्रणेकडूनदेखील दक्षता घेण्यात आली आहे.

अलिबागमध्ये १९ केंद्रांमध्ये होणार मतदान

अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसच्या उमेदवार अक्षया प्रशांत नाईक आणि महायुतीमधील एक असे दोघेजण रिंगणात आहेत. नगरसेवकपदाच्या २० जागांमध्ये एक जागा बिनविरोध जाहीर झाली आहे. महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसचे उमेदवार प्रशांत नाईक बिनविरोध निवडून आले. त्यामुळे आता नगरसेवक पदाच्या १९ जागांसाठी ४२ उमेदवारांमध्ये लढत होणार आहे. अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीचे मतदान १९ केंद्रांमध्ये होणार आहे. १६ हजार ३५४ मतदार मतदानाचा हक्क बजाणार आहेत. २६ नोव्हेंबरला चिन्ह वाटप केले जाणार असून, २८ नोव्हेंबरला पेट्या सिलींग केल्या जाणार आहेत. मतपेट्या सुरक्षित ठेवण्यासाठी स्ट्राँग रुम तयार करण्यात आल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

## दिवेआगर-भरडखोल मार्गावरील पूल रखडला

रखडला आहे. यावर्षी पावसाळी दोन वेळा अतिवृष्टीने पूल पाण्याखाली गेला. या अडथळ्यांमुळे नागरिकांना दगदग सहन करावी लागली. श्रीवर्धनला जाणारा प्रमुख दिवेआगर भरडखोल-शेखाडी असा मार्ग आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून येथे सुरू असलेल्या कामामुळे मूळ पूल पाडण्यात आला आहे. त्याऐवजी तात्पुरता पर्यायी रस्ता बनवण्यात आला आहे. नदीपलीकडे जाण्यासाठी मोऱ्या टाकून पर्यायी मार्ग तयार केला खरा; मात्र, तोदेखील सुरक्षित नाही. त्यामुळे पुलाचे काम लवकरच मार्गी लावावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

## प्रभाग सातमध्ये प्रचाराचा जल्लोष

प्रभाग दोनमधून सुषमा नित्यानंद पाटील. प्रभाग तीनमधून साक्षी गौतम पाटील, आनंद अशोक पाटील. प्रभाग चारमधून रेश्मा मनोहर थळे, महेश वसंत शिंदे. प्रभाग पाचमधून निवेदिता राजेंद्र वाघमारे, समीर मधुकर ठाकूर. प्रभाग सहामधून ऋषीकेश रमेश माळी, अश्विनी ठोसर. प्रभाग सातमधून ॲड. मानसी संतोष म्हात्रे, अभय म्हामुणकर. प्रभाग आठमधून ॲड. निलम किशोर हजारे, अनिल चोपडा. प्रभाग नऊमधून योजना प्रदीप पाटील, सागर शिवनाथ भगत. प्रभाग दहामधून शैला शेषनाथ भगत, वृषाली महेश भगत हे महाविकास आघाडीचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.

प्रभाग सातमधील नगरसेवक पदाच्या उमेदवार ॲड. मानसी संतोष म्हात्रे, अभय म्हामुणकर यांचा सोमवारी सायंकाळी अलिबाग शहरात प्रचार करण्यात आला. शहरातील मारुती नाका ते जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील मतदारांना भेटून त्यांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. प्रचारादरम्यान मतदारांकडून उमेदवारांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मतदारांकडून ॲड. मानसी म्हात्रे, अभय म्हामुणकर या उमेदवारांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी अलिबाग नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष सतीश प्रधान, शेकाप तालुका कार्यालयीन चिटणीस अशोक प्रधान, ॲड. संतोष ठाकूर, विवेक म्हात्रे, रितेश म्हात्रे, महेंद्र पाटील, अभि पारसनीस, प्रमोद पाटील, अविनाश सुर्वे, अनिकेत झालेराव, तेजस साळवी, आशिष थळे, प्रशांत जाधव, प्रथमेश आंबवणे, मयुरेश आंबवणे, विश्वेष पिकळे, भूषण जगे आदी महाविकास आघाडातील शेकाप व काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला उपस्थित होत्या.

## पालिकेकडून जनतेचा पैसा खड्ड्यात?

तसेच बस थांबा उभारण्यासाठी लाखो रुपये खर्चून पालिकेने काय साधले, असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.

पालिकेच्या माध्यमातून शिव - पनवेल महामार्गांवर कळंबोली मॅकडोनाल्ड आणि कोपरा टोल नाका आशा दोन ठिकाणी जवळपास ७० लाख रुपये खर्च करून आधुनिक शौचालय उभारण्यात आली आहेत.

- प्रदीप ठाकूर,विधानसभा समन्वयक, शिव सेना उद्धव ठाकरे


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-15/25-26/ Rfx **No. 7000038051** | Supply of Tripping coil & Closing coil for various makes of CB at various s/s under 400 KVR.S. (O&M) Division Nagothane… **3rd call** | **Rs. 4,61,714.41/-** | **04.12.2025 up to 23:59 hrs** |

**EMD Rs. 5,000/-, Tender fee Rs. 500/- + GST.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** Mitesh Goyal (Dy. EE) Mob No. 9461456635 **Email ID:** ee7230@mahatransco.in **Note:** All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane.**

## निवडक



### प्राण प्रतिष्ठापनाचे उद्धव ठाकरे यांना आमंत्रण

**नागोठणे** : नागोठण्याजवळील शेतपळस ता. रोहा येथील आराध्य ग्रामदेवता श्री आकादेवी मातेच्या पुन: प्राण प्रतिष्ठापना सोहळ्याचे भव्य आयोजन शुक्रवार (दि.२८) ते रविवार (दि. ३०) नोव्हेंबर दरम्यान करण्यात आले आहे. यानिमित्त शेतपळस ग्रामस्थांच्या वतीने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना नुकतेच मातोश्री येथे जाऊन आमंत्रण देण्यात आले. यावेळी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना मंदिरात येऊन मातेचे दर्शन घ्यावे अशी आग्रहची विनंती शेतपळस ग्रामस्थांनी केली आहे. याप्रसंगी माजी आ. मनोहर भोईर, सुरेंद्र म्हात्रे, प्रसाद भोईर, हासुरामजी डाकी, केशव डाकी, नितीन घासे, विक्रम दुर्गावले, प्रशांत भोईर आदी उपस्थित होते.

### घंटागाडी अभावी कचरा रस्त्यावर

**कर्जत** : कर्जत नगरपरिषदेवतीने 'स्वच्छ भारत सर्वेक्षण'अंतर्गत शहर परिसरात फलकबाजीतून उपक्रमाचा गाजावाजा होत असताना शहराची ओळख असलेला कर्जतमधील विठ्ठल नगर सध्या कचऱ्याच्या समस्येमुळे त्रस्त आहे. परिसरात गेल्या दोन दिवसांपासून घंटागाडी न फिरकल्याने नागरिकांनी अखेर घरातला कचरा मोकळ्या जागेत टाकण्यास सरुवात केली आहे. सध्या कर्जत नगर परिषदेमध्ये निवडणुकीचा प्रचाराची धामधूम जोरात सुरू आहे. प्रशासन निवडणुकीच्या यंत्रणेमध्ये गुंतले आहेत, यामुळे प्रशासनाचे



बाकीच्या गोष्टींकडे दुर्लक्ष होत आहे. नगरपरिषदेने ज्या ठेकेदाराला घंटागाडीचा ठेका दिला. त्या ठेकेदाराचे कामाकडे लक्ष नाही असे नाव न छापण्याच्या अटीवर तिथे काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांनी सांगितले. नगरपरिषद प्रशासनाच्या नियमानुसार ओला आणि सुका कचरा हा वेगळा करूनच घंटागाडीला द्यावा लागतो त्यामुळे घरात कचरा साठल्याने कुबट वास येत आहे. अखेर घरात कचरा किती दिवस ठेवायचा म्हणून चौकातील मोकळ्या जागेत हा कचरा टाकत जात असल्याचे चित्र ठिकठिकाणी दिसत आहे. अनेक नागरिक मॉर्निंगला जाताना कचरा साठलेली पिशवी हातात घेऊन मिळेल त्या ठिकाणी टाकतात कर्जत टेकडीवर अनेक नागरिकांचे मॉर्निंग वॉकचे ठिकाण आहे. त्या ठिकाणी तर एवढ्या मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जात आहे, याचे चित्र हे कर्जतला विदारक कारक आहे. विठ्ठलनगर परिसरात फिरणाऱ्या घंटागाडीच्या ठेकेदाराच्या मुकादामाकडे संपर्क साधला असता त्यांनी सांगितले दोन दिवस ठेकेदाराची माणसं बाजारपेठेत रात्रीच्या सुमारास पडलेला कचरा उचलत नसल्याने सकाळी सर्व कचरा आम्हाला भरावा लागत आहे, त्यामुळे घंटागाड्या त्याच ठिकाणी भरतात त्यामुळे अन्य ठिकाणी गाड्या फिरवल्या जात नाही असे सांगितले.

### सखी डिझायनर वेअरमध्ये चोरी

**पनवेल** : पनवेल शहरातील आनंद नगर परिसर सखी डिझायनर वेअरमध्ये अज्ञात चोरट्याने केलेल्या चोरीत जवळपास ६९ हजार रुपयांची रोख लंपास केल्याची घटना घडली आहे. शहरातील आनंद नगर परिसरात असलेल्या सखी डिझायनर वेअर या दुकानात अज्ञात चोरट्याने मुख्य दरवाजा उघडून आत प्रवेश करून दुकानात असलेली ६९ हजार रुपयांची रोख रक्कम लंपास केली आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### 'अक्षय ऊर्जा प्रोत्साहन' उपक्रमाचा शुभारंभ

**पनवेल** : 'माझी वसुंधरा अभियान ६.०' अंतर्गत पनवेल महानगरपालिकेमार्फत 'अक्षय ऊर्जा प्रोत्साहन' उपक्रमाचा उत्साहात शुभारंभ खारघर येथे करण्यात आला. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात येत असलेल्या या उपक्रमाचा उद्देश नागरिकांमध्ये, विद्यार्थ्यांमध्ये अक्षय ऊर्जेचे महत्त्व, ऊर्जा संवर्धन, पर्यावरणपूरक जीवनशैली आणि हरित उपक्रमांविषयी जनजागृती निर्माण करणे हा आहे. या उपक्रमांतर्गत पर्यावरण विषयावर आधारित निबंध लेखन, पोस्टर बनविणे, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा, पॅनेल चर्चा, तज्ज्ञ चर्चा, यांसारख्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची भावना दृढ करण्यासाठी ई-वेस्ट संकलन मोहिम, लघुपट प्रदर्शन आणि वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. माझी वसुंधरा अभियानांतर्गत उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या सूचनेनूसार होत असलेल्या या उपक्रमांच्या शुभारंभावेळी शाळेच्या प्राचार्य निशा नायर व शाळेचे शिक्षकवृंद उपस्थित होते. दिनांक २४ व २५ नोव्हेंबर असे दोन दिवस हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये अक्षय ऊर्जेचा वापर वाढविणे, हरित ऊर्जेचे महत्व अधोरेखित करणे आणि पर्यावरण रक्षणासाठी सामूहिक सहभाग घडवून आणणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

# मुरुडमध्ये आघाडीचा प्रचारात झंझावात



**। चौल । वार्ताहर ।**

मुरुड नगरपरिषदेच्या थेट नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या उमेदवारीसाठी शेकाप, मनसे आघाडीच्या प्रचाराचा सोमवारी (दि.२४) कोटेश्वरी देवीला साकडे घालून नारळ फोडण्यात आला. त्यानंतर उमेदवारांसह कार्यकर्त्यांनी मतदारांच्या घरोघरी जात त्यांना मतदानाचे आवाहन करण्यात आले. आघाडीच्या या झंझावातील प्रचारामुळे मतदारांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे दिसून आले.

मुरुड नगरपरिषद निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यापासून शेकाप आणि मनसेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी प्रचाराची धुरा आपल्या हाती घेत सर्वच मतदारसंघ पिंजून काढले आहेत. जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचून त्यांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. तसेच आघाडीच्या उमेदवार निवडून आल्यानंतर करण्यात येणाऱ्या विकासकामांचे व्हिजनही उमेदवारांसह कार्यकर्ते मतदारांना पटवून देत आहेत. त्यामुळे मतदारांकडून शेकाप-मनसे आघाडीच्या उमेदवारांना वाढता पाठिंबा मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

दरम्यान, मुरुड शहरात महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी प्रचाराला कोटेश्वरी मातेचे दर्शन घेऊन सुरुवात करण्यात आली. यावेळी आघाडीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार अंकीता मनिष माळी यांच्यासह नगरसेवकपदाच्या उमेदवारांनी प्रचाराचा शुभारंभ नारळ वाढवून केला. तालुका चिटणीस विजय गिदी यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रचार सुरू झाला. या प्रचारामध्ये महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने सहभागी झाले होत्या.

दरम्यान, थेट नगराध्यक्ष पदासाठी अंकीता मनिष माळी, नगरसेवकपदासाठी मनिष माळी, प्रयास वरसोलकर, अनंत म्हसलकर, संकेत अपराध, बाबा मजगांवकर, रसिका मयेकर, किर्ती शाहा, मनसेकडून अंकीत गुरव, युईका भगत, जागन पुलेकर, मनिष शामा हे महाविकास आघाडीचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.

याप्रसंगी शेकाप तालुका चिटणीस विजय गिदी, मनोहर बैले, फैसल उलडे, नरेश दिवेकर, अनंत पाडगे, गणेश पुगावकर, उमेश अपराध, प्रकाश मयेकर, जितेंद्र पाटील, किरण गुरव, शैलेश खोत रमेश तरे महाविकास आघाडीचे, व मनसे उमेदवार उपस्थित होते.

# पनवेल स्थानकात प्रवाशांची गैरसोय



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

भविष्यातील वाहतकीचे केंद्र असलेल्या पनवेल रेल्वे स्थानकाबाहेर प्रवाशांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. स्थानकासमोरील जागेची कमतरता, रिक्षाचालकांची मनमानी तसेच पायाभूत सुविधांचा अभावामुळे स्थानकातील प्रवेश त्रासदायक झाला आहे.

मध्य रेल्वे, कोकण रेल्वे तसेच मुंबई उपनगरी मार्गावरील पनवेल महत्त्वाचे स्थानक आहे. येथून मुंबई, ठाणे, अंधेरीसह वसई-डहाणू लोकल तर कोकणमार्गावरील सर्व लांब पल्ल्याच्या गाड्या धावतात. सध्या येथे ७ फलाट असून ४ उपनगरी तर ३ लांब पल्ल्याच्या गाड्यांसाठी वापरले जाते. सिडकोने विकसित केलेल्या स्थानकात नवीन टर्मिनसचे काम सुरू असल्याने भविष्यात दादर, सीएसएमटी, एलटीटीवरील भार कमी होऊन पनवेल जंक्शनचा दर्जा अधिक मजबूत होणार आहे. परंतु दिल्ली-जेएनपीटी कॉरिडॉरमुळे प्रत्यक्षात प्रवाशांच्या गैरसोयी वाढल्या आहेत. स्थानकाबाहेरील जागेअभावी बस, रिक्षा थांबे व्यवस्थित नसल्याने प्रवासी अडचणींचा सामना करत आहेत. पदपथांवरील अतिक्रमणांमुळे मुख्य रस्त्यावरून चालावे लागत आहे. त्यामुळे पायाभूत सुविधा उपलब्ध नसल्यास प्रवाशांची गैरसोय होत आहे.

> **बस डेपो ते स्थानकादरम्यानच्या पदपथांवर झोपडपट्टीधारकांची दुकाने थाटल्यामुळे पादचाऱ्यांना रस्त्यावर चालावे लागते. एका बाजूला अतिक्रमण, दुसऱ्या बाजूला रिक्षा उभ्या असल्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे.**
> **- औदुंबर पाटील, पोलीस निरीक्षक, पनवेल वाहतूक शाखा**



● मुरुड आरआंबोळी परिसरात काकड उन्ह असल्यामुळे शेतकरी सकाळी झोडणीला सुरुवात करत आहेत. (छायाचित्र- सुधीर नाझरे)

# ग्रामीण भागात एसटी वाहतूक ढासळली

## अपुरा कर्मचारी वर्ग, प्रवाशांचा प्रचंड संताप

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुका रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण. तालुक्यातील शेकडो खेड्यांचा जगण्याचा प्रमुख आधार असलेली एसटी बस सेवा आज गंभीर संकटातून जात आहे. चालक-वाहकांची मोठ्या प्रमाणात रिक्त पदे, डेपोचे वाढते आर्थिक नुकसान आणि त्यातून निर्माण झालेला प्रवाशांचा संताप या सर्वांचा परिणाम म्हणून ग्रामीण जनजीवन अक्षरशः विस्कळीत झाले आहे.

निजामपूरसह घरोशी वाडी, करंबेळी, भाले, गांगवली, भिरा, पाटणूस, भागाड, कांदळगाव आदी दुर्गम भागातील नागरिकांची हालचाल फक्त एसटीवर अवलंबून आहे. मात्र काही महिन्यांपासून सुरू असलेल्या कर्मचारी तुटवड्यामुळे अनेक गाड्या रद्द केल्या जात आहेत. पहाटे बाजारात जाणाऱ्या शेतकऱ्यांपासून ते विद्यार्थी, कामगार, आजारी लोक सर्वांनाच प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. दीर्घकाळ प्रलंबित समस्या सोडवण्यासाठी ॲड. राजीव साबळे, बाबूशेट खानविलकर, नितीन बामगुडे तसेच ग्रामीण भागातील ग्रामस्थांचा मोठा जमाव माणगाव एसटी आगारात धडकला.

आगार व्यवस्थापक छाया कोळी यांना परिस्थितीची गंभीरता समजावून सांगताना ग्रामस्थांच्या भावना ओसंडून वाहत होत्या.

ग्रामस्थांचा आक्रोश बैठकीत जोरदारपणे घुमला. नेत्यांच्या पाठपुराव्यानंतर आगार व्यवस्थापनाने सुरुवातीला १० कर्मचारी तत्काळ हजर करण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधल्यानंतर टप्प्याटप्प्याने भरती प्रक्रिया वेगाने सुरू करून वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याची हमी देण्यात आली.

सध्या माणगाव आगारात १०५ कर्मचारी कार्यरत असून आणखी ५३ कर्मचाऱ्यांची तातडीची गरज आहे. अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर प्रचंड मानसिक ताण निर्माण झाला आहे आणि आगाराला मोठे आर्थिक नुकसान होत आहे.

वाहतुकीची घडी बसल्याशिवाय ग्रामीण भागाचा शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक प्रवास थांबलेला आहे. आता व्यवस्थापनाने दिलेल्या आश्वासनांना गती मिळते का? ग्रामीण जनतेला दिलासा मिळतो का? याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. ग्रामीण जनता रोजच्या रोज होरपळत असताना निष्क्रियतेचा अधिक कालावधी सहन केला जाणार नाही, असा इशारा नेत्यांनी दिला आहे.

# बांधकाम साहित्य चोरणाऱ्यांना अटक



- चार आरोपींना ठाण्यातून जेरबंद
- चार दिवस पोलीस कोठडी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ जवळील बोरले येथील बांधकाम साईट वरील बांधकाम साहित्य चोरीला गेली होते. या प्रकरणी नेरळ पोलिसांनी बांधकाम साहित्य चोरणारे यांना ताब्यात घेतले आहे. चार आरोपींना ठाणे येथून आणण्यात आले असून त्या आरोपींकडून सर्व मुद्देमाल हस्तगत केला.

नेरळ पोलीस ठाणे हद्दीत बोरले रोड लगत ग्लोब फॅंटासिया साईडमध्ये लोखंडी रॉड व सिमेंट गोणी चोरी झाल्या असल्या बाबत नेरळ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास केला. नेरळ पोलीस गुन्हे प्रकटीकरण पथकाचे वाघमारे, राजाभाऊ केकाण, पोलिस आशू बेंद्रे, वांगणेकर यांनी तपास करताना ग्लोब फॅंटाशिया साईडमधील सीसीटीव्ह फुटेज तपासले असता ते बंद स्थितीत होते. त्यानंतर सदर गुन्ह्याचा तांत्रिक तपास व गोपनीय माहितीद्वारे तपास करून आरोपी राकेश लक्ष्मण पारधी, तबारक हुसैन अब्दुल्ला खान, रवींद्र दत्ता कांबळे, अतिश रामचंद्र चहाड यांना पोलीस ठाणे येथे आणले. आरोपी यांना विश्वासात घेऊन त्यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी सदरची चोरी केल्याचे निष्पन्न झाले. त्या सर्व आरोपी यांना न्यायालयात हजर केले असता चार दिवस पोलीस कोठडी मिळाली. त्यात तपासामध्ये आरोपीत यांच्याकडून ३०,००० हजार रुपयाचे लोखंडी रॉड १०३६०० रुपयाचे ३७० सिमेंटच्या गोण्या व चोरी करण्यासाठी वापरलेले महेंद्रा कंपनीचा पिकअप जप्त करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचा तपासात पोलीस अधीक्षक रायगड आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवतारे आणि कर्जतचे पोलीस उप अधीक्षक राहुल गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

### मार्गशीर्ष महिन्यात फळांना मागणी

**पनवेल** : धार्मिक उपवास-व्रतवैकल्ये, पूजेसाठीची फळे, थंडीतील पोषणासाठीची फळे खरेदीसाठी ग्राहकांची वर्दळ वाढली आहे. त्यामुळे बाजारात १० ते २० टक्क्यांनी भाव कमी झाले आहेत. मार्गशीर्ष महिन्यात उपवास, पूजेसाठी लागणाऱ्या फळांचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. किरकोळ बाजारात तर पूजेसाठी लागणाऱ्या पाच फळांचे वाटे तयार करून विकले जातात. त्यामुळे किरकोळ विक्रेत्यांना चांगला नफा मिळत आहे. बाजारात संत्री, मोसंबी, पेरू, सीताफळ, सफरचंद, कलिंगड अशा फळांसोबतच परदेशी फळांची आवक वाढली आहे. त्याचबरोबर अंजीर, द्राक्ष, बोर, स्ट्रॉबेरी, अमरफळ, चिकू, खरबूज बाजारात मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत.

# 'महिलांचा सन्मान करा, अपप्रचार करू नका'

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत नगरपरिषदेची निवडणूक सुरु आहे. या निवडणुकीत सोशल मीडियाच्यावतीने अपप्रचार केला जात आहे. अगदी वैयक्तिक टीका होत आहे. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार महिला आहेत. त्यांच्याबद्दल अपप्रचार करू नका. महिलांचा सन्मान राखला गेला पाहिजे. निवडणुका येतील आणि जातील, मात्र आपले संबंध बिघडवू नका. कारण आपण सर्वांनी कधी ना कधी एकत्रित काम केले आहे. याची जाणीव राखणे गरजेचे आहे. प्रचारात आपल्या कर्जतच्या परंपरेला बाधा येऊन देऊ नका, असे



भावनात्मक आवाहन माजी आमदार सुरेश लाड यांनी केले.

दहिवली येथील संकल्प भवनाच्या सभागृहात सद्यः स्थितीतील निवडणूक प्रचाराबद्दल पत्रकारांशी संवाद साधण्यासाठी सुरेश लाड यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. मी तर ७७ सालापासून समाजकारण व राजकारणात आहे. माझ्या परिवाराचे काही तरी योगदान आहे. त्यामुळे अशी भाषा वापरणे योग्य नाही. मी सुरुवातीला या निवडणुकीत माझ्या सुनेला उतरवणार नव्हतो, परंतु पक्ष श्रेष्ठींचा आग्रह असल्याने मी हा निर्णय घेतला, असे सांगितले.

महिलांबद्दल बोलताना त्यांचा आदर राखला पाहिजे. जे कोणी व्यवसाय करीत असतील तर ते शासनाच्या परवान्याने करीत आहेत. इतक्या खालच्या थरावर जाऊन प्रचार करणे योग्य नाही.

सोशल मीडियावर टाकण्यात येणाऱ्या पोस्ट मनाला पटणाऱ्या नाहीत.

**वार्डे गुरुजी नवनाथ आरती मंडळाचा उपक्रम** | **परिक्रमेचे यंदाचे पाचवे वर्षे**

# गुरुवारी चौल येथील दत्त टेकडीला परिक्रमा

**। चौल । प्रतिनिधी ।**

'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' या दत्तनामाच्या जयघोषात चौल-भोवाळे येथील दत्त टेकडीला गुरुवारी (दि. २७) परिक्रमा घालण्यात येणार आहे. ढोलताशाच्या गजरात दुपारी २.३० वाजता या सोहळ्यास प्रारंभ होईल, अशी माहिती वार्डे गुरुजी नवनाथ आरती मंडळ, चौलच्यावतीने देण्यात आली आहे. परिक्रमेचे यंदाचे हे पाचवे वर्षे आहे.

दत्तटेकडीला परिक्रमेआधी दत्त मंदिरास १०८ प्रदक्षिणा घालण्याचा कार्यक्रम दरवर्षी होत असतो. हा सोहळा मार्गशीर्ष महिन्याच्या पहिल्या आणि दुसऱ्या गुरुवारी पार पडतो. परंतु, दुसऱ्या गुरुवारी दत्तगुरुंची पाच दिवस यात्रा भरणार असल्याने प्रदक्षिणेचा सोहळा दि. ११ डिसेंबर रोजी पार पडणार आहे. तत्पूर्वी, परिक्रमेचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंदिराचे गुरव प्रभाकर आगलावे, आशिष वासुदेव, सचिन राऊत, निकेश घरत आणि वार्डे गुरुजी नवनाथ आरती मंडळाचे सभासद मेहनत घेत आहेत. तरी, दत्त परिक्रमेस मोठ्या संख्येने सर्व



दत्तभक्तांनी उपस्थित राहावे, असे आवाहन वार्डे गुरुजी नवनाथ आरती मंडळ, चौल यांनी केले आहे. परिक्रमा सोहळ्याच्या अधिक माहितीसाठी निकेश घरत ९८२१७९४१९२/७६६००७९९५३ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### श्रीदत्तमंदिर प्रदक्षिणा ११ डिसेंबरलार्ग

**पर्वतनिवासी दत्तगुरुंच्या मंदिराला मार्गशीर्ष महिन्याच्या पहिल्या गुरुवारी १०८ प्रदक्षिणा घालण्यात येतात. परंतु, यंदा दुसऱ्या गुरुवारी म्हणजे दि. ४ डिसेंबरपासून दत्तयात्रेस प्रारंभ होत आहे. दरम्यान, भाविक भक्तांची मोठी गर्दी दत्तटेकडीवर असते. त्यामुळे भाविकांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, तसेच सोहळ्यात कोणताही अडथळा येऊ नये, म्हणून मंदिरास प्रदक्षिणा घालण्याचा कार्यक्रम यात्रेनंतर म्हणजेच गुरुवार, दि. ११ डिसेंबर रोजी होणार आहे. याची सर्व दत्तभक्तांनी नोंद घ्यावी, असे आवाहन वार्डे गुरुजी नवनाथ आरती मंडळाकडून करण्यात आले आहे.**

### २७ नोव्हेंबरपासून अखंड हरिनाम

**चौल-भोवाळे येथील दत्तयात्रा गुरुवार, दि. ४ डिसेंबरपासून पाच दिवस भरणार आहे. त्यानिमित्त गुरुवार, दि.२७ नोव्हेंबरपासून दत्तमंदिरात अखंड हरिनामास प्रारंभ होणार असून, पंचक्रोशितील अठरा गावे या कार्यक्रमात सहभागी होत असतात.**

### असा असेल परिक्रमेचा मार्ग

**संपूर्ण दत्त डोंगराला प्रदक्षिणा घालण्यात येणार असून, पायी पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. परिक्रमेस दुपारी २.३० वाजता दत्त मंदिरातून सुरूवात होईल. स्वामी समर्थ मंदिरमार्गे चौल-सराई, सोमेश्वर मंदिर, हनुमानपाडा, गायचोळे अशी मार्गक्रमणा करीत भोवाळे येथून दत्त मंदिर मुख्य प्रवेशद्वार व त्यानंतर पायरी मार्गाने मंदिराकडे मार्गस्थ होईल, याची दखल दत्तभक्तांनी घ्यावी, असे आवाहन वार्डे गुरुजी नवनाथ आरती मंडळाच्या प्रमुखांनी केले आहे. दत्त परिक्रमा पूर्ण करण्यासाठी जवळपास तीन तासांहून अधिकचा कालावधी लागतो. दत्त महाराजांच्या पालखीचे मंदिरात प्रस्थान झाल्यानंतर महाआरती होईल. त्यानंतर परिक्रमा सोहळ्याची सांगता होणार आहे.**

### वायू प्रदूषणाची पालिकेकडे तक्रार

**पनवेल** : महापालिका क्षेत्रात वायू प्रदूषणाची पातळी झपाट्याने वाढत आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकृत वेबसाईटवर प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार पालिका क्षेत्रातील वायू गुणवत्तेचा निर्देशांक २०० पेक्षा जास्त नोंदवला गेला आहे. त्यामुळे श्वसनाचे गंभीर विकार होण्याची शक्यता वाढल्याने शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिकेकडे तक्रार केली आहे. रात्रीच्या वेळी परिसरात धूर तसेच केमिकलयुक्त वायू पसरत असल्यामुळे नागरिकांना त्रास होत असून आहे. त्यामुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाईची मागणी शिष्टमंडळाने अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांची भेट घेऊन केली.

# नवे कामगार कायदे

केंद्र सरकारने मोठा गाजावाजा करून चार नवे कामगार कायदे उर्फ कोड लागू केले आहेत. ब्रिटिशांच्या काळापासून आजतागायत देशात विविध प्रकारचे २९ कामगार कायदे अस्तित्वात होते. ते एकत्र करून चार कायदे किंवा कोड तयार करण्यात आले आहेत. पाच वर्षांपूर्वीच, म्हणजे २०२०मध्ये संसदेने त्यांना मान्यता दिली होती. पण काही राज्यांचा व विविध संघटनांचा त्यांना आक्षेप होता. शिवाय त्यांचे नियम करणे बाकी होते. त्या सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्या असल्या तरी या बदलांबाबत सर्व शंका पूर्ण फिटलेल्या नाहीत. या कायद्यांमुळे कामगारांचे कल्याणच कल्याण होणार असल्याचे डिंडिम मोदी सरकार वाजवत आहे. तशा मोठमोठ्या जाहिराती प्रसिध्द झाल्या आहेत. दुसरीकडे कामगार संघटनांनी या बदलांना सरसकट कामगारविरोधी ठरवले आहे. पण वस्तुस्थिती याच्या मध्ये कोठेतरी आहे. नव्या कायद्यांमध्ये काही गोष्टी निदान कागदावर तरी नक्कीच चांगल्या आहेत. आता कामगारांना एक वर्ष सलग काम केले की ग्रॅच्युइटीचा लाभ मिळणार आहे. यापूर्वी किमान पाच वर्षे नोकरी झाल्यानंतरच तो मिळत असे. आता सर्व कामगारांना किमान वेतनाचा नियम लागू होणार आहे. आजवर कायद्याच्या शेड्यूलमध्ये किंवा सूचीमध्ये नोंदलेले कामगारच याच्या कक्षेत येत होते. यापुढे प्रत्येक कामगाराला, मग तो कायम असो की कंत्राटी, त्याला वेतनचिठ्ठी देणे तसेच ठराविक तारखेला पागार देणे बंधनकारक करण्यात आले आहे. हा नियम मोडणाऱ्याला दंड वा कारावासाची शिक्षा आहे. त्यामुळे तो पाळला जाईल अशी आशा आहे. अनेक बाबतीत कंत्राटी कामगारांना नियमित कामगारांसारख्या सुविधा व संरक्षण उपलब्ध होणार आहे. सर्व प्रकारच्या उद्योगांमध्ये आता भविष्यहोणार असून निर्वाह निधीची तरतूद करण्यात आली आहे. धोकादायक उद्योगांमध्ये अगदी एक तरी कामगार असला तरी त्याला विम्याची सुविधा देणे बंधनकारक झाले आहे. कर्मचाऱ्यांची वर्षातून एकदा आरोग्य तपासणी करून घेणे मालकांना सक्तीचे करण्यात आले आहे. यासारख्या बदलांमुळे कामगारांना थोडाफार दिलासा मिळेल यात शंका नाही.

## बारा तासांची ड्यूटी

मात्र याच कायद्यातील काही बदल हे संशयास्पद व मालकांच्या हिताचे रक्षण करणारे वाटतात. कामाच्या तासांमध्ये केलेला बदल हा त्यातील सर्वात प्रधान आहे. आठवड्यात सहा दिवस व ४८ तास काम हे सूत्र कायम ठेवण्यात आले असले तरी सरासरी आठ तास काम हा नियम बदलण्यात आला आहे. आता बारा तासांच्या सलग ड्यूटीला परवानगी देण्यात आली आहे. शिवाय रात्रपाळीमध्ये महिलांना कामावर ठेवण्यास मुभा दिली गेली आहे. बारा तासांच्या डयूटीबाबत गेले काही महिने सातत्याने वातावरण निर्मिती केली जात आहे. मध्यंतरी इन्फोसिसचे नारायणमूर्ती वगैरे लोकांनी भारताला श्रीमंत व्हायचे असेल तर बारा-चौदा तास काम करणे आवश्यकच आहे असे मत व्यक्त केले होते. पण असे काम करणे वा सातत्याने करायला लावणे हे रानटी स्वरुपाचे ठरू शकते. शेतामध्येही लोक बारा तास काम करतात. पण ते गरजेनुरुप व काही दिवस असते. शिवाय त्यात मध्ये मध्ये सुट्टी घेण्याची सुविधा असते. कार्यालये किंवा कारखान्यांमध्ये एकाच जागी मान खाली घालून बारा तासांचे काम करायला लावणे हे सध्याच्या काळात अमानुष ठरेल. एकोणिसाव्या शतकात कापड गिरण्यांमध्ये किंवा कोळशाच्या खाणींमध्ये असे काम करणारे कामगार होते. पण त्यामुळेच या कामगारांना अनेक आजार होत किंवा त्यांचा तरुण वयातच मृत्यू होई. दुसरे म्हणजे आज बहुतांश शहरांमध्ये वाहतुकीचा प्रश्न भीषण झाला आहे. कामावर येण्याजाण्यामध्ये बहुतेक मोठ्या शहरांमध्ये कामगारांचा रोज किमान दोन ते तीन तास जातात. मुंबईसारख्या शहरांमध्ये तर लोक पाच पाच तास लोकल गाड्यांमध्ये काढतात. बारा तास काम अधिक हे चार-पाच तास प्रवासाचे धरले तर त्या माणसाला जेमतेम आठ तास बाकी उरतात. याचा अर्थ त्याचे आयुष्य घाण्याला जुंपलेल्या बैलाहूनही वाईट होईल. महिला कामगारांना रात्रपाळीतही असेच राबवून घेतले जाईल. शिवाय महिला असल्याने त्यांना घरच्याही जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील अशा घरांमध्ये कौटुंबिक स्वास्थ्यच नष्ट होण्याचा धोका आहे.

## गिग वर्कर्सचे भ्रमजाल

कामगारांना पूर्वी हंगामी नेमणूक देणे सोपे नव्हते. आता मर्यादित काळासाठी कंत्राटी नेमणुका करणे व भविष्य निर्वाह निधीसारख्या नियमांना बगल देणे सोपे होईल. ५१ टक्क्यांहून अधिक सदस्य असतील तरच त्या कामगार संघटनेला मान्यता मिळेल. अन्यथा, सदस्य संख्येच्या प्रमाणात वीस टक्के असे प्रतिनिधित्व मिळेल. पण ज्या संघटनांमध्ये कमी संख्येने सदस्य असतील त्यांना कोणीच विचारणार नाही. हा त्यांच्यावरचा अन्याय होईल. विविध कायद्यांमध्ये सुसूत्रता आणणे हा या नव्या बदलांचा मुख्य हेतू आहे असे सरकार सांगते. कंपन्यांना भरावे लागणारे अर्ज, कामगारविषयक होणाऱ्या तपासण्या, त्याबाबत ठेवाव्या लागणाऱ्या नोंदी यामध्ये एकदम कपात करण्यात आली आहे. सरकारी कागदशाही यातून कमी होणार असेल तर त्याचे स्वागतच करायला हवे. पण या नावाखाली मालकांना सरसकट नियमांमधून सूट दिली जाणार असेल तर ते अन्याय्य ठरेल. शहरांमधील गिग वर्कर्सना हे सर्व कायदे लागू करण्यात आले आहे असे सरकार मोठ्या कौतुकाने सांगत आहे. गिग वर्कर्स म्हणजे वस्तू, कुरियर, पार्सले इत्यादी इकडून तिकडे पोचवणारे हमाल किंवा पोस्टमन. सध्या शहरांमध्येच नव्हे तर छोट्या गावांमध्येही ऑनलाईन जेवण मागवणे किंवा किराणा, औषधे, मोबाईल फोन यांची खरेदी ऑनलाईन करणे असे वेड वाढत चालले आहे. त्यामुळे झोमॅटो, स्विगीसारख्या कंपन्यांचा विस्तार झाला आहे. अमेझॉन, फ्लिपकार्ट हेही फैलावत चालले आहेत. यांचा सर्व डोलारा गिग वर्कर्स उर्फ त्या भारवाही हमालांच्या जिवावर असतो. भारतात बेकारी प्रचंड आहे. शिकलेल्या तरुणांना शेतीत काम करणे कमीपणाचे वाटते. त्याऐवजी मोटारसायकलवरून वस्तू पोचवण्याचे काम त्यांना बरे वाटते. त्यामुळे या नोकऱ्यांमध्ये प्रचंड झुंबड उडाली आहे. त्याचा परिणाम असा की पहाटेपासून ते मध्यरात्रीपर्यंत यांना राबवून घेतले जाते व अत्यंत कमी पैसे दिले जातात. ज्या दिवशी काम नाही त्यादिवशी उत्पन्न नाही. भविष्याची कोणतीही सुरक्षा नाही. पुढे जाऊन प्रगतीची काही संधी नाही. अशा कामगारांना किमान वेतन, आरोग्याच्या व विम्याच्या सोई मिळणार असतील तर ते स्वागतार्हच आहे. पण या कामगारांवरचा खर्च वाढला तर एकूण धंद्याचे गणित बिघडू शकते. त्यासाठी मग कामगारांना कमी पगारात राबवून घेण्याचे नवीन मार्ग शोधले जाण्याची शक्यता आहे. त्यावर सरकारला नियंत्रण ठेवावे लागेल. शिवाय सर्वात महत्वाचे म्हणजे गिग वर्कर्सची वाढती संख्या हा काही आपल्या आर्थिक प्रगतीचा निकष होऊ शकत नाही हे ध्यानात ठेवायला हवे.

विचार

# स्वागतार्ह ऑस्ट्रेलियन पायंडा

***ऑस्ट्रेलियाने मध्यंतरी सोळा वर्षाखालील मुलांनी सोशल मीडियावर खाते उघडणे किंवा ठेवणे टाळावे, असा फतवा काढत सोशल मीडिया कंपन्यांवर वयाची खात्री करण्याची जबाबदारी टाकली. अल्पवयीन मुलांना सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे होणाऱ्या मानसिक आणि सामाजिक नुकसानापासून वाचवून वास्तव जगातले अनुभव, शिक्षण आणि प्रत्यक्ष संवादांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले.***



डॉ. दीपक शिकारपूर

इंटरनेटवरील सोशल मीडिया हा जगभरातील नागरिकांच्या आयुष्यातील आणि समाजातील एक महत्त्वपूर्ण माध्यम बनले आहे. सोशल नेटवर्किंग हा इंटरनेटच्या महाजालातील परवलीचा शब्द आहे. सोशल मीडियावर असणे आत्ताच्या काळाची अनिवार्य गरज झाली आहे. तिथे नसण हे काळाबरोबर नसल्याचे लक्षण मानले जाते. सोशल मीडियाच्या माध्यमातून अनेकांना लोकांपर्यंत आपले विचार, मते, माहिती पोचवण्याचा एक नवा मार्ग पुढे आला आहे. आजच्या डिजीटल युगात सोशल मीडिया हा मुला-मुलींच्या आयुष्यात अगदी सहज समाविष्ट झाला आहे. त्यांना दिवसातले अनेक तास स्मार्टफोन, ॲप्स, सोशल नेटवर्कवर घालवायचे झाले आहेत. हे व्यासपिठ अनेक फायदे देते. संवाद, कल्पनाशक्ती, ज्ञान, सृजनात्मकता वाढीस लागते, पण त्याच वेळी काही धोकेही आहेत. वेळेची उलाढाल, मानसिक आरोग्यावर परिणाम, गोपनीयतेचा प्रश्न, सायबरबुलिंग, चुकीची माहिती इत्यादी. अशा स्थितीत मुलांना किती वर्षाचे झाल्यावर सोशल मीडिया वापरण्याची परवानगी द्यावी, हा एक मोठा सामाजिक-नीतीबद्ध प्रश्न बनला आहे. ऑस्ट्रेलिया सरकारने या पार्श्वभूमीवर मध्यंतरी एक अभिनव पण वादग्रस्त पाऊल उचलले. १६ वर्षाखालील मुलांना सोशल मीडियावर खाते उघडण्यास किंवा ठेवण्यास रोखणे किंवा त्यांना खाते मिळण्यापूर्वी थांबवणे, असा हा कायदा आहे. थोडक्यात सांगायचे तर, ऑस्ट्रेलियाच्या सरकारने जाहीर केले आहे की १६ वर्षाखालील मुलांनी सोशल मीडियावर खाते उघडणे किंवा कार्यरत राहणे टाळावे. यासाठी संबंधित सोशल मीडिया कंपन्यांवर वयाची खात्री करण्याची जबाबदारी टाकण्यात आली आहे. त्यांनी नियम न पाळल्यास मोठ्या दंडाची कारवाई केली जाणार आहे.

या कायद्यामागील भूमिका चर्चेत येऊन गेला काही काळ अनेक मतमतांतरे समोर येत राहिली. या कायद्याचा उद्देश म्हणजे अल्पवयीन मुलांना सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे होणाऱ्या मानसिक आणि सामाजिक नुकसानापासून वाचवावे. सरकारचे मत आहे की या वयात मुलांनी आभासी जगात हरवण्यापेक्षा वास्तव जगातले अनुभव, शिक्षण आणि प्रत्यक्ष संवादावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. अशी बंदी घालण्यामागे अनेक कारणे देण्यात आली आहेत. सोशल मीडियाचा मुलांच्या मानसिक आरोग्यावर होणारा नकारात्मक प्रभाव हा या बंदीमागील सर्वात मोठ्या कारणांपैकी एक मुद्दा आहे. सायबर बुलिंग, ऑनलाइन शोषण आणि तुलना करण्याची मानसिकता यासारख्या समस्यांमुळे मुले मानसिक तणावाचा सामना करतात, असे मत मांडले गेले आहे. सोशल मीडियाचे व्यसन ही एक गंभीर समस्या बनत चालली आहे. मुले तासनतास स्मार्टफोनवर घालवतात. त्यामुळे शैक्षणिक कामगिरी आणि सामाजिक संबंध प्रभावित होतात. आणखी एक दखलपात्र मुद्दा म्हणजे सोशल मीडियावर खोट्या माहितीचा प्रसार होण्याची शक्यता अधिक असते. मुले या खोट्या माहितीवर विश्वास ठेवतात. त्याचा त्यांच्या विचारांवर परिणाम होतो. शिवाय सोशल मीडियावर गोपनीयता राखणे कठीण असते. मुलांची वैयक्तिक माहिती चोरली जाण्याचा धोका असतो. त्यामुळे बेसावध राहून मुले एखाद्या अडचणीत सापडू शकतात.

असे असले तरी, बंदी घालणे कितपत व्यवहार्य आहे, असाही मुद्दा उपस्थित केला जात आहे. वस्तुतः कुठलीही बंदी कधीही प्रभावी ठरत नसते, असे म्हटले जाते. त्या पार्श्वभूमीवर या मुद्दयाची दुसरी बाजू समजून घेणेही आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे सोशल मीडियाचा वापर मोबाईल ॲप तसेच संगणकावरील सॉफ्टवेअरद्वारे होतो. काही सोशल मीडिया सॉफ्टवेअरवर बंदी घालणे म्हणजे 'प्लेस्टोअर' वरून हटवणे, ब्राऊजरवरून हाताळणे, फायरवॉलमार्फत टाळणे हे करता येऊ शकते. मात्र असे झाल्यास याच धाटणीचे पण नवीन उप्तादन निर्माण होऊ शकते. त्याचे नामकरण आणि प्रकार थोडा वेगळा असू शकतो. पूर्वी काही देशांनी पोर्नोग्राफिक वेबसाईट्सवर बंदी आणली. मात्र काही काळातच वेगळ्या नावांनी अशा वेबसाईट्स पुन्हा सुरु झाल्या आणि बंदीचा फज्जा उडाला. असे काही ऑस्ट्रेलियात घडते का, हे पहावे लागेल. या घडामोडी पाहता भारतासाठी काही धडे आणि उपाय असू शकतात का, असा प्रश्न उपस्थित होतो.भारत हा प्रचंड लोकसंख्येचा, विविध प्रकारची सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमी असलेला देश आहे. त्यामुळे येथे ऑस्ट्रेलियासारखा थेट बंदीचा कायदा लागू करणे व्यवहार्य ठरणार नाही. परंतु या निर्णयातून काही महत्त्वाचे धडे नकीच घेता येतील. या संदर्भातला पहिला मुद्दा म्हणजे टप्प्याटप्प्याने मर्यादा घालता येतील. पूर्ण बंदी घालण्याऐवजी भारतात वयोगटानुसार मर्यादा लागू करता येतील. उदाहरणार्थ, १३ ते १६ वयोगटासाठी मर्यादित वापर, वेळेची अट, पालकांची संमती आणि सुरक्षिततेचे नियम ठेवता येतील.

दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे डिजिटल शिक्षण आणि जागरूकता. यासाठी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये डिजिटल साक्षरतेचे शिक्षण देण्यात यावे. मुलांना सोशल मीडियाचा जबाबदारीने आणि सुरक्षितपणे वापर कसा करावा हे शिकवणे अत्यावश्यक आहे. पालक आणि शिक्षकांनाही या विषयावर प्रशिक्षण द्यावे. पालकांनी मुलांशी खुला संवाद ठेवावा, त्यांच्या ऑनलाइन क्रियाकलापांबद्दल माहिती ठेवावी आणि त्यांच्या वापरावर योग्य मर्यादा ठेवाव्यात. फक्त बंदी न घालता मुलांना समजावून सांगणे अधिक परिणामकारक ठरते. याखेरीज सरकारने सोशल मीडिया कंपन्यांवर अल्पवयीन वापरकर्त्यांच्या सुरक्षेसाठी कठोर नियम लावावेत. वयाची खात्री, सुरक्षित सामग्री, आणि वापर करावयाच्या वेळेवर नियंत्रण या गोष्टी बंधनकारक कराव्यात. पूर्ण बंदीऐवजी दिवसातून ठराविक वेळेसाठीच सोशल मीडियाचा वापर करण्याची मर्यादा ठेवणे हा अधिक वास्तववादी मार्ग ठरू शकतो. याखेरीज ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल भागांमधील मुलांसाठी सुरक्षित इंटरनेट केंद्रे, प्रशिक्षण कार्यक्रम आणि पालक मार्गदर्शन उपक्रम राबवणेही गरजेचे आहे. आधुनिक जगात सोशल मीडिया हे एक प्रभावी पण दुधारी अस्त्र आहे. योग्य वापर केल्यास ते ज्ञान, सर्जनशीलता आणि संवादासाठी उपयुक्त ठरते; परंतु अतिरेक झाल्यास मानसिक आणि सामाजिक नुकसान घडवू शकते. ऑस्ट्रेलियाचा निर्णय मुलांच्या हिताचा विचार करून घेतलेला आहे आणि त्यातून मानसिक आरोग्याचे आणि गोपनीयतेचे रक्षण होण्याची अपेक्षा आहे. मात्र त्याचबरोबर स्वातंत्र्य, अंमलबजावणी आणि शिक्षणाच्या संधींचे नुकसान होण्याचीही शक्यता आहे.

भारतात या विषयाकडे पाहताना संतुलित दृष्टिकोन आवश्यक आहे. पूर्ण बंदी न लावता शिक्षण, जागरूकता, पालकांचा सहभाग आणि तांत्रिक नियंत्रण यावर भर द्यायला हवा. अशा पद्धतीने आपण मुलांना सोशल मीडियाच्या दुष्परिणामांपासून सुरक्षित ठेवू शकतो आणि त्याच वेळी त्यांना डिजिटल युगाशी सुसंवादी पद्धतीने जोडून ठेवू शकतो. शेवटी मुलांचा डिजिटल प्रवास सुरक्षित, जबाबदार आणि सकारात्मक बनवणे ही फक्त सरकारची नव्हे, तर समाजातील प्रत्येक पालक, शिक्षक, आणि तंत्रज्ञान कंपनीची सामूहिक जबाबदारी आहे. अलिकडच्या काळात नेटवर्क चॅटमध्ये कर्मचारी फारच वेळ घालवतात असे दिसून आल्याने जगभरातील बहुतेक कार्यालयांमध्ये व्यक्तिगत रूपाने नेट वापरण्यास बंदी असते. अशा वेळी हे महाभाग ऑफिसची वेळ संपल्यानंतर घरी येऊन पुनः लॅपटॉप उघडून बसतात आणि कोणत्या तरी आभासी मित्रवर्तुळात मग्न होतात असे आढळून आले आहे . आपले दैनंदिन आयुष्य सोशल मीडियावर प्रकाशित करणे हा काहींचा छंद झाला आहे. अनेकांना 'इ व्यसनाधीन' बनवायचे काम त्यामुळे होत आहे. कुठलीही गोष्ट मर्यादित प्रमाणात मूल्य देते. सोशल मीडियाचेही असेच आहे. गरज असेल तरच ते वापरावे. मानव हा समाजशील प्राणी आहे. जात, धर्म, प्रांत, देश यांच्या सीमा ओलांडून मैत्रीचे बंध जोडणे, विचारांचे पूल बांधणे हे केवळ सोशल मिडियामुळेच शक्य होत आहे, हे कोणीही नाकारू शकणार नाही. पण त्याचा संयत, नियंत्रित आणि व्यापक सामाजिक हित डोळ्यांसमोर ठेवून वापर केला जाणे ही आवश्यक बाब आहे. आणि हे केवळ स्वयं शिस्तीच्या माध्यमातूनच शक्य आहे.

# मिनीडोअर चालकांचा प्रश्न कधी सुटणार

प्रमोद जाधव

शिक्षण असूनही नोकरी नाही, त्यामुळे जिल्ह्यातील असंख्य तरुणांनी कर्जबाजारी होत मिनीडोअर, मॅक्ससारखी वाहने घेऊन प्रवासी सेवा दिली. ग्रामीण भागातील प्रवाशांना रात्रीचा दिवस करून सेवा देण्याचे काम मिनीडोअर चालक व मालक करीत आहेत. यातूनच ही मंडळी आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवित आहेत. मात्र या वाहनांची वयोमर्यादा वाढविण्याबाबत प्रशासनाकडून कार्यवाही केली जात नाही. त्यामुळे मिनीडोअर चालक व मालक आक्रमकतेच्या भूमिकेत जात तीव्र आंदोलन करतात. तरीदेखील त्यांना फक्त आश्वासन दिले जाते. आपल्या न्याय हक्कासाठी झटणाऱ्या ग्रामीण भागातील मिनीडोअर चालक व मालकांच्या प्रश्नांचा विचार कधी होणार असा प्रश्न कायमच जनतेतून विचारला जात आहे. मिनीडोअर चालक व मालकांनी त्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी लढा पुकारला होता. साखळी उपोषण केले होते. त्यावेळीदेखील आश्वासन देण्यात आले होते. त्यामुळे रायगड जिल्हा मिनीडोअर चालक मालक संघाचे जिल्हा अध्यक्ष विजयभाऊ पाटील यांनी आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता. त्यांच्या इशाऱ्यानंतर सर्वच यंत्रणा कामाला लागली. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन केले होते. अखेर तत्कालीन मुख्यमंत्री यांच्यासोबत बैठक ठरली. या बैठकीत मिनीडोअर चालक, मालकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेऊन अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले होते. विशिष्ट कालावधीतच हे काम करण्याच्या सुचना संबंधित विभागाला दिल्या होत्या. मात्र त्याची अंमलबजावणी अधिकाऱ्यांकडून करण्यात आली नाही. वयोमर्यादा संपुष्टात आल्यावर चालू स्थितीतील वाहने स्क्रॅपला जाण्याची भिती आहे. परवानेदेखील रद्द होऊन चालक व मालकांच्या व्यवसायावर त्याचा परिणाम होणार आहे. बदली वाहने शासनाकडे उपलब्ध नाहीत. बेरोजागारी व कौटुंबिक उपासमारी होण्याची शक्यता आहे. वयोमर्यादा वाढविण्याबाबत कार्यवाही केली जात नाही, असा आरोप करीत टॅक्सी चालक मालकांनी बुधवारी (दि.१२) नोव्हेंबरला निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांची भेट घेऊन त्यांच्याकडे गाऱ्हाणे मांडले. अधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबतही त्यांनी नाराजी व्यक्त केली. मिनीडोअर चालक व मालकांनी आक्रमतेची भूमिका घेतली असून तातडीने कार्यवाही न झाल्यास येत्या १९ नोव्हेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल असा इशारा रायगड जिल्हा विक्रम मिनीडोअर चालक व मालक संघाच्यावतीने विजय भाऊ पाटील यांनी दिला होता. रायगड जिल्ह्यामध्ये विक्रम, मिनीडोअरसह टॅक्सीची संख्या साडेतीन हजार आहे. या व्यवसायातून स्थानिक मंडळी आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवित आहेत. अनेकांनी कर्ज काढून गाड्या घेतल्या आहेत. कर्जाचे हप्ते या व्यवसायातून फेडण्याचे काम चालक व मालक करीत आहेत. मात्र जिल्ह्यातील विक्रम, मिनीडोअरची वयोमर्यादा संपुष्टात आल्यावर शासन निर्णयानुसार, ती वाहने स्क्रॅप केली जाणार आहेत. त्यामुळे चालक व मालकांची परवाने रद्द केली जातील. चालक व मालकांवर मोठे आर्थिक संकट निर्माण होईल. शासनाकडून पर्यायी वाहनाची व्यवस्था नाही. विशिष्ट कालावधीत अंमलबजावणी करण्याचे सांगण्यात आले होते. मात्र दोन वर्षे उलटूनही त्याची कार्यवाही झाली नाही. समस्या सोडविण्यास संबंधित विभागाचे अधिकारी जाणूनबूजून दिरंगाई करीत आहेत, असा आरोप करण्यात आला आहे. शासनाचे पुन्हा लक्ष वेधण्यासाठी विजयभाऊ पाटील यांच्या नेतृत्वाखाली मिनीडोअर चालक मालक संघटनेचे काही पदाधिकारी यांनी निवासी उपजिल्हाधिकारी यांची भेट घेतली. इको टॅक्सी वाहन पासिंगच्यावेळी जीपीएस सक्ती करण्यात आली. यासाठी १२ हजारहून अधिक रक्कम मोजावी लागली. मात्र यावर्षी वाहन पासिंगसाठी जीपीएसला ग्राह्य धरले जात नाही. त्यामुळे परिवहन विभागातील अधिकाऱ्यांनी फसवणूक केल्याचा आरोप होत आहे. ही बाब निदर्शनास आणून दिली. प्रलंबित मागण्यांची दखल न घेतल्यास १९ नोव्हेंबरला तीव्र आंदोलन केले जाईल अशा इशारा यावेळी निवेदनातून देण्यात आला होता. मिनीडोअर चालक मालकांनी मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला होता. मात्र आचारसंहिता असल्याने प्रशासनाने मोर्चाची परवानगी नाकारली. त्यामुळे तुर्तास हा मोर्चा स्थगित करण्यात आला असल्याची माहिती संघटनेकडून देण्यात आली. निवडणूकीनंतर आचारसंहिता संपल्यानंतर १२ डिसेंबरला मोर्चा काढणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांना निवेदन देण्यात आले आहे. सध्या नगरपालिकांची निवडणूका असल्याने आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. मोर्चे, आंदोलने करण्यास बंदी घालण्यात आली आहे. परंतु ग्रामीण भागातील प्रवाशांना सेवा देणाऱ्या मिनीडोअर चालक व मालकांच्या प्रश्नांचा विचार शासन कधी करणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. १२ डिसेंबरला मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चासाठी सोळा दिवस शिल्लक आहेत. या सोळा दिवसाच्या आत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करून मिनीडोअर चालक व मालकांना न्याय द्यावा.

लोकसंसद

## वृक्षवल्लींनो आम्हांला क्षमा करा

नाशिक पालिका प्रशासनाने नाशिकच्या सिंहस्थ कुंभमेळ्यात साधूंच्या निवासासाठी तपोवन परिसरातली तब्बल १८०० झाडे तोडण्याचा घाट घातला असताना आणि त्याला नागरिकांकडून तीव्र विरोध असतानाच, आता जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (जेएनपीए) जवळील पागोटे ते मुंबई-पुणे महामार्गावरील चौक या दरम्यान ४५०० कोटी रुपये खर्चून बांधण्यात येणाऱ्या २९.२१९ किमीच्या नव्या महामार्गासाठी तब्बल ११ हजार ५०० झाडांवर कुऱ्हाड चालविली जाणार आहे. तसेच ३ हजार ९०३ खारफुटींचाही यात बळी जाणार आहे. खरे तर येथे झाडांचे मरण रोजच होत असते. मेट्रो रेल्वे, गृहनिर्माण प्रकल्प, विविध नागरी सुविधा, रस्ता रुंदीकरण, पायाभूत प्रकल्प इत्यादींच्या नावाखाली हजारो झाडांची अमानुषपणे कत्तल केली जाते. एकीकडे 'झाडे लावा, जीवन वाचवा','वन्यसंपदेचे, वन्यजीवांचे रक्षण करा' असे अनेक संदेश वेळोवेळी सरकारकडून दिले जातात. पण लोकांना 'झाडे वाचविण्याचा, पर्यावरण रक्षणाचा' संदेश देणाऱ्या सरकारचा हात विकासाच्या नावाखाली राज्यातील बेसुमार वृक्षसंहार होत असताना आखडता घेतला जातो. झाडांचे योग्य ते पुनर्रोपण, संवर्धन आणि जतन करावे असे आदेश उच्च न्यायालयानेही वेळोवेळी दिले आहेत. परंतु येथे झाडांचे मरण काही टळत नाही. शेवटी आपण एवढेच म्हणू शकतो, 'वृक्षवल्लींनो आम्हांला क्षमा करा. कारण तुमच्या मरण्यावरच आमचा विकास आणि आमचे जगणे अवलंबून आहे. **-प्रदीप अनुसया शंकर मोरे**

## घराणेशाही आणि बिनविरोध

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २ डिसेंबर रोजी होणार आहेत. पण मतदानाची वेळ येण्याआधीच अनेक ठिकाणी घाऊक प्रमाणात उमेदवार बिनविरोध निवडून येत असल्याचे दिसते. विशेष म्हणजे या बिनविरोधात आघाडीवर असलेले उमेदवार हे बहुतांश सत्ताधारी पक्षांशी संबंधित आणि स्थानिक नेत्यांचे नातेवाईक आहेत. साम, दाम, दंड, भेद वापरुन प्रतिस्पर्धी उमेदवारांना माघार घ्यायला लावणे, दबाव टाकणे, किंवा अर्ज छाननीत अर्ज बाद होण्यासाठी प्रयत्न करणेअशा तऱ्हेने बिनविरोध निवड मिळवली जात असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. त्यामुळे या बिनविरोध निवडीची शुद्धता आणि पारदर्शकतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विरोधक उभे राहणार नाहीत, आवाज उठवणारे शिल्लक राहणार नाहीतही मानसिकता लोकशाहीच्या मूलभूत रचनेलाच धक्का देणारी आहे. मतदारांना निवडीचा अधिकार नाकारणे म्हणजे लोकशाहीतून हळूहळू हुकुमशाहीकडे वळण्याचा संकेतच म्हणावा लागेल. **दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

दिनविशेष

# महिलांविरुद्ध हिंसाचार निर्मूलन दिन

महिला दिनासारख्या दिवसांमध्ये महिलांच्या हक्कांवर खूप चर्चा केली जाते. मात्र, आश्चर्याची गोष्ट म्हणजे महिलांवरील हिंसाचार संपवण्यासाठी एक दिवस स्वतंत्रपणे देखील साजरा केला जातो. दुर्दैवाने, ती एक मोठी गरज बनली आहे. एवढेच नाही तर जगातील अनेक देशांमध्ये जिथे महिलांना पुरुषांच्या बरोबरीने अनेक अधिकार मिळाले आहेत. तरीही महिलांवरील हिंसाचार निर्मूलनासाठीच्या आंतरराष्ट्रीय दिवसाची प्रासंगिकता कायम आहे. ते पाळण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी दरवर्षी २५ नोव्हेंबरचा दिवस निश्चित केला आहे. यावेळी संयुक्त राष्ट्रांनी कोरोना काळात महिलांवर होत असलेल्या अत्याचारांमध्ये वाढ झाल्यावर चिंता व्यक्त केलीय. महिला हिंसाचार निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय दिवस आहे. ज्याच्यावर विश्वास ठेवून आयुष्य काढायचे स्वप्न बघायचे तोच कधी तुकडे करतो, कधी जाळून मारतो तर कधी विहिरीत ढकलतो, अशा घटना आपण कायमच ऐकत असतो. नुकतीच झालेली श्रध्दा वालकर केस असो किंवा त्यानंतर समोर आलेल्या अजून अनेक घटना या दिवसाची गरज अजून तीव्रतेने जाणवून देतात. म्हणूनच "महिलांवरील हिंसाचार निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय दिवस" या दिवसाविषयी आपल्या समाजात जागृकता निर्माण करणं किती गरजेच आहे हे जाणवतं. या घटना फक्त भारतातच नाही तर संपूर्ण जगभरात घडत असतात. युनायटेड नेशन्सच्या एका अहवालानुसार, १५ ते ४९ वर्षे वयोगटातील जवळपास १९ टक्के स्त्रियांना जोडीदाराकडून शारीरिक आणि/किंवा लैंगिक हिंसाचाराचा सामना करावा लागतो. काही प्रकरणांमध्ये, या हिंसाचाराचा शेवट महिलांच्या मृत्यूमध्ये होतो. अशाच एका हृदय पिळवटून टाकणाऱ्या महिलांवरील अत्याचाराच्या निषेधात या दिवसाची सुरूवात झाली. आत्ताच्या काळात भारतातच नव्हे तर संपुर्ण जगात महिलांवरील अत्याचाराच्या घटना वाढल्या आहेत. १९८१ पासून महिला हक्क कार्यकर्त्यांनी २५ नोव्हेंबर हा दिवस लिंग-आधारित हिंसाचाराच्या विरोधात दिवस म्हणून पाळला आहे. डोमिनिकन रिपब्लिकमधील तीन राजकीय कार्यकर्त्यां, मिराबल बहिणींच्या सन्मानार्थ ही तारीख निवडण्यात आली होती, ज्यांची १९६० मध्ये देशाचे शासक राफेल ट्रुजिलो (१९३०-१९६१) यांच्या आदेशाने निर्घृण हत्या करण्यात आली होती. २० डिसेंबर १९९३ रोजी, महासभेने ठराव ४८/१०४ द्वारे महिलांवरील हिंसाचार निर्मूलनाचा जाहीरनामा स्वीकारला, ज्यामुळे जगभरातील महिला आणि मुलीं-वरील हिंसाचार निर्मूलनाचा मार्ग मोकळा झाला. अखेर, ७ फेब्रुवारी २००० रोजी, महासभेने ठराव ५४/१३४ स्वीकारला, ज्याने २५ नोव्हेंबर हा दिवस महिलांवरील हिंसाचार निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय दिवस म्हणून अधिकृतपणे घोषित केला आणि असे करताना, सरकारे, आंतरराष्ट्रीय संस्था तसेच स्वयंसेवी संस्थांना एक त्र येऊन दरवर्षी त्या तारखेला या समस्येबद्दल जनजागृती करण्यासाठी डिझाइन केलेले उपक्रम आयोजित करण्याचे आमंत्रण दिले. महिलांविरुद्ध हिंसाचार ही जागतिक समस्या आहे, जी केवळ त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला नुकसान पोहोचवत नाही, तर समाजाच्या प्रगतीलाही अडथळा ठरते. घरगुती हिंसा, मानवी तस्करी, लैंगिक शोषण, आणि वांशिक भेदभाव यांसारख्या समस्यांमुळे महिला अनेक आव्हानांना सामोऱ्या जातात. या दिवशी विविध सामाजिक संघटना, शाळा, आणि सरकारी संस्था जनजागृती मोहीम, चर्चासत्रे, आणि कार्यशाळांचे आयोजन करतात. महिलांना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण, कायद्यांची माहिती, आणि त्यांना आर्थिक स्वावलंबी बनवण्यासाठी विविध योजना राबवल्या जातात. हिंसाचारमुक्त समाज घडवण्यासाठी प्रत्येकाने महिलांचा सन्मान राखणे, समानता प्रस्थापित करणे, आणि त्यांना सुरक्षित वातावरण निर्माण करणे ही आपली जबाबदारी आहे. महिलांच्या हक्कांसाठी अनेक कायदे करण्यात आले आहेत. मात्र, आजही अनेक देशांत त्यांना ते अधिकार मिळालेले नाहीत, ज्यावरुन ते म्हणू शकतात की आपण निरोगी समाजात जगत आहोत. तरीही कौटुंबिक हिंसाचार हा एक वेगळा मुद्दा म्हणून उदयास आला आहे. यामुळे ही समस्या सामाजिक तसेच कौटुंबिक मूल्ये, शिक्षण आणि मानसिक आरोग्याशी खोलवर संबंधित आहे.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
www.krushival.in
मंगळवार, दि.२५ नोव्हेंबर, २०२५


**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**२५ नोव्हेंबर**

१) श्री.भालचंद्र लक्ष्मण पिंगळे
पंतनगर-२, चेंढरे
२५-११-१९५७

# प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करा

## वरिष्ठ अधिकाऱ्यांचे निर्देश; प्रशासनाकडून विकासकामांचा आढावा

**। पालघर । प्रतिनिधी ।**

पालघर जिल्ह्याच्या जव्हार आणि मोखाडा या दोन्ही आदिवासीबहुल तालुक्यांमध्ये मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत सुरू असलेल्या विविध विकासकामांचा सविस्तर आढावा जिल्हा परिषद प्रशासनाने घेतला आहे. विकासकामांना गती देऊन प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून विकास योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याचे निर्देश यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिले.



जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी २० नोव्हेंबर रोजी मोखाडा तालुक्यातील विकासकामांची प्रगती तपासली. प्रकल्प संचालिका डॉ. रूपाली सातपुते यांनी डिसेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत सर्व अपूर्ण घरकुले (प्रधानमंत्री जनमन योजना, शबरी आवास योजना, रमाई आवास योजना) पूर्ण करण्याबाबत मार्गदर्शन केले. मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी मोखाडा तालुक्यातील पाणीटंचाईच्या समस्येवर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा-उमेद अंतर्गत तालुक्यातील सर्व महिलांचा स्वयं-साहाय्यता गटांमध्ये समावेश व्हावा, यासाठी आवश्यक नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी अतुल पारस्कर यांनी सार्वजनिक शौचालय प्रकल्पांची पूर्तता आणि मनरेगा कामांचा आढावा घेतला.

बैठकीनंतर मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी प्रत्यक्ष स्थळी जाऊन पूर्ण झालेल्या व अपूर्ण घरकुलांची पाहणी केली आणि लाभार्थ्यांशी संवाद साधला. तसेच, मनरेगा अंतर्गत तुळ्याचा पाडा येथे गायगोठ्याचे भूमिपूजन देखील करण्यात आले. मोखाडा तालुक्याने समृद्ध पंचायत राज अभियानात उल्लेखनीय स्थान मिळवावे, यासाठी कामाला अधिक गती देण्याचे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी केले.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे यांनी जव्हार तालुक्यातील विकासकामांचा २१ नोव्हेंबर रोजी आढावा घेतला. या बैठकीला उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) अशोक पाटील आणि प्रभारी गटविकास अधिकारी संदेश दुमाडा उपस्थित होते.

आढावा बैठकीपूर्वी रवींद्र शिंदे यांनी साकुर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन आरोग्य सुविधा आणि रुग्णसेवेची पाहणी केली. तसेच, मनरेगा अंतर्गत सुरू असलेल्या विहिरीच्या कामाची गुणवत्ता तपासून आवश्यक सूचना दिल्या आणि घरकुलांची देखील पाहणी केली.

बैठकीदरम्यान घरकुल योजना, मनरेगा कामे, पाणीटंचाई उपाययोजना, ग्रामपंचायत कामकाज, सार्वजनिक शौचालय आणि तालुक्यातील इतर सक्रिय विकास प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. सर्व प्रलंबित कामांना गती देऊन नियोजित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश अधिकारी-कर्मचाऱ्यांना देण्यात आले.

## ‘हमारा शौचालय, हमारा भविष्य’ मोहीम

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी।**

केंद्र व राज्याच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जागतिक शौचालय दिनानिमित्त सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) विभागामार्फत ङ्गहमारा शौचालय, हमारा भविष्यफ ही विशेष मोहीम सुरू करण्यात येत आहे. ही मोहीम मानवी हक्क दिनापर्यंत म्हणजे १० डिसेंबरपर्यंत राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत व सिंधुदुर्गवासीयांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र खेबुडकर यांनी केले आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व गावांतील वैयक्तिक शौचालये व सामुदायिक शौचालयांची तपासणी, दुरुस्ती, देखभाल व सुशोभीकरणावर विशेष लक्ष देण्यात येणार आहे. अपूर्ण किंवा दुरुस्तीची गरज असलेल्या सार्वजनिक शौचालयांची दुरुस्ती करण्याचे निर्देश दिले आहेत. या कालावधीत शाळा, ग्रामसभा, स्वयंसहाय्यता गट, युवक मंडळे, निवृत्त सैनिक, सामाजिक कार्यकर्त्यांचा सहभाग घेऊन स्वच्छता, आरोग्य, सुरक्षित मलनिःस्सारण तसेच हवामान अनुकूल स्वच्छतेबाबत जनजागृती केली जाणार आहे. ग्रामस्थांना त्यांच्या वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयांची रंगरंगोटी, सुशोभीकरण आणि नियमित देखभालीसाठी प्रोत्साहित केले जाणार आहे. मोहिमेचा समारोप १० डिसेंबरला करून उत्कृष्ट शौचालय पुरस्कार जाहीर केले जातील.

## अंगणवाडी शिक्षिकांवर सातवीपर्यंत शिकवण्याची सक्ती

### • भाईंदर पालिकेच्या प्रशासनाचा विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

प्राथमिक किंवा माध्यमिक शाळांमध्ये शिकवण्यासाठी डीएड तसेच बीएडची पदवी असणे बंधनकारक आहे. मात्र भाईंदर महापालिकेने सर्व नियम धाब्यावर बसवत चक्क बालवाडीच्या २४ महिला शिक्षिकांवर सातवीपर्यंत शिकवण्याचे ओझे लादले आहे. मीरा-भाईंदर पालिका प्रशासनाचा हा कारभार म्हणजे हजारो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळण्याचा प्रकार असून हा फतवा तात्काळ रद्द करावा, अशी मागणी पालकांनी केली आहे. तसेच बालवाडीच्या शिक्षिकांनीही या वाढीव कामाला कडाडून विरोध केला आहे.

मीरा, भाईंदर शहरात महापालिकेच्या ३६ शाळा आहेत. यामध्ये ९ हजार ८७० गोरगरीब विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच पालिकेच्या काही बालवाडीचे वर्गदेखील असून यावर २४ महिला शिक्षिका शिकवत आहेत. या शिक्षिका चार तास बालवाडीतील मुलांना शिकवून राहिलेल्या पुढील चार तासांत शासकीय, पालिकेच्या विविध मोहिमा व सर्वेक्षणाचे काम फत्ते करत असतात. मात्र आता या सर्व शिक्षिकांना पहिली ते सातवीपर्यंत शिकवण्याची सक्ती करण्यात आली आहे. तसे पत्रच प्रशासनाने जारी केले आहे.

> बालवाडी शिक्षिका पालिकेच्या आस्थापनेवर का बालवाडी शिक्षिका आस्थापनेवर विद्यार्थ्यांना शिकवण्यात त्यांची मदत व्हावी याकरिता बालवाडी शिक्षिकांना मोकळीक दिली आहे. या उद्देशाने हे आदेश दिले आहेत.
> – दीपाली जोशी-पोवार,
> शिक्षण अधिकारी,
> भाईंदर महापालिका

बालवाडीच्या शिक्षिकांकडे महापालिकेने पहिली ते सातवीपर्यंत शिकवण्याची जबाबदारी लादली आहे. याविरोधात अनेकांनी टीकेची झोड उठवल्यानंतर प्रशासनाने या सर्व शिक्षिकांना प्रशिक्षण देण्याची तयारी सुरू केली आहे.

## मंदिरात चोरी करणाऱ्याला अटक

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मंदिरात चोरी करणाऱ्या एकाला दहिसर पोलिसांनी अटक केली. बादलकुमार दास असे आरोपीचे नाव असून त्याच्याकडून रोख रक्कम आणि वाहनाच्या बॅटरी जप्त करण्यात आल्या आहेत. दासच्या अटकेने एका गुन्ह्याची उकल करण्यात दहिसर पोलिसांना यश आले आहे. दहिसर येथे एक मंदिर आहे. त्या मंदिरात तक्रारदार हे ट्रस्टी म्हणून काम करतात. तीन दिवसांपूर्वी त्याने मंदिर बंद केले. दुसऱ्या दिवशी सकाळी मंदिरात एक भाविक आला. त्याला मंदिरात चोरी झाल्याचे लक्षात आले. हा प्रकार संशयास्पद वाटल्याने त्याने याची माहिती तक्रारदारांना दिली. मंदिरातील तीन दानपेट्यांतून आठ हजार रुपयांची रोकड चोरी झाली. याप्रकरणी तक्रारदारांनी दहिसर पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा नोंद केला. याबाबत तपासासाठी एक पथक तयार केले. पोलिसांनी तांत्रिक माहितीच्या आधारे दासला ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून पोलिसांनी रोख रक्कम आणि बॅटरी जप्त केल्या आहेत. काही दिवसांपूर्वी त्याने त्या बॅटऱ्या चोऱ्या केल्याचे त्यांनी सांगितले.

## घाटकोपरमधील चाळीत आग; चार मुलांसह सहा जण जखमी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

घाटकोपरमध्ये एका चाळीत आग लागली. ही घटना सोमवारी (दि.२४) दुपारी घडली. या आगीत चार मुलांसह किमान सहा जण जखमी झाले आहेत. प्रतीक कुमार मुखिया (१०), गौरी मुखिया (१०), प्रशांत विश्वकर्मा (९), पूजा मुखिया (६), दलत देवी मुखिया (४०) आणि नागेश्वर मुखिया (४५) अशी जखमींची नावे असून त्यांना राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

ही दुर्घटना पंतनगरमधील ९० फूट रोडवरील साई नगर येथे दुपारी १२.४९ वाजताच्या सुमारास घडली. आगीत विद्युत वायरिंग आणि इन्स्टॉलेशन्स, गळती होणारा एलपीजी सिलेंडर, गॅस स्टोव्ह, भांडी, घरगुती कपडे आणि इतर घरगुती साहित्याचा समावेश होता. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दल, पोलीस पथके, बीएमसी वॉर्ड कर्मचारी आणि १०८ रुग्णवाहिका तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यास अग्निशमन दलाला यश मिळाले.

## टँकर अपघातात चालकाचा मृत्यू

**चिपळूण :** चिपळूणमधील शिरगाव - गुहागर - विजापूर मार्गावरील वाशिष्ठी नदीच्या पुलाजवळील कॅनल परिसरात भीषण अपघात घडला. रविवारी (दि.२३) रात्री १०.३० वाजताच्या सुमारास टँकर पलटी झाला. या अपघातात चालकाचा जागीच मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, टँकरचालक चिपळूणकडे जात असताना हा अपघात झाला. टँकर घसरू लागल्याने चालकाने उडी मारण्याचा प्रयत्न केला; मात्र टँकर पलटी झाल्याने तो त्यातच अडकून त्याचा मृत्यू झाला.

## नोकरीचे आमिष दाखवून सहा जणांची फसवणूक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलमध्ये एका व्यक्तीने सहा जणांना नोकरी लावतो म्हणून तब्बल १६ लाख ४४ हजार ४९९ रुपयांची फसवणूक केली आहे. पनवेल प्लाझा या कॉ.ऑप. सोसायटीतील व्यक्तीने ही फसवणूक केली आहे. मागील वर्षी फेब्रुवारी महिन्यात या फसवणुकीची सुरूवात झाली.

फसगत झालेला तरूण नेरूळ येथे राहत असून तो भारतीय पोस्ट विभागात कंत्राटी कामगार आहे. कायम स्वरूपी नोकरी मिळावी यासाठी त्याच्या काही ओळखीच्या व्यक्तीने पनवेलमधील या व्यक्तीचे नाव सूचविले होते. पनवेल शहरातील पनवेल प्लाझा या इमारतीमध्ये या व्यक्तीचे कार्यालयात सुरूवातीला तरूणाची भेट झाली. स्वतः डीआरआय विभागात वरिष्ठ पदावर आणि त्याचे सहकारी कॅप्टन असून ते मर्चंट नेव्हीमध्ये नोकरी लावतात, अशी दोघांची ओळख करून या तरूणाचा विश्वास संपादन केला. सरकारी कार्यालयात किंवा महाराष्ट्र सिक्युरीटी बोर्डात कामाला लावण्यासाठी ७० हजार रुपयांची मागणी केली.

नोकरी लागणार असल्याने या तरूणाने ७० हजार बँकेच्या बचत खात्यातून वळते केले. मात्र १० महिने नोकरी न लावत असल्याने वारंवार संपर्क केल्यावर त्यांना मुंबई येथील मंत्रालयाजवळ बोलावले. मंत्रालयाच्या सूरक्षा रक्षकाच्या केबीनमध्ये एका अधिकाऱ्यासोबत या नोकरी मिळण्यासाठी पाठपुरावा करणाऱ्या तरूणाची ओळख करून देण्यात आली. या अधिकाऱ्यानेही नोकरीसाठी प्रयत्न करतो, असे या तरूणांना सांगितले. मात्र अनेक महिने नोकरी लागत नसल्याने या तरूणाने दिलेल्या ७० हजार रुपयांची परत देण्याची मागणी केली. त्यावेळी उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. अखेर आपल्याप्रमाणे इतर पाच तरूणांची फसवणूक झाल्याचे समजले.

## निवडणुकीत मतपत्रिकांचा वापर करावा

### आझीम जैतापकर यांची मागणी

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

राजापूर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका पारदर्शक आणि निष्पक्ष प्रक्रियेसाठी निवडणुकांमध्ये मतपत्रिकांचा वापर करण्यात यावा, अशी मागणी काँग्रेसचे शहराध्यक्ष आझीम जैतापकर यांनी निवडणूक अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. मतपत्रिकेचा वापर निवडणूक व्यवस्थेवर विश्वास निर्माण करण्यास मदत करेल आणि प्रत्येक मत अचूकपणे नोंदवले जाईल आणि मोजले जाईल याची खात्री करेल, असा विश्वासही त्यांनी निवेदनाद्वारे व्यक्त केला आहे.



निवडणूक आयोगाच्या कामकाजाच्या भूतकाळातील अनुभवांमुळे पारदर्शकता आणि जबाबदारीबद्दल चिंता निर्माण झाली आहे. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेच्या अभावामुळे यंत्रणेच्या अखंडतेबद्दल प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

मतदान करणाऱ्या मतदारांच्या डाटाबद्दल प्रश्न उपस्थित केले जात असून, त्यांची पुरेशी दखल घेतली गेली नाही. इलेक्ट्रॉनिक मतदार यंत्रांच्या (ईव्हीएम) वापरामुळे निकालांबद्दल आणखी गुंतागुंत आणि शंका निर्माण झाल्या आहेत. मतमोजणी प्रक्रियेतील पारदर्शकतेचा अभाव आणि जनतेला मतमोजणी तपशील उपलब्ध नसल्यामुळे निवडणूक प्रक्रियेच्या अखंडतेबद्दल चिंता निर्माण झाली आहे. हे आपल्या लोकशाही मूल्यांच्या विरूद्ध असल्याचे त्यांनी निवेदनामध्ये नमूद केले आहे.

## अपंगांना मेट्रो तिकीट दरात सवलत

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

कफ परेड-वांद्रे-सीप्झ-आरे भुयारी मेट्रो ३' मार्गिकेवरून प्रवास करणाऱ्या अपंग प्रवाशांना तिकिट दरात सवलत देण्याचा निर्णय मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) घेतला होता. त्यानुसार रविवारपासून अपंगांना तिकिट दरात २५ टक्के सवलत देण्याचा निर्णय लागू करण्यात आला. अपंगांना ‘मेट्रोकनेक्ट -३’ या ॲपचा वापर करत या सुविधेचा लाभ घेता येणार आहे. अपंगांना एसटी आणि बेस्ट बसमध्ये तिकिट सवलत आहे. तर लोकल आणि लांब पल्ल्याच्या रेल्वेत ८० टक्के अपंगत्व असलेल्या व्यक्तीला तिकिट दरात ७५ टक्के, तर त्यांच्या मदतनीसाला तिकिट दरात ५० टक्के सवलत देण्यात येते. ‘घाटकोपर अंधेरी-वर्सोवा मेट्रो १’ मार्गिकेसह ‘दहिसर-अंधेरी पश्चिम मेट्रो २ अ’ आणि ‘दहिसर-गुंदवली मेट्रो ७’ मार्गिकांवरही अपंगांना तिकिट दरात सवलत देण्यात येते. मात्र ‘मेट्रो ३’ मार्गिकेवर अद्याप अशी सवलत लागू केलेली नाही. त्यामुळे अपंगांच्या संघटनांच्या प्रतिनिधींनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन ‘मेट्रो ३’ मार्गिकेवरून प्रवास करणाऱ्या अपंगांना तिकिट दरात सवलत देण्याची मागणी केली होती.

## बिबट्याच्या हल्ल्यात म्हैस ठार

**रत्नागिरी :** निरुळ-ठिकवाडी येथे बिबट्याने रामचंद्र धोंडू माटल यांच्या म्हैशीवर हल्ला करून तिला ठार केले. या परिसरात पुन्हा एकदा बिबट्याने हल्ला केल्यामुळे परिसरामध्ये भीतीचे वातावरण आहे. या घटनेची माहिती तातडीने वनरक्षक विराज संसारे, पशुवैद्यकीय अधिकारी कल्याण नवले, ग्राममहसूल अधिकारी मयुर पानसरे, पोलिसपाटील नीलेश ठीक, उपसरपंच शांताराम नावले आदींना दिली असता त्यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला.

**शहराचे सौंदर्य वाढवण्यासाठी पालिकेचा उपक्रम** | **परिसर स्वच्छ राहण्यास मदत**

# कचऱ्याच्या ठिकाणांचे होणार सुशोभिकरण

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

परिसरातील अस्वच्छता निर्मुलनाबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. याच प्रयत्नांमध्ये आता आणखी एका नव्या अध्यायाची भर पडली आहे. महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या संकल्पनेतून शहरात वारंवार कचरा पडणारी ठिकाणे स्वच्छ करून सुशोभित करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे.




शहरातील काही ठिकाणांवर पडणाऱ्या उघड्या कचऱ्यामुळे, त्याभागातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्यासह शहराचा चेहरामोहराही आणखीनच विद्रूप होऊ लागला होता. त्यावर आता घनकचरा व्यवस्थापन विभागाने अनोखी शक्कल लढवत अशा वारंवार कचरा पडणाऱ्या ठिकाणांना कायमस्वरूपी स्वच्छ राखण्याच्या दिशेने एक मोहीम हाती घेतली आहे. त्याअंतर्गत कल्याण पश्चिमेतील बारावे जलशुध्दीकरण केंद्र परिसर, बारावे गाव या दोन आणि ठाकुर्ली पूर्वेच्या स्टेशन रोड परिसरात एका ठिकाणाचे सुशोभीकरण करण्यात आले आहे. कल्याणातील तीन प्रभागात महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांमार्फत तर उर्वरित सात प्रभागांमध्ये सुमित एल्कोप्लास्ट कंपनीच्या सफाई कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून ही मोहीम राबविण्यात येत आहे.

शहरातील काही भागांमध्ये नागरिकांनी उघड्यावर टाकलेल्या कचऱ्यामुळे स्थानिक रहिवाशांच्या आरोग्याला धोका निर्माण होत होता. त्याचबरोबर शहराचे सौंदर्यही बाधित होत होते. हीच समस्या ओळखून महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने अशा ठिकाणांचे मूळ कारण शोधण्यासाठी शोधमोहीम सुरू केली. या तपासात रात्रीच्या वेळी काही मोकळ्या जागांवर कचरा फेकला जात असल्याचे निदर्शनास आले. या समस्येवर उपाय म्हणून महापालिकेकडून आता रात्रीच्या सत्रातदेखील घंटागाडी पाठवली जात आहे. नागरिकांना रस्त्यावर कचरा न टाकता तो केवळ घंटागाडीमध्येच देण्याचे आवाहन उपायुक्त रामदास कोकरे यांनी केले आहे. महापालिका कर्मचाऱ्यांकडून कचरामुक्त आणि स्वच्छ केलेली कचऱ्याची ठिकाणे आकर्षक दिसणार आहेत.

### घंटागाडीमार्फत कचरा संकलन

मे २०२० पूर्वी शहरात तब्बल ३ हजार ७०० कचराकुंड्या अस्तित्वात होत्या. मात्र कचराकुंडीत वाढत जाणारी अस्वच्छता आणि दुर्गंधी पाहता या सर्व कचराकुंड्या हटवून घंटागाडीमार्फत कचरा संकलन प्रणाली सुरू करण्यात आली. या व्यवस्थेमुळे परिसर स्वच्छ राहण्यास मदत झाली असून आता चालू सुशोभिकरण मोहिमेमुळे या ठिकाणी नवीन हरित कोपरे उभे राहत आहेत. यामुळे शहराच्या सौंदर्याकरणात मोलाची भर पडणार आहे.

# निवडक

## साखळोली-शिवाजीनगर पुलाची दुरवस्था



**दापोली :** कोकणातील पर्यटननगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दापोली तालुक्यातील साखळोली-शिवाजीनगर रस्त्यासह पुलाची दुरवस्था झाली आहे. रस्त्यातील खड्डे, उघड्यावर आलेल्या लोखंडी सळ्या आणि तुटलेल्या पुलाची अवस्था पाहता रस्त्यात खड्डे की, खड्ड्यात रस्ता?, असा संतापजनक प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. साखळोली-शिवाजीनगरला जोडणारा पूल पूर्णपणे जीर्ण झाला आहे. पुलाचे कठडे ठिकठिकाणी तुटले असून, पाया कमकुवत झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. पावसाळ्यात पुलावरून जोरात पाणी वाहते, तर उर्वरित काळात विद्यार्थी, वृद्ध, महिलांना जीव मुठीत धरून पुलाचा वापर करावा लागतो. एखादी दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण? असा सवाल ग्रामस्थ प्रशासनाला विचारत आहेत. रस्त्यावरील डांबरीकरण पूर्णपणे उखडले असून, उघड्यावर आलेल्या लोखंडी शिगांमुळे अपघाताचा धोका आणखी वाढला आहे. मोठे खड्डे आणि असमतोल रस्ता यामुळे दुचाकीस्वारांना कसरत करत वाहन चालवावे लागत आहे. ज्येष्ठ नागरिक, गरोदर महिला आणि रुग्णांना दवाखान्यात नेणे ही रोजची परीक्षा बनली आहे. खराब रस्त्यांमुळे रिक्षाचालकही या मार्गावर जाण्यास नकार देत असल्याने ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत आहे.




## माजी विद्यार्थ्यांकडून शाळेला प्रिंटर भेट

**चिपळूण :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये गुरूंचे स्थान अनन्यसाधारण आहे. याच गुरु आणि गुरुकुल व्यवस्थेतील शिक्षण संस्थेप्रती विद्यार्थ्यांच्या ऋणानुबंधाचे दर्शन घडवणारा क्षण मार्गताम्हाणे शिक्षण संस्था संचलित डॉ. तात्यासाहेब नातू कला आणि वरिष्ठ वाणिज्य महाविद्यालयाच्या ज्ञान संकुलात संपन्न झाला. १९९६ साली चिपळूण तालुक्यातील मार्गताम्हणे येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची गरज लक्षात घेऊन स्थापन झालेल्या डॉ. तात्यासाहेब नातू कला आणि वरिष्ठ वाणिज्य महाविद्यालयातील कला शाखेतील शैक्षणिक वर्ष २००३ मध्ये शिकत असणाऱ्या माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास कॅनन कंपनीचा प्रिंटर भेट दिला. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. बाळासाहेब यादव, माजी विद्यार्थी संघटनेचे सदस्य, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कला शाखेतील शैक्षणिक वर्ष २००३ शाखेतील माजी विद्यार्थी शशांक चव्हाण, सचिन शिर्के, मंगेश देवरुखकर, संतोष जंगम, वैभव वासावे, शितल घोले, नितीन सावंत, संध्या जाधव, दीपा शिर्के, तृप्ती घुले, टीव्ही-९ चॅनलचे प्रतिनिधी कृष्णकांत साळगावकर या माजी विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयास कॅनॉन कंपनीचा प्रिंटर भेट दिला.

## विवळवेढे उड्डाणपुलावर ट्रक उलटला



**पालघर :** मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर विवळवेढे उड्डाणपुलावर सोमवारी (दि.२४) रात्री ३ वाजण्याच्या सुमारास एक ट्रक उलटला. ट्रक पुलाच्या कठड्याला अडकला असून यामध्ये वाहून नेण्यात येणाऱ्या लाकडी फळ्या पुलावरून खाली सेवा रस्त्यावर कोसळल्या. सुदैवाने यावेळी सेवा रस्त्यावर कोणीही नसल्याने मोठी दुर्घटना टळली. मध्यरात्रीच्या सुमारास गुजरातकडून मुंबई दिशेला निघालेला ट्रॅक विवळवेढे उड्डाणपुलावरून प्रवास करत होता. यावेळी पुलावर असलेल्या खड्ड्यांमुळे ट्रकच्या पुढे जाणाऱ्या प्रवासी आराम बसचालकाने अचानक वेग कमी केला. यामुळे ट्रक चालकाने वाहन दुसऱ्या मार्गिकेवर घेण्याचा प्रयत्न करत असताना मागून भरधाव वेगात येणाऱ्या कारने ट्रकला धडक दिल्याची माहिती चालकाने दिली. यामुळे ट्रकचा तोल जाऊन चालकाचे नियंत्रण सुटले आणि ट्रक उलटल्याची माहिती चालकाने दिली. ट्रक पुलाच्या कठड्याला अडकल्याने मोठा अपघात टळला. अपघातात चालकाला कोणतीही दुखापत झालेली नाही. मात्र वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळाल्यानंतर महामार्ग गस्ती पथक आणि महामार्ग पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन प्राथमिक मदत केली.

## विद्यार्थ्यांसाठी फिरते विज्ञान प्रदर्शन

**चिपळूण :** महादेवराव शिर्के माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, भोम येथे मदुराई तामिळनाडू येथील इदायम कंपनी संचालित फिरती विज्ञान वाहिका प्रदर्शन विद्यालयात विनामुल्य घेण्यात आले. रोटरी क्लब, लोटे खेड यांच्या संयोजनाने प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या फिरते विज्ञान प्रदर्शनात भौतिक, रासायनशास्त्रातील तत्वावर आधारित विविध प्रयोग यावेळी सादर करण्यात आले. हवेचा दाब व परिणाम, रासायनिक अभिक्रिया व घटक परिणाम, विज्ञानातील आश्चर्यकारक गोष्टी, ध्वनी कंपन, वैज्ञानिक शोध व शास्त्रज्ञ, अवकाश, विविध वैज्ञानिक नियम आदी बाबतीत शास्त्रीय मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या मनात वैज्ञानिक जाणीव जागृती, वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण होण्यास मदत झाली. विज्ञान प्रयोग मार्गदर्शन इंग्रजी भाषेतून होते. यावेळी शिक्षक गणेश सोनवणे यांनी वैज्ञानिक संज्ञा व संकल्पना विद्यार्थ्यांसाठी बोलीभाषेतून समजविल्या. अत्यल्प खर्चिक व दैनंदिन वापराच्या वस्तुमधून प्रयोग करता येतात हे सांगितले. इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यतच्या सर्व विद्यार्थ्यांनी या फिरते विज्ञान प्रदर्शनाचा लाभ घेतला. या कार्यक्रमास मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## गुटखा विक्रेत्यांवर होणार मकोकाअंतर्गत कारवाई

**मुंबई :** प्रतिबंधित गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू याचे उत्पादन व विक्री करणाऱ्यांवर अन्न व औषध प्रशासनाकडून सातत्याने कारवाई करण्यात येते. मागील सात महिन्यांत राज्यात तब्बल २२ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचा माल जप्त केला आहे. शालेय विद्यार्थी व तरुण पिढीला गुटख्यापासून दूर ठेवण्यासाठी चोरवाटेने गुटख्याची उलाढाल करणाऱ्यांवर ‘मकोका’ कायद्यान्वये कारवाई करण्याचा निर्णय एफडीएकडून घेण्यात आला आहे. राज्यात गुटखा विक्री आणि उत्पादनावर बंदी असली तरी परराज्यातून अवैध मार्गाने राज्यात गुटखा येतो. त्याला आळा घालण्यासाठीच हे पाऊल उचलण्यात आले आहे.

## निवडक



### अंकिता नाईक झाली डॉक्टर

**चिरनेर :** पनवेल तालुक्यातील आणि उलवे नोडमधील बामणडोंगरी गावची अंकिता नाईक ही नुकतीच एम.एस. (मास्टर ऑफ सर्जरी) डॉक्टर झाली. त्याबद्दल आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी तिचे अभिनंदन केले.यावेळी महेंद्र घरत म्हणाले की, आगरी समाजातील मुली उच्चशिक्षण घेऊन नावलौकिक मिळवत आहेत. मुली शिकाव्यात यासाठी मी गेली अनेक वर्षे प्रयत्न करतोय आणि प्रोत्साहन देत आलो आहे. त्यामुळे आगरी समाजाची अंकिता नाईक ही तरुणी स्त्री-रोग तज्ज्ञ झाल्याने मला अतिशय आनंद झाला, असे त्यांनी सांगितले. यावेळी माधव पाटील, रामदास नाईक, अरुण नाईक, प्रीतम नाईक, उत्तम कोळी, अश्विन नाईक आदी उपस्थित होते. त्यांनीही तिचे अभिनंदन केले.



### बदली झालेल्या शिक्षिकांचा सन्मान

**खांब :** गेल्या काही वर्षांपासून प्राथमिक शाळा बाहे येथे शिक्षिकी सेवेत कार्यरत झालेल्या मुख्याध्यापिका अर्चना हाके व रुपाली खरात यांनी आपल्या चांगल्या कर्तत्वातून विद्यार्थ्यांसह गावाशी सलोख्याचे व आपुलकीचे नाते संबंध निर्माण केले होते. त्यांची अन्य शाळांमध्ये बदली झाल्याचे ग्रामस्थांना समजताच ग्राम स्थांनी त्यांच्या सन्मानार्थ एका कार्यक्रमाचे आयोजन करून त्यांचा यथोचित सन्मान करून शुभेच्छा दिल्या. यावेळी कुणबी समाज युवा नेते अनंत थिटे, माजी उपसरपंच गणेश पवार, पोलीस पाटील मनोज थिटे, सुनील थिटे, संतोष थिटे, रोशन थिटे, रोशन मोरे, हाके, डॉ. प्रितेश मोरे, रोशन ठाकूर, सागर सकपाल व सचिन थिटे आदी प्रमुख मान्यवरांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ, महिला, तरूण मंडळाचे कार्यकर्ते व आजी-माजी विद्यार्थी उपस्थित होते. त्याचबरोबर नव्यानेच रूजू झालेल्या शिक्षिका रूची सामंत, प्रणाली जंगम यांचाही यथोचित सन्मान करून स्वागत करण्यात आले.



### ऋणनिर्देश कार्यक्रम सोहळा संपन्न

**अलिबाग :** तालुक्यातील आक्षी-साखर येथील जिल्हा परिषद शाळेसाठी सढळ हस्ते मदत करणाऱ्या दानशूर व्यक्तींचा ऋणनिर्देश कार्यक्रम सोहळा बुधवारी (दि.१९) आयोजित करण्यात आला होता. साखर शाळेला दानशूर व्यक्तींनी महत्वाचे योगदान दिले आहे. त्यामध्ये मनोज हारे, प्रफुल्ल बानकर, रणजीत गण, पांडुरंग पेरेकर, शाम गण, उल्लेश नाखवा, गोरख गोतकर, दत्ता नाखवा, हरिश्चंद्र बामजी, निलेश चौलकर, नागेश पेरेकर, वासुदेव नाखवा व इतर दानशूर व्यक्तींनी देणगी देऊन शाळेचा कायापालट करण्यासाठी हातभार लावला आहे. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष तेजस तांडेल, उपाध्यक्ष रेश्मा भुकवार, सदस्य हरेश्वर गोतकर, देवदत्त मुंढे, अंकिता भुकवार, अश्विनी गण, भावना जगू, करिश्मा भुकवार, अपर्णा नर, रिमा गुरव, संजना नर्बेकर, मनिषा गुरव, कमला तांडेल, सर्व पालक वर्ग तसेच मुख्याध्यापक राजेंद्र पाटील व उपशिक्षिका स्मिता चिखले यांनी खूप मेहनत घेतली. या कार्यक्रमासाठी नागाव केंद्राच्या केंद्र प्रमुख तथा अलिबाग बीट विस्तार अधिकारी प्राची ठाकूर, आक्षी सरपंच रश्मी पाटील, उपसरपंच आनंद बुरांडे, सदस्या निरजा नाईक, माजी जिल्हा परिषद सदस्या आश्लेषा नाईक,ग्रामसेवक प्रसाद गोंधळी तसेच सर्व देणगीदार व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालक उपस्थित होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- अलिबागमधील नामांकित हॉस्पिटलसाठी नर्स, वॉर्डबॉय, बहुउद्देशीय कार्यकारी महिला पाहिजेत. मो. ९९२३५०६७७९/८३९०४५५५६५/७५०६३२९९११
- Vacancy for, office staff ,for office in Alibag Attractive salary Call 9923750549
- अंश एन्टरप्रायजेस सोलर ऑफीसमध्ये ऑफिस कामाकरिता १ मुलगी आणि १ मुलगा पाहिजे. शिक्षण कमीत कमी १२ वी पास किंवा पदवीधर पाहिजे. मो.नं. ८४८३९९९२२९
- Driver पाहिजे ८०८७५७२७४७
- नामांकित खाद्य तेल कंपनीत सेल्समन आवश्यकता आहे. स्वत:ची टूव्हीलर आवश्यक मोबाईल - ९४२२६९११४७
- पाहिजेत- अलिबाग विभागासाठी सेल्समध्ये जॉब्स करण्यासाठी सुवर्णसंधी. फिक्स सॅलरी - १५०००, २००००, २५००० + सुपर इन्सेंटीव्ह. विविध शाखांसाठी Home Revise Education Pvt.Ltd. या शैक्षणिक संस्थेत तातडीने पाहिजेत. Educational counselors / Sales Executive-20, Franchise-20, Telecaller-03. **Contact :** 8419940004 / 9372071769
- नागाव येथे घरी राहून कामासाठी कपलची आवश्यकता आहे. कामाचे स्वरूप : जेवण बनवणे, घरकाम, गार्डन व स्विमिंग पूलची देखभाल. सुविधा :केअरटेकर रूम, किचन काउंटर, टीव्ही. पगार : रु २५,००० /- प्रति महिना. अधिक माहितीसाठी संपर्क : 7875866555, 8408829555

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## उलवेतील सिलिंडरचा भीषण स्फोट

# अदृश्य आशीर्वादाची जळजळीत साक्ष

- **अनधिकृत ढाब्यांमुळे उरणकर संकटात**
- **शासकीय जमिनींवर अतिक्रमण**

**| उरण | प्रतिनिधी |**

**उलवे प्रभाग ८ मध्ये शनिवारी (दि.२२) पहाटेच्या सुमारास एका अनधिकृत ढाब्यातील सिलेंडरचा स्फोट होऊन भीषण आग लागल्याची घटना होती. या आगीत संपुर्ण ढाबा जळून खाक झाला होता. सुदैवाने जीवितहानी टळली असली तरी या घटनेने उरण-उलवे परिसरात वाढलेल्या बेकायदेशीर ढाब्यांचा प्रश्नावर गंभीर होत चालला आहे. ही आग केवळ अपघात नसून, अनधिकृत ढाब्यांना मिळणाऱ्या अदृश्य आशीर्वादाची जळजळीत साक्ष असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.**



### प्रशासनाच्या निष्क्रियतेवर तीव्र नाराजी

ही आग सध्या उलवेपुरती मर्यादित असली तरी उरणमध्येही अशाच प्रकारचे असंख्य अनधिकृत ढाबे रातोरात उभे राहत आहेत. सिडकोच्या जमिनीवर उभारलेल्या अनधिकृत ढाब्याने शेजारील हजारो नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे स्थानिक रहिवाशांनीही प्रशासनाच्या निष्क्रियतेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शेकडो नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण करून असे बेकायदेशीर ढाबे चालू देणे म्हणजे प्रशासन आणि काही राजकीय शक्तींच्या संगनमताने 'उरणमध्ये बारुदाचा ढिगारा' तयार केल्यासारखे आहे, असे संतप्त मत नागरिकांनी व्यक्त केले.

उलवे, उरण व द्रोणागिरी विभागात सिडको, जेएनपीटी, पीडब्ल्यूडी, मेरिटाईम बोर्ड आणि इतर शासकीय जमिनींवर अनधिकृतपणे ढाबे, गोदामे आणि झोपडवस्त्या मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. या सर्व बांधकामांना प्रशासकीय आशीर्वाद मिळाल्याशिवाय एवढ्या मोठ्या प्रमाणात अतिक्रमण शक्यच नसल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे. तसेच, हप्ता देतात म्हणून ढाबे सुरू आहेत आणि हप्ता घेतात म्हणून कारवाई होत नाही, अशी देखील चर्चा स्थानिकांमधून सुरू आहे. त्यातच शनिवारी उलवे प्रभाग ८ मध्ये पहाटेच्या सुमारास एका अनधिकृत ढाब्यावरील सिलेंडरचा स्फोट होऊन भीषण आग लागली होती. काही क्षणांतच तो ढाबा ज्वाळांच्या भक्ष्यस्थानी सापडला. स्फोटाचा आवाज इतका मोठा होता की परिसरातील रहिवाशांची झोप उडाली. आगीचे उंच भडकणारे ज्वालामुखीसारखे रूप पाहून शेजारील उच्चभ्रू सोसायट्यांना गंभीर धोका निर्माण झाला. परिस्थिती गंभीर होत असल्याचे दिसताच नागरिकांनी तात्काळ सिडको अग्निशमन दलाला कळवले. अर्ध्या तासाच्या अथक प्रयत्नानंतर आग नियंत्रित केली. मात्र, ढाब्यातील सर्व साहित्य, संरचना आणि साहित्यसाठा पूर्णपणे नष्ट झाला असून मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले. यादरम्यान हा ढाबा पूर्णपणे अनधिकृत असल्याची पुष्टी स्थानिकांनी केली आहे. त्यामुळे या आगीने राजकीय पातळीवरही खळबळ उडवली. शेकाप नेते राजेंद्र पाटील यांनी घटनास्थळी तातडीने भेट देत प्रशासनावर तुफान टीका केली आहे.

या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून भविष्यात उलवेसारखी भीषण आग उरणमध्ये लागली तर त्याला जबाबदार कोणाला धरणार? अधिकाऱ्यांना, राजकारण्यांना की हप्तेखोर अंध व्यवस्थेला? अशा अनधिकृत ढाब्यांवर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिकांकडून जोर धरू लागली आहे.

### अधिकाऱ्यांची हप्तेखोरी?

उरणमधील शासकीय जागांवर सर्रासमणे अनधिकृत बांधकामे केली जात आहेत. त्यात मोठ्या प्रमाणात ढाब्यांचा समावेश आहे. नुकतेच उलवेमध्ये घडलेल्या स्फोटामुळे स्थानिकांमध्ये भीतचे वातावरण पसरले आहे. दरम्यान, या अनधिकृत ढाबेधारकांकडून संबंधित अधिकारी व पुढारी यांना हप्ता भेटत असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई होत नाही, अशी चर्चा उरणकरांमधून होत आहे.

## उरणकरांच्या मुलभुत गरजांची वानवा

**| उरण | प्रतिनिधी |**

उरणचा औद्योगिक विकास वेगाने वाढत असताना स्थानिक नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे मात्र गंभीरपणे दुर्लक्ष झाल्याचे चित्र दिसत आहे. ओएनजीसी, एनएडी, जेएनपीटी, बीपीसीएल, डीपी वर्ल्ड, सिंगापूर पोर्ट, वीज प्रकल्प अशा देशपातळीवरील महत्वाच्या उद्योग आणि प्रकल्प उरणमध्ये कार्यरत असतानाही या तालुक्यात एकही सुसज्ज, अत्याधुनिक रुग्णालय उपलब्ध नाही. औद्योगिक क्षेत्रात वारंवार होणाऱ्या अपघातांमध्ये भाजण्याच्या घटना मोठ्या प्रमाणावर घडत असतात, परंतु उरणमध्ये बर्न सेंटरसारखी अत्यावश्यक सुविधा नसल्याने गंभीर जखमींना वाशी किंवा मुंबईकडे हलवावे लागते. त्यामुळे उपचारातील उशिरामुळे जीवितहानीची शक्यता वाढते. तसेच, एकेकाळी 'भाताचे कोठार' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उरणमध्ये आज सिडकोने मोठ्या प्रमाणावर जमिनी संपादित केल्या. शेतकऱ्यांनी विकासाच्या आशेवर जमीन दिली; परंतु, विकासाच्या केंद्रस्थानी असलेल्या उरणकरांना हवी ती मूलभूत नागरी सुविधा आजतागायत मिळालेली नाही. औद्योगिक आणि निवासी क्षेत्र प्रचंड प्रमाणात वाढले असतानाही उरणमध्ये मुलांना खेळण्यासाठी एकही सुसज्ज मैदान उपलब्ध नाही. स्थानिक खेळाडूंना सराव आणि स्पर्धांसाठी उरणच्या बाहेर जावे लागते, हा उरणच्या क्रीडा संस्कृतीला बसलेला मोठा धक्का आहे.

## धुतूममध्ये प्रकल्पांचे लोकार्पण

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील धुतूम ग्रामपंचायत सध्या विकासकामांच्या वेगवान प्रगतीमुळे सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. जिल्हा परिषद शाळेतील अत्याधुनिक संगणक कक्ष, गावातील पिण्याच्या पाण्यासाठी नवीन पाईपलाईन आणि ग्रामपंचायतीच्या महिला बचतगटासाठी अत्याधुनिक कापडी पिशवी निर्मिती मशीन या तिन महत्त्वाच्या प्रकल्पांचे लोकार्पण काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत आणि उद्योजक पी.जी. ठाकूर यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाला गटशिक्षण अधिकारी निर्मला घरत, अल्ट्राटेकचे राममकृष्ण घायल, इंडियन ऑईल अदानी व्हेंचरच्या नाझनीन शेख, सतीश म्हात्रे, संदीप काळे, प्रफुल्ल म्हात्रे, सी-बर्डचे वैभव कदम, सरपंच सुचिता ठाकूर, उपसरपंच सुचिता कडू, सदस्य स्मिता ठाकूर, कविता पाटील, करिष्मा ठाकूर, अनिता ठाकूर, रविनाथ ठाकूर, प्रेमनाथ ठाकूर, चंद्रकांत ठाकूर, प्रकाश ठाकूर तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



- **महेंद्र घरत, पी.जी. ठाकूर यांच्या हस्ते संपन्न**
- **पंचायतीच्या विकासकामांचा वेगवान धडाका**

## रेस्पिरेटरी डिस्ट्रेस सिंड्रोम रूग्णावर यशस्वी उपचार

**| कोलाड | प्रतिनिधी |**

नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटलमधील फुफ्फुस विकार तज्ज्ञ डॉ. शाहिद पटेल आणि इंटेन्सिव्हिस्ट डॉ. अदिती जैन यांच्या नेतृत्वाखाली टिमने तीव्र रेस्पिरेटरी डिस्ट्रेस सिंड्रोम म्हणजेच एआरडीएस सारखी गंभीर वैद्यकीय स्थितीने पिडीत ४९ वर्षीय महिलेवर यशस्वीरित्या उपचार केले.

रोह्यातील दिलारा यांना अचानक ताप, अंगदुखी आणि थकवा अशी फ्लु सारखी लक्षणे जाणवू लागली. सुरुवातीला त्यांनी बदलत्या वातावरणामुळे आजारपण आल्याचे समजून त्याकडे दुर्लक्ष केले. घरगुती उपचारांमुळे रुग्ण बरा होईल, अशी आशा होती. परंतु, काही दिवसांतच त्यांच्या प्रकृतीने गंभीर वळण घेतले. साध्या थकव्यामुळे सुरू झालेली ही समस्या श्वास घेण्यास तीव्र अडचण होण्यापर्यंत वाढली. त्यांना दैनंदिन कामही करता येत नव्हते. काही पावले चालल्यावरही दम लागत होता आणि छातीत असामान्य घट्टपणा जाणवू लागला. जसजसे दिवस जात होते तसतसे त्यांना श्वास घेणे कठीण जात होते. बोलणेही कठीण होऊ लागले. खूप काळजी वाटल्याने, त्यांच्या कुटुंबाने जवळच्या डॉक्टरांकडे नेले; परंतु, औषधे आणि ऑक्सिजन सपोर्ट असूनही, त्यांची प्रकृती खालावत गेली. जेव्हा त्यांचे ऑक्सिजन सॅच्युरेशन ३० टक्केपर्यंत खाली घसरले, तेव्हा त्यांना तातडीने नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. प्रसंगवधान राखत वेळीच व अचुक उपचार, चोवीस तास तज्ज्ञांचे निरीक्षण करुन टिमने रुग्णाची प्रकृती स्थिर केली आणि आता त्या पूर्णपणे बऱ्या झाल्या आहेत.



## चंद्रकांत नागावकर यांना देवाज्ञा

**| खांब | प्रतिनिधी |**



रोहा तालुक्यातील तळवली गावचे सुप्रसिद्ध मूर्तिकार व चित्रकार चंद्रकांत कोंडाजी नागावकर उर्फ अप्पा यांना शुक्रवारी (दि.२१) देवाज्ञा झाली. निधनासमयी ते ७० वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे दशक्रियाविधी रविवारी (दि.३०) तर अंतिम धार्मिकविधी बुधवार दि.३ डिसेंबर रोजी राहत्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

## सांगितिक कार्यक्रमात चोरट्यांचा धुमाकूळ

**| पनवेल | प्रतिनिधी |**

खारघर येथे रोलींग लाऊड कॉन्सर्ट या सांगितिक कार्यक्रमात चोरट्यांची चांदी झाली आहे. या कार्यक्रमात हजारोंच्या संख्येने तरूणवर्ग आला होता. या कार्यक्रमात चोरट्यांनी शिरून जवळपास साडेदहा लाख रुपयांचा मुद्देमाल चोरल्याच्या तक्रारी खारघर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आल्या आहेत.

खारघर उपनगरातील प्रभाग ३१ येथे रोलिंग लाऊड इंडिया हिपहॉप म्युझिक फेस्टिव्हल साजरा झाला. या कार्यक्रमासाठी आलेला प्रेक्षकवर्ग उच्चभ्र घराण्यातील मुले व मुली होते. या कार्यक्रमातील कर्कश आवाज आणि तरूणाईचा जल्लोष यामध्ये चोरट्यांनी प्रेक्षकांच्या आभुषणावर डल्ला मारला. खारघर पोलिसांकडे प्रेक्षकांनी दिलेल्या तक्रारीमध्ये रविवारी सायंकाळी ६ ते १० वाजण्याच्या दरम्यान सोन्याचे दागीने चोरण्याचे प्रकार घडले. मोठ्या प्रमाणात गर्दी असल्याने एकमेकांना खेटून असलेल्या प्रेक्षकांच्या गळ्यातून अक्षरशः सोनसाखळी खेचण्यात आल्या. अशा चार वेगवेगळ्या व्यक्तींच्या गळ्यातून सुमारे १० लाख ५० हजार रूपये किमतीच्या सोनसाखळ्या चोरीस गेल्या आहेत. खारघर पोलीस चोरट्यांचा शोध घेत असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कांबळे यांनी दिली.

## करवाढ रद्द केल्याबद्दल आभार सभा

- **पालीकरांच्या एकजुटीचा विजय**
- **तालुका संघर्ष समितीच्यावतीने नगरपंचायतीच्या निर्णयाचे स्वागत**

**| सुधागड-पाली | प्रतिनिधी |**

पाली नगरपंचायतीने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी प्रस्तावित केलेली करवाढ अखेर रद्द केल्याने पालीकरांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयानंतर पालीतील नागरिक आणि सुधागड तालुका संघर्ष समितीच्यावतीने नगरपंचायतीच्या निर्णयाचे स्वागत करत रविवारी (दि.२३) बल्लालेश्वर भक्त निवास क्रमांक २ येथे एक आभार सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला पालीतील विविध वयोगटातील नागरिक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते आणि संघर्ष समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सभेत बोलताना संघर्ष समितीच्या प्रतिनिधींनी सांगितले की, ही केवळ करवाढ रद्द होण्याची बाब नाही, तर पालीकरांच्या एकजुटीच्या ताकदीचा विजय आहे. लोकशाहीत जनतेचा आवाज महत्त्वाचा आहे आणि तो ऐकला गेला याचा आम्हाला अभिमान आहे. त्यानंतर सभेच्या शेवटी पालीकरांनी एकत्र येत आपला कृतज्ञता भाव व्यक्त केला. भविष्यातही जनहिताच्या मुद्द्यांवर एकत्र येऊन आवाज उठवण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.



**रेश्मा जोशी यांच्या हस्ते उद्‌घाटन | पुस्तक प्रकाशनासह मान्यवरांचा सन्मान**

## कर्जतमध्ये भरली 'आगरी शाला'

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुका आगरी समाज संघटना आणि आगरी साहित्य चळवळ यांच्या माध्यमातून एकदिवसीय 'आगरी शाला' या उपक्रमाचे आयोजन नेरळ येथील आगरी समाज सभागृहात करण्यात आले होते. यावेळी आगरी भाषेतून पहिले प्रवचन श्री मलंगगड येथील जयेश भाग्यवंत यांनी सादर केले. या उपक्रमाचे आणि ग्रंथालयाचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्त्या रेश्मा जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच, या एकदिवसीय कार्यशाळेत 'आगरी शाला' या पुस्तकाचे प्रकाशन आणि आगरी समाजातील कला व साहित्य क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या दोन मान्यवरांना सन्मानीत करण्यात आले.



या कार्यक्रमाच्या सुरुवातीला माहीम-मुंबई येथील लेखक मोरेश्वर पाटील यांनी लिहिलेल्या 'आगरी शाला' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात करण्यात आले. त्यानंतर आगरी भाषेत पी.एच.डी करणारे पनवेल येथील डॉ. अविनाश पाटील यांना 'आगरी साहित्य गौरव' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तर, चित्रपट सृष्टीत जुनियर जॉनी लीव्हर म्हणून ओळखलेले जाणारे मनोहर कोळंबे यांना 'आगरी कला गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच, श्री मलंगगड येथील जयेश भाग्यवंत यांनी आगरी भाषेतून पहिले प्रवचन सादर केले. प्रवचानादरम्यान, आगरी समाज ज्या ज्या ठिकाणी आहे, त्या त्या ठिकाणी आगरी समाज बांधवांशी कोणत्याही कारणाने भांडायचे नाही. कोणत्याही कारणाने भांडण होण्याचा प्रसंग उद्भवला तर तात्काळ एक पाऊल मागे येण्याची माझी आचरण सर्व आगरी समाज बांधवांच्या कृतीतून व्हावे, असे आवाहन जयेश भाग्यवंत यांनी प्रवचनातून केले.

यावेळी जयेश भाग्यवंत, प्रा. एल.बी. पाटील, वसंत कोळंबे, मोरेश्वर पाटील, दया नाईक, सर्वेश तरे, प्रशांत मोरे आणि शिवनाथ बाबा आदी मान्यवर उपस्थित होते. या एकदिवसीय कार्यशाळेचे निमंत्रक कर्जत तालुका आगरी समाज संघटनेचे अध्यक्ष संतोष पेरणे यांनी प्रास्ताविक केले. तर, संघटनेचे सचिव जितेंद्र गवळी यांनी सूत्रसंचालन केले.

### आगरी भाषेतील पहिले प्रवचन सादर

यावेळी आगरी भाषेतील पहिले प्रवचन जयेश महाराज यांच्याकडून सादर करण्यात आले. त्यावेळी त्यांनी, आता बहुतेकांची मुले इंग्रजी माध्यमात शिक्षण घेतात, त्यामुळे आगरी भाषेवर संकट आले असे अजिबात वाटत नाही; मात्र, त्या सर्व मुलांना घरातील संस्कार हे आगरी भाषा जिवंत ठेवण्यास पुरेसे आहेत. आता समाज शिक्षणाच्या प्रवाहात आहे. अशावेळी समाजातील व्यक्ती लगेच ओळखून येत नाही. त्यामुळे आपण कितीही पुढारलेले असलो तरी आपले आगरीपण बोली भाषेतून व्यक्त झाले पाहिजे, असे आवाहन जयेश भाग्यवंत यांनी केले.

## दत्त जयंतीनिमित्त सप्ताहाचे आयोजन

**| पनवेल | प्रतिनिधी |**

श्री दत्त जयंतीनिमित्त नाशिक येथील त्र्यंबकेश्वर अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ अंतर्गत नवीन पनवेल येथील श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास केंद्र येथे अखंड नाम जप यज्ञ सप्ताहाचे आयोजन दि. २८ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर पर्यंत करण्यात आले आहे. या सप्ताह काळात श्री वेदतुल्य गुरुचरित्र पारायण, श्री भागवत,श्री नवनाथ पारायण, श्री स्वामी चरित्र सरामृत,श्री दुर्गा सप्तशती पठण, २४ तास अखंड प्रहर सेवा सारख्या विविध सेवांचे नियोजन केले आहे. या काळात रोज त्रिकाल स्वामी समर्थ महाराजांची आरती संपन्न होणार आहे. तसेच, विविध विषयांवर मार्गदर्शन व विनामूल्य प्रश्नोत्तरे होणार आहेत.

# कळंबोलीतील गतिरोधकांवर सुरक्षा पट्टे

**पनवेल :** सिमेंट रस्त्यांवरील गतिरोधकांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. याच अनुषंगाने विजय खानावकर यांनी शहरातील गतिरोधकांवर पांढरे सुरक्षा पट्टे मारण्याची मागणी केली होती. या कामाला अखेर सोमवारपासून सुरूवात झाली. कळंबोली परिसरात दोन दिवसांपासून अदृश्य असलेल्या गतिरोधकांबाबत तक्रारी वाढत होत्या. रात्री गतिरोधक स्पष्टपणे दिसत नसल्याने दुचाकी घसरून अपघात होण्याचे प्रमाण वाढल्याने स्थानिकांमध्ये संतापाचे वातावरण होते. याबाबत माजी नगरसेवक विजय खानावकर यांनी पालिकेला लेखी पत्र देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली होती. पालिकेच्या अभियांत्रिकी विभागाने सकाळपासून वसाहतीमधील प्रमुख रस्त्यांवरील गतिरोधकांवर पांढरे पट्टे मारण्याचे काम सुरू केले आहेत. पहिल्या टप्प्यात वाहनांची रहदारी असलेल्या मुख्य रस्त्यांना प्राधान्य देण्यात आले आहे.

## जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

**अर्ज क्र.२५४/२०२५**

वनिता बाळाराम जाधव
रा.वारक, ता. माणगाव — अर्जदार
जि. रायगड

विरुद्ध

१.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
वारक, ग्रामपंचायत वारक
ता. माणगाव, जि.रायगड — सामनेवाले
२.गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि.रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ. धोंडीबाई रामा जाधव यांचा मृत्यू मौजे वारक ता.माणगाव, जि.रायगड या ठिकाणी दि.११-१०-२००९ रोजी झाला आहे. त्याची मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांनी दि.४-११-२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे मृत्यू वारक येथे दि. ११-१०-२००९ रोजी झाला असल्याचे घोषित करुन मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा मृत्यू दि.११-१०-२००९ रोजी वारक ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरुन आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगाव
**दिनांक :- २४-११-२०२५**

**(दशरथ काळे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि.रायगड**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी मौजे भोईघर, ता. मुरूड, जि. रायगड येथील खालील वर्णनाचे मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| भोईघर ता.मुरूड | ३२१/६ | जिरायत ०-१२-००<br>वरकस ०-०९-००<br>पो.ख.क्षेत्र ०-०१-००<br>एकुण क्षेत्र ०-२२-०० | ०.७८ |

वर वर्णन जमिन मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत ही विद्यमान मालक विकास मनोहर सावंत, यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक २४/११/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस लक्ष्मी नारायण, पहिला मजला,
गाळा नं.७ व ८, ब्राम्हण आळी, राम मंदिर
समोर, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे बामणगांव, ता. अलिबाग येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| बामणगांव | २१७ | ०-४६-३०<br>पो.ख.०-०६-६०<br>०-५२-९० | १०.२८ | १)श्री.विजय पांडुरंग पाटील,<br>२)श्रीम.आनंदी पांडुरंग पाटील, |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व त्यामध्ये कुणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क अधिकार नाही, असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वास कळावे.

अलिबाग
ता. २१/११/२०२५

**ॲड. विधान अरविंद पाटील.**
'वत्सला' टिळक रोड, स्टेट बँकेसमोर
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे सहाण, ता.अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक प्रिया प्रदिप गोगटे, रा. मुंबई, यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यामध्ये झालेली आहेत. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| सहाण ता.अलिबाग, जि.रायगड | ४०१/२ | ०-१७-१०<br>पो.ख.०-०१-२०<br>एकूण ०-१८-३० | ४-५६ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. २५.११.२०२५

सही/-
**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं. २, दुय्यम निबंधक
कार्यालय अलिबागच्या समोर
अलिबाग, जि. रायगड
मो.नं.९८९००७९३०२

## जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेंत येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी गांव चेंढरे येथील खालील वर्णनाची बिनशेती जमीन मिळकत श्री. राजेंद्र गणपत देसाई यांचे खुद्द मालकीची आणि ताबेवहिवाटीची आहे.

| सर्व्हे नंबर / हिस्सा नंबर | क्षेत्र (चौ.मी.) | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ८१/ब/८३/ब/८६/ब/३/१ | १७४४ | ३४८=०० |

आमचे अशिलांनी सदर जमिन मिळकत खरेदी करण्याबाबत विद्यमान मालकांबरोबर बोलणी केली असून, मिळकतीच्या मालकी हक्काबाबत खातरजमा करणेंकरिता ही नोटीस देणेंत येत आहे. तरी, श्री. राजेंद्र गणपत देसाई हे आमचे अशिलांबरोबर करत असलेल्या सदर खरेदी विक्री व्यवहारास इतर कोणाचीही कोणत्याही स्वरूपाची हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांत नोंदवावी. त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

तारीख : २३/११/२०२५

सही/-
**ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे**
मु. शांतादुर्गा को. ऑप. हौसिंग सोसायटी,
मारूती नाका, पोस्ट व तालुका अलिबाग,
जिल्हा रायगड. मोबाईल: ९२७०९६२९२९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे ढवर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाचे मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| ढवर ता.अलिबाग | ३४९ | जिरायत ०-२१-६०<br>वरकस ०-०६-१०<br>पो.ख.क्षेत्र ०-१२-८०<br>एकुण क्षेत्र ०-४०-५० | ५.५३ |

वर वर्णन जमिन मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत ही विद्यमान मालक १) देवेंद्र यशवंत मंचेकर, २) संध्या कौस्तुभ काळे, ३) अनुपमा प्रकाश लिमये, ४) प्रिया अंकुर शाह, ५) मिनल राजेश फडणीस, यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निषेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक-२४/११/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस लक्ष्मी नारायण, पहिला मजला,
गाळा नं.७ व ८, ब्राम्हण आळी, राम मंदिर
समोर, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळवण्यांत येते की, खाली नमुद केलेल्या शेत जमीन मिळकती ह्या खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नावे असून, ती त्यांचे खुद्द, ताबा, कबजा, मालकी, वहिवाटीतील आहे, त्या शेत जमीन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे - जांभुळपाडा, ता. सुधागड, जि. रायगड येथील**

| मालकाचे नाव | गट/भुमापन क्र. | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार रु.पै. | भोगवटा वर्ग |
|---|---|---|---|---|
| योगेश नथुराम दळवी खाते क्र.१०४७७ | ३३/१ | १-३९-८० पैकी ०-२०-०० | ०६=०३<br>०=६५ | १-खालसा/ वरकस/भात |
| गोविंद विठ्ठल दळवी खाते क्र.१०४७५ | ३३/१ | १-३९-८० पैकी ०-२०-०० | ०६=०३<br>०१=०८ | १-खालसा/ भात |

वरील मिळकतींसंबंधात आमचे अशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतींवर अन्य कोणाचा दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिएन. चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, कुळवहिवाट, ताबा, कबजा, वहिवाट, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, जप्ती, मॉर्टगेज, संपादन, रिझर्व्हेशन, रेक्वीझेशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध तसेच एकत्र कुटूंब मिळकत असल्याने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रत्यक्ष भेटून मुदतीमध्ये हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती मुदतीत दाखल न केल्या गेल्यास सदरच्या वरील मिळकती पुर्णपणे निर्वेध असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल वरील जमीन मालकांशी खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

हे कळावे,

दि. २५-११-२०२५

**ॲड. सागर हिराकांत भगत,**
ॲडव्होकेट
पत्ता :- मौजे- उन्हेरे-कुंभारशेत,
पो. पाली, ता. सुधागड, जि.रायगड
मोबा क्र. ८९८३४५६८४७.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळिवण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांनबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - मालेगाव तर्फे कोतलखलाटी, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमिन मिळकत**

| मालकाचे नाव /लिहून देणार | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) श्री. गोविंद पिलाजी देशमुख<br>२) सिताराम पिलाजी देशमुख<br>३) जय श्री सुर्यकांत देशमुख | ३ | १ | ०-४४-५० | ४ | १५ |

पै.आर.पॉ ०.२७.७० इतके क्षेत्रापैकी लिहून देणार यांचे मालकीचे अविभक्त सामाईक मालकीचे क्षेत्र

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता:- ए विंग, फ्लॅट नं. ४,
पहीला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत
नगरपालीका कार्यालय शेजारी, ता. कर्जत,
जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :-२५/११/२०२५
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळिवण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकती या जगन्नाथ एकनाथ भासे रा.डिकसळ, (रोहित ढाबा), ता.कर्जत, जि. रायगड यांचे मालकी हक्क व ताबे वहिवाटीच्या आहेत. सदर मिळकती या श्री. पोपट बाबुराव कामठे रा.रो हाउस नं.१०९, रवि गार्डन सोसायटी, मांजरी बुद्रुक, ता. हवेली, जि. पुणे ४१२३०७ यांनी दिनांक २२/०५/२०२५ रोजी सदर मिळकतींच्या विद्यमान मालकांकडून मे. दुय्यम निबंधक कर्जत २ यांचे कार्यालयात साठेखत व कुलमुखत्यारपत्र लिहुन व नोंदवून घेतले होते. म्हणून श्री. पोपट बाबुराव कामठे हे प्रस्तुत जाहीर नोटीसीद्वारे जाहीर करतात की, श्री.जगन्नाथ एकनाथ भासे यांच्याबरोबर कोणीही तिऱ्हाईत इसमांनी सदर मिळकतीबाबत व्यवहार करू नये. याउपर सदर मिळकतीबाबत व्यवहार केल्यास तो विद्यमान मालकांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशीष्ट :-** तुकडी रायगड, पोट तुकडी, तालुका कर्जत, जि. रायगड, मा. दुय्यम निबंधक साहेब कर्जत यांचे कार्यक्षेत्रातील, तसेच जिल्हा परिषद रायगड तालुका पंचायत समिती कर्जत येथील

१) गाव मौजे डिकसळ येथील मिळकत सर्व्हे नं.१५ हिस्सा नं. १८/१/अ यांसी एकूण क्षेत्र ०० हे ४४.४० आर अधिक पोटखराबा क्षेत्र ०० हे ०५.६० आर यांसी आकार ०० रूपये ०० पैसे पैकी लिहून देणार यांच्या मालकीचे क्षेत्र ०० हे १८ आर अधिक पोटखराबा ०० हे ०२ आर असे एकूण क्षेत्र ०० हे २० आर हि मिळकत.

चतु:सिमा पुढीलप्रमाणे:-
पुर्वेस - दिग्विजय सदानंद वायसे पाटील यांची मिळकत
दक्षिणेस - सर्व्हे नं. ८
पश्चिमेस - सर्व्हे नं. १२
उत्तरेस - सर्व्हे नं. १५/१८/१ब

२) गाव मौजे वावे येथील मिळकत सर्व्हे नं.१३ हिस्सा नं.६ यांसी एकूण क्षेत्र ०० हे ११ आर अधिक पोटखराबा क्षेत्र ०० हे ००.६० आर यांसी आकार ०० रूपये १४ पैसे पैकी लिहून देणार यांच्या मालकीचे क्षेत्र ०० हे ११ आर अधिक पोटखराबा ०० हे ००.६० आर असे एकूण क्षेत्र ०० हे ११.६० आर हि मिळकत.

चतुः सिमा पुढीलप्रमाणे :-
पुर्वेस- सर्व्हे नं. १३/५, प्रशांत दिनकर दळवी यांची मिळकत
दक्षिणेस- बापू धर्मा घरत यांची मिळकत
पश्चिमेस- हरिश्चंद्र ताथू घरत यांची मिळकत
उत्तरेस- शरद रामचंद्र ठाणगे यांची मिळकत

पुणे
दि. २४-११-२०२५

सही/-
ॲडव्होकेट
**ॲड. मजीद पठाण**
ॲड. इम्रान मजीद पठाण सातववाडी,
हडपसर, पुणे २८ फोन नं. - ९८२३०७७७३०,
९८२३१०७६३८

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळिवण्यात येते की मौजे वडवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक चिराग रामनाथ भेंडे व प्रणव रामनाथ भेंडे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे वडवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ५ | १/जे | ०-१२-०० | ०-१६ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.२५/११/२०२५
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

## जाहीर हरकत नोटीस

सर्व लोकांस या जाहीर हरकत नोटीसीने असे कळिवण्यात येते की, मौजे चाफेवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथिल सर्व्हे नं. १६, हिस्सा नं. १/ब, एकुण क्षेत्र १.२१.४० (हे.आर. चौ.मी.) आकारणी ०.६२ (रु.पै.) या मिळकतीबाबत मी सदर मिळकतीचे मालक श्रीम. लिलाबाई आनंद जाधव उर्फ लिला अनिल जाधव वगैरे यांचेबरोबर विक्री व्यवहार ठरविला असुन त्याबाबत मी त्यांना मोबदलाही दिलेला आहे. व सदर विक्री व्यवहाराबाबत त्यांनी मला नोंदणीकृत दस्तही लिहून दिलेले आहेत. तसेच सदर मिळकतीचे विक्री व्यवहाराबाबत आवश्यक त्या परवानग्या मिळणेकामी मी कार्यवाहीही सुरु केली आहे. असे असतानाही सदर व्यक्ती सदर मिळकतीस त्यांची नावे असल्याचा गैरफायदा घेवुन माझे अपरोक्ष व सदर विक्री व्यवहार लपवुन ठेवुन सदर मिळकतीबाबत त्रयस्थ इसमांसोबत विक्री व्यवहार करणेची शक्यता आहे. तरी सदर मिळकतीबाबत सदर इसमांशी कोणीही कोणतेही विक्री व्यवहार करु नयेत. अशा व्यवहारास माझी सक्त हरकत आहे. मात्र सदर मिळकतीबाबत सदर इसमांशी कोणीही कोणतेही विक्री व्यवहार केल्यास सदर व्यक्ती व भावी खरेदीदार तसेच सर्व संबंधितांविरुद्ध मला कायदेशिर कारवाई सुरु करणे नाईलाजाने भाग पडेल. तसेच सदर तथाकथित विक्री व्यवहार माझेवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**श्री. विलास काशिनाथ भागीत**
रा. नेवाळी, (नेरळ), ता. कर्जत,
जि. रायगड मो. ९६५७१९९८३५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिशीद्वारे कळिवण्यात येते कि, आमचे अशील यांनी खालील वर्णनाची सामाईक मिळकतीचे मालक श्री. मच्छींद्र यशवंत पाटील यांचे अविभक्त हिश्याची मिळकत विकत घेण्याचे ठरविले असून तशी बोलणी चालू आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कातळपाडा | ९० | ०-३०-२०<br>पो.ख.०-००-५०<br>एकूण ०-३१-०० | ७.१२ |

सदर नमूद मिळकती पैकी श्री. मच्छींद्र यशवंत पाटील यांचे अविभक्त हिश्याची मिळकत व या मिळकतीत असणारे श्री. विशाल रमेश म्हात्रे यांचे मालकीचे ग्रुप ग्रामपंचायत कुसुंबळे हद्दीतील मालमत्ता क्र.३४३ हि घर मिळकत या जाहीर नोटीशिचा विषय आहे.

सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी दिलेला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकारार, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क, व हितसंबंध वा दुरान्वये संबंध असल्यास अशा व्यक्तीनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार याजकडे हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ दिवसाचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध असून तिचे मार्केटेबल टायटल क्लिअर आहे, असे समजून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करू. त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. २४/११/२०२५

**(ॲड वैभव गिरीधर पाटील)**
जिल्हा न्यायालय अलिबाग, रायगड
मु. सांबारी, पो. कुर्डूस
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ८८०५५१८०६८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळिवण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-पाषाणे, ता.कर्जत जि.रायगड येथील शेत जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) श्री. महेंद्र हरी विशे<br>२) श्री. प्रभाकर हरी विशे | १४ | ८/क/१ | ०-२०-०० | ० | १२ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :-ए विंग, फ्लॅट नं. ४,
पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत
नगरपालीका कार्यालयाशेजारी, ता.कर्जत,
जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- २५/११/२०२५
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल :-adv.jayeshmhase@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे-तुडाळ, ता.अलिबाग, जि.रायगड येथील गट नंबर २/२/ड, एकूण क्षेत्र ०-१३-४० हे.आर., आकार २ ९४ रू.पै. या मिळकतीपैकी क्षेत्र ०-०२-१४ हे. आर., आकार ०.४९ रू.पैसे ही मिळकत (तद्नंतर सदर जाहीर नोटीशीत ''सदर मिळकत'' असा उल्लेख केलेला आहे.) मिळकतीचे विद्यमान मालक, अश्विनी अभय राऊत रा. मु. अमर सुहास सीएचएस, ग्रीन पार्क जवळ, सुभाष डेरी रोड, गांधी नगर, डोंबिवली पूर्व, ठाणे ४२१२०१ यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २४/११/२०२५

**(ॲड. संजय द.म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली रापड जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून आमचे अशिल श्री मनोज मोहन कोल्हे यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा चार्ज, ताबेकब्जा, कुलमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचाही हरकत आल्यास आमचे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या रापड जमिन मिळकत मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मौजे :- माले, ता.कर्जत, जि.रायगड येथील मिळकत :-**

| मालकांचे नाव | स.नं./हिस्सा नं. | क्षेत्र: हे.आर.प्रति | आकार |
|---|---|---|---|
| श्री.सतिश सुधाकर मांडावकर | ५१/६ | ०-६६-००<br>पोटखराबा ०-०१-००<br>०-६७-००<br>या मिळकतीपैकी ०-४५-०० गुंठे मिळकतीचे खरेदीखत | ०.७५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता : सदनिका क्रं.१०८,
पहिला मजला, विंग बी, लक्ष्मी अपार्टमेंट
बांधिवली, ता. कर्जत, जि. रायगड.
ठिकाण: कर्जत

सही /-
**ॲड.सुर्यकांत भाऊ मसणे,**
दिनांक : २५/११/२०२५
मो.नं. ९९२२१५५१५३

दिनांक : २५ नोव्हेंबर २०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळिवण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे नालधे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं.. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर.-पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| रिमेशबाबू कल्लारीकांन्डी कुन्नुंमब्रिथ | ६७ | ३/अ | १-६७-५० | १ | ८६ |
| | यापैकी लिहून देणार यांच्या मालकीचे विक्री केलेले क्षेत्र हे ० आर २५ पॉ०० मात्र. | | | | |
| | ६७ | ४ | ०-०८-०० | ० | ०५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- २५/११/२०२५


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जैस्वाल लढला, पण सुदर्शन, जुरेल, पंत मात्र फेल; यान्सनचे बळींचे षटक

# भारतीय संघ ऑलआऊट!

**। गुवाहाटी । प्रतिनिधी ।**

भारत आणि दक्षिण आफ्रिका दुसऱ्या कसोटीचा आज तिसरा दिवस असून भारतीय संघ फलंदाजीला उतरला आहे. दक्षिण आफ्रिकेने प्रथम फलंदाजी करताना ४८९ धावांचा डोंगर उभारला आहे. प्रत्युत्तरात भारतीय संघ २०१ धावांवर सर्वबाद झाला असून द. आफ्रिकेचा संघ दुसऱ्या डावात फलंदाजीला उतरत आहे आणि त्यांच्याकडे २८८ धावांची भक्कम आघाडी आहे. भारतीय संघ गुवाहाटी कसोटीतील पहिल्या डावात ८३.५ षटकांत २०१ धावा करत सर्वबाद झाला. भारताकडून यशस्वी जैस्वालने ४८ धावा, वॉशिंग्टन सुंदरने ४८ धावांची खेळी केली. तर कुलदीपने १३४ चेंडू खेळत १९ धावा केल्या आणि सुंदरला चांगली साथ दिली. त्यामुळे भारताने २०० धावांचा टप्पा गाठला. भारत ऑलआऊट झाल्यानंतर आता दक्षिण आफ्रिका दुसऱ्या डावात फलंदाजीसाठी उतरणार असल्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे.



कुलदीप यादव व सुंदरची उत्कृष्ट भागीदारी तुटल्यानंतर कुलदीपही बाद होत माघारी परतला. कुलदीपने त्याच्या कसोटी कारकिर्दीतील चेंडूंच्या तुलनेत मोठी खेळी केली. कुलदीपने कमालीची डिफेन्स करत १३४ चेंडू खेळला ज्यामध्ये त्याने ३ चौकारांसह १९ धावा केल्या. सध्याच्या घडीला बुमराह व सिराजची जोडी मैदानावर आहे. भारताला आता फॉलोऑन टाळण्यासाठी ८९ धावांची गरज असताना वॉशिंग्टन सुंदर व कुलदीप यादव यांची ७२ धावांची भागीदारी तुटली आहे. हार्मरने सुंदरला झेलबाद करत भारताला मोठा धक्का दिला.

मार्को यान्सनच्या बाऊन्सरवर रवींद्र जडेजा झेलबाद झाला. यान्सनने बाऊन्सर टाकला जो जडेजाच्या खांद्याला लागला, पण खांद्याला लागून तो बॅटला लागल्याने जडेजाला तिसऱ्या पंचांनी झेलबाद दिलं. मार्को यान्सनने ऋषभ पंतनंतर नितीश रेड्डी झेलबाद झाला आहे. मारक्रमने हवेत झेप घेत उत्कृष्ट झेल टिपला आणि यासह नितीश रेड्डी १० धावा करत बाद झाला. यासह भारताने १२० धावांवर सहावी विकेट गमावली. टी ब्रेकनंतर दुसऱ्याच षटकात यान्सनच्या गोलंदाजीवर मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात ऋषभ पंत झेलबाद झाला. यशस्वीनंतर साई सुदर्शन ३५व्या षटकात हार्मरच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला. तर ३६व्या षटकात ध्रुव जुरेल खराब फटका खेळत झेलबाद झाला. यासह भारताला झटपट ४ धक्के बसले.यशस्वी जैस्वालने अर्धशतक केल्यानंतर हार्मरच्या गोलंदाजीवर तो झेलबाद झाला. ५८ धावांवर बाद झाल्याने भारताचे दोन्ही सलामीवीर माघारी परतले.यशस्वी जैस्वालने दक्षिण आफ्रिकेविरूद्ध कसोटीत पहिलं अर्धशतक झळकावलं आहे. यशस्वीने ८५ चेंडूत ६ चौकार व १ षटकारांसह अर्धशतक पूर्ण केलं.

केशव महाराजने ६५ धावांची भागीदारी तोडत केएल राहुलला स्लिपमध्ये झेलबाद केलं आहे. २२व्या षटकात राहुल २२ धावांच्या स्कोअरवर झेलबाद झाला.केएल राहुल यशस्वी जैस्वाल यांनी दुसऱ्या दिवसाच्या खेळाअखेरीस ९ धावा केल्या होत्या. दक्षिण आफ्रिकेच्या शेपटाने दुसऱ्या दिवशी भारतीय गोलंदाजांची चांगलीच शाळा घेतली. सेनुरन मुथुसॅमी २०६ चेंडूत १० चौकार व २ षटकारांच्या मदतीने १०९ धावांची उत्कृष्ट खेळी करत संघाला मजबूत स्थितीत आणलं. मुथुसॅमी व वेरेन यांनी ८८ धावांची भागीदारी केली. तर मुथुसॅमी व मार्को यान्सन यांनी ९७ धावांची भागीदारी रचली. यान्सनने ९१ चेंडूत ६ चौकार व ७ षटकारांच्या मदतीने ९३ धावांची अफलातून खेळी केली. यासह दक्षिण आफ्रिका संघाने १५१ षटकांत ४८९ धावा केल्या. तर भारताकडून पहिल्या डावात कुलदीप यादवने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या. तर जडेजा, बुमराह, सिराज यांनी प्रत्येकी २-२ विकेट्स घेतल्या.

तत्पुर्वी, दक्षिण आफ्रिकेने पहिल्या दोन दिवस फलंदाजी करताना पहिल्या डावात १५.१ षटकात सर्वबाद ४८९ धावा केल्या होत्या. दक्षिण आफ्रिकेकडून सेनुरन मुथुसामीलाने २०६ चेंडूत १०९ धावा केल्या. तसेच मार्को यान्सिनने ९१ चेंडूत ९३ धावा केल्या. याशिवाय ट्रिस्टन स्टब्सने ४९ धावा, तेंबा बावुमाने ४१ धावा आणि काईन वेरेयनने ४५ धावांची खेळी केली. भारताकडून कुलदीप यादवने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या, तर जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज आणि रवींद्र जडेजा यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या.

---

### स्वराज्य क्रिकेट क्लब आयोजित ओव्हरआर्म क्रिकेट स्पर्धा

## आई कनकाई क्रिकेट संघ होडगाव कोंड ठरला सरपंच चषकाचा मानकरी



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील शिव प्रतिष्ठाण ग्रामीण क्रिकेट असोसिएशन माणगाव यांच्या सौजन्याने स्वराज्य क्रिकेट क्लब निळगुण यांनी कै. राहुल पांडुरंग गुगळे यांच्या स्मरणार्थ अल्ताफदादा धनसे मैदान निळगुण फाटा याठिकाणी आयोजित केलेल्या मर्यादित षटकांच्या टेनिस ओव्हरआर्म क्रिकेट स्पर्धेत आई कनकाई क्रिकेट संघ होडगाव कोंड यांनी प्रथम क्रमांक पटकावत हा संघ रोख रुपये १० हजार व आकर्षक सरपंच चषकाचा मानकरी ठरला. या स्पर्धेचे उद्घाटन देगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तथा विद्यमान उपसरपंच दिनेश गुगळे यांच्याहस्ते करण्यात आले.

या स्पर्धेत उपविजेता ठरलेला सोमजाई वीर हनुमान क्रिकेट संघ विंचवली संघास रोख रुपये ७ हजार व आकर्षक चषक, तृतीय क्रमांकाचे विजेते रायगड वारियर क्रिकेट संघ हरवंडी कोंड संघास रोख रुपये ४ हजार व आकर्षक चषक तर चतुर्थ क्रमांकाचे मानकरी ठरले आई सोमजाई क्रिकेट क्लब ढाळघर संघास रोख रुपये ४ हजार व आकर्षक चषक, स्पर्धेतील इतर वैयक्तिक बक्षिसांमध्ये उत्कृष्ट फलंदाज विंचवली संघाचा किरण ढमाले, उत्कृष्ट गोलंदाज विंचवाला संघाचा बंटी चाळके, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक होडगाव कोंड संघाचा अभिनव गोटेकर तर स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडूसाठी दिला जाणारा मालिकावीर बक्षिसासाठी होडगाव कोंड संघाचा अष्टपैलू खेळाडू अल्केश शिगवण यांची निवड करण्यात आली. या सर्वांना उपस्थित मोर्बा विभाग राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष योगेश गुगळे, पांडुरंग गुगळे, निळगुण ग्रामस्थ तसेच स्वराज्य क्रिकेट क्लब निळगुणचे पदाधिकारी व सभासद यांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेचे मराठीतून धावते समालोचन अल्पेश महाडिक यांनी केले तर सुरज पाशिलकर व दर्शन सत्वे यांनी पंचांची भूमिका निभावली. सदर स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विशाल गुगळे, विजय जुमारे, मयूर गुगळे, मनीष गुगळे, विक्रांत गुगळे, दक्षत गुगळे, संदेश जुमारे, निलेश गुगळे यांच्यासह स्वराज्य क्रिकेट क्लब निळगुणचे सर्व पदाधिकारी व सभासद तसेच निळगुण ग्रामस्थ यांनी स्पर्धा उत्साहात पार पाडली.

---

## निवडक

### ठाण्यात रंगणार कबड्डीचा थरार

**पाली/बेणसे :** ठाण्यातील सुधागड तालुका रहिवाशांच्या सेवेसाठी कार्यरत असणाऱ्या सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ ठाणे या संस्थेच्या विद्यमाने संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त रविवारी (दि.२१) सुधागड तालुका स्तरीय कबड्डी सामन्याचे आयोजन श्री मावळी मंडळ मैदान, चरई, ठाणे येथे करण्यात आलं आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सुधागड तालुक्यातील संघांनी ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत प्रवेश फॉर्म पूर्ण भरून संस्थेच्या कार्यालयात सायंकाळी ६:३० ते ९ या वेळेत जमा करावे, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष विठ्ठल घाडगे यांनी केले आहे. दरम्यान, सोमवार १ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता सहभागी संघाचे लॉट्स काढण्यात येतील लॉटस काढण्यासाठी प्रत्येक संघाचा प्रतिनिधी उपस्थित असणे आवश्यक आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी संघ प्रवेश फी रूपये ५०० आहे. स्पर्धेचे प्रवेश अर्ज घेण्यासाठी व अधिक माहितीसाठी संस्थेचे क्रीडा समितीप्रमुख राकेश थोरवे (९९८७००२८२९) यांच्याशी संपर्क साधावा.

### भारत १३३ व्या स्थानावर घसरला

**नवी दिल्ली :** क्रिकेटमध्ये भारत जगातील अव्वल संघांपैकी एक आहे, परंतु फिफा फुटबॉल रँकिंगमध्ये टीम इंडियाला मोठे नुकसान सहन करावे लागले आहे. गुरुवारी फिफाने ताज्या रँकिंग जाहीर केल्या, ज्यामध्ये भारत १३३ व्या स्थानावर घसरला, जो गेल्या ८ वर्षातील भारतीय फुटबॉल संघासाठी सर्वात वाईट रँकिंग आहे. यापूर्वी २०१७-२०१७ हंगामात भारतीय संघ १३० व्या स्थानावरून खाली घसरला होता. रँकिंगमध्ये या पराभवाचे एक मुख्य कारण म्हणजे २०२५ मध्ये भारताने एकही आंतरराष्ट्रीय सामना खेळलेला नाही. भारतीय फुटबॉल संघ आधी १२७ व्या क्रमांकावर होता, पण आता २०२५ मध्ये खराब कामगिरीचे परिणाम भोगावे लागत आहेत. टीम इंडिया ७ स्थानांनी घसरून १३३ व्या स्थानावर आली आहे. २०२५ मध्ये भारताने आतापर्यंत एकूण ४ आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत, त्यापैकी तीन वेळा त्यांना पराभव पत्करावा लागला आणि एक सामना अनिर्णित राहिला. भारताने हे चार सामने खालच्या क्रमांकाच्या संघांविरुद्ध खेळले हे देखील खूप दुर्दैवी होते.भारत आणि बांगलादेश यांच्यातील सामना अनिर्णित राहिल्याने भारतीय संघाबद्दल सर्वाधिक प्रश्न उपस्थित झाले. त्या सामन्यात भारताने एकही गोल केला नाही. त्यामुळे संघाच्या फॉर्मवर प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ लागले. भारतीय संघाने १९९६ मध्ये ९४ व्या स्थानावर पोहोचून आपले सर्वोत्तम रँकिंग मिळवले. भारतीय संघ फिफा क्रमवारीत १३३ व्या स्थानावर आहे, परंतु त्याचा शेजारी पाकिस्तान खूपच वाईट आहे. पाकिस्तान रँकिंगच्या टॉप-२०० मध्ये नाही.

### पंतची निष्काळजी; चाहते नाराज

**नवी दिल्ली :** कर्णधार ऋषभ पंत हा टीम इंडियाचा सर्वात अनुभवी आणि महत्त्वाचा खेळाडू आहे. त्यामुळे जेव्हा संघ विकेट गमावत होता तेव्हा तो जबाबदारीने फलंदाजी करेल अशी अपेक्षा होती. तथापि, खराब शॉटमुळे तो बाद झाल्यानंतर चाहते त्याच्यावर संतापले आहेत. शुभमन गिलच्या अनुपस्थितीत, ऋषभ पंतवर एक महत्त्वाची जबाबदारी होती. पंत फलंदाजीसाठी आला तेव्हा टीम इंडिया बॅकफूटवर होती. पंतने लगेचच षटकार मारला, जो दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पुनरागमनासाठी त्याच्या तयारीचा संकेत होता. ३८ व्या षटकात, ऋषभ पंतने मार्को जॅन्सेनच्या चेंडूवर फॉरवर्ड शॉट मारण्याचा प्रयत्न केला, परंतु चेंडू यष्टीरक्षकाच्या ग्लोव्हजमध्ये गेला. पंत त्यावेळी सावध असायला हवा होता, पण त्याने एक बेजबाबदार शॉट खेळला आणि बाद झाला. कर्णधार असूनही, पंतच्या स्वतःच्या कृती चाहत्यांना आवडत नाहीत. या कारणामुळे सोशल मीडियावर त्याच्यावर जोरदार टीका होत आहे. चाहत्यांच्या काही संतप्त प्रतिक्रिया तुम्ही खाली पाहू शकता. ऋषभ पंत ७ धावांवर बाद झाला. पंत, तू मला निराश केलेस. मला तुझ्याकडून अशा खेळीची अपेक्षा नव्हती. ऋषभ पंत आधी कर्णधार म्हणून आणि आता फलंदाज म्हणून अपयशी ठरला. तो बेजबाबदार शॉट खेळत बाद झाला. पंत कधीही ट्रॅव्हिस हेड होणार नाही.आता ऋषभ पंत ध्रुव जुरेलच्या मदतीला धावला आहे. त्याने जुरेलपेक्षाही वाईट शॉट खेळला, असे चाहत्यांनी सुनावले आहे.

---

## हृदयविकाराच्या झटक्याने फुटबॉलर मैदानातच कोसळला

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

मैदानात फुटबॉल खेळत असताना हृदयविकाराचा झटका येऊन एका १४ वर्षीय मुलाचा मैदानातच मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात ही दुर्दैवी घटना घडली असून मुलाच्या अकाली निधनामुळे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.१४ वर्षीय मोहम्मद फैजलला फुटबॉलची प्रचंड आवड होती. त्यामुळे फुटबॉल खेळण्यासाठी तो नेहमी मैदानात जात असे. सकाळी नेहमी प्रमाणे तो सुकमा येथील छिंदगड मैदानामध्ये खेळण्यासाठी गेला होता. परंतू वॉर्मअप सुरू करत असतानाच तो मैदानात कोसळला.

---

## गोमाशी कबड्डी स्पर्धेत नागशेतची बाजी

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

श्री सोमजाई क्रीडा मंडळ गोमाशी यांच्या वतीने आणि सुधागड तालुका स्पोर्ट्स असोसिएशनच्या मान्यतेने तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे भव्य दिव्य आयोजन गोमाशी येथे करण्यात आले होते.



या स्पर्धेत तालुक्यातील नामवंत संघानी आपला प्रवेश नोंदविला होता.या कबड्डी स्पर्धेसाठी क्रीडाप्रेमींनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. या स्पर्धेचे देखणे नियोजन या मंडळाच्या वतीने करण्यात आले होते. तसेच सर्व खेळाडू आणि क्रीडारसिकांना भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. या स्पर्धेतील अंतिम लढत भैरवनाथ नागशेत विरुद्ध कालभैरव भार्जे या संघात झाली. स्पर्धेच्या अंतिम लढतीत नागशेत हा संघ अविकांत साळुंकेच्या मार्गदर्शनाखाली विजयी झाला. या संघास रोख रक्कम १५ हजार व आकर्षक चषक तर द्वितीय क्रमांक भार्जे या संघास १० हजार व आकर्षक चषक, तृतीय क्रमांक चिवे तर चतुर्थ क्रमांक रणधुरंदर पाली या संघांना प्रत्येकी ७ हजार व आकर्षक चषक देऊन मंडळाच्या वतीने गौरविण्यात आले.

या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू राज बेलोसे, सर्वोत्कृष्ट चढाई दिपेश भोय, उत्कृष्ट पक्कड शुभम शिंदे, पब्लिक हिरो स्वप्निल भिलारे या सर्व खेळाडूंना मंडळाच्या वतीने आकर्षक बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. या सर्व स्पर्धेचे धावते समालोचन साहिल खैरे यांनी केले.

---

## सलग दुसऱ्यांदा भारतीय महिला अंतिम फेरीत

### कबड्डी विश्वचषकात इराणवर चुरशीच्या लढतीत विजय

**। पुणे । प्रतिनिधी ।**

निर्णायक क्षणी संजू देवीने केलेल्या चमकदार कामगिरीच्या जोरावर भारतीय संघाने रविवारी पारंपरिक प्रतिस्पर्धी इराणवर ३३-२१ अशी मात करून सलग दुसऱ्यांदा महिला विश्वचषक कबड्डी स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. विजेतेपदासाठी भारताची गाठ चायनीज तैपेइशी पडणार आहे.

सोनाली शिंगटे, पुष्पा आणि कमालीच्या लयीत असलेल्या संजूच्या पकडी करत इराणच्या बचाव फळीने भारतीय संघासमोर आव्हान उभे केले होते. त्यामुळेच मध्यंतराला भारताला केवळ १५-११ अशी चारच गुणांची आघाडी मिळवता आली. उत्तरार्धात भारतीय महिलांनी सर्व प्रथम इराणवर लोण चढवत आघाडी २७-१७ अशी भक्कम केली. यावेळी संजूची चढाई निर्णायक ठरली. एका अव्वल पकडीसह तीन वेळा बाद झालेल्या संजूने या वेळी तीन बचावपटूंचे प्रयत्न शिताफीने परतवून लावत इराणचे दोन गडी टिपले आणि त्यानंतर भारतीय बचाव फळीने इराणच्या खेळाडूची पकड करत लोण पूर्ण केला. त्यानंतर सोनाली शिंगटेने बोनसह एक बळी मिळवत दोन गुणांची कमाई केली. संजूने पुन्हा एकदा आपल्या चढाईत दोन गुण मिळवत भारताची आघाडी कायम राखली.

---

## कराटे बेल्ट परीक्षेत मुलींची उल्लेखनीय कामगिरी

**। खरोशी । वार्ताहर ।**

आजच्या आधुनिक युगात मुलींना फॅशन, ब्युटी, डिझायनिंग यांसोबतच स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देणे अत्यावश्यक बनले आहे. नाशिकमधील मालेगाव, डोंगराळे गावातील लहान मुलीवरील अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर मुलींना सक्षम बनविण्याची गरज अधिक प्रकर्षाने समोर येत आहे.याच अनुषंगाने पाणदिवे येथील पुंडलिक रामा पाटील शाळेत गोशिंन रियु कराटे असोसिएशनतर्फे कराटे बेल्ट परीक्षा पार पडली.या परीक्षेत उरण तालुक्यातील ५ ते १७ वर्ष वयोगटातील ११ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.



विद्यार्थ्यांना काता, कुमिते, टेक्निक्स आदी स्वसंरक्षण कलांचे प्रशिक्षण देण्यात आले होते. क्षमतेनुसार विद्यार्थ्यांना बेल्ट प्रदान करण्यात आले. यलो बेल्ट प्राप्त करणाऱ्यांमध्ये स्वरा म्हात्रे, विश्रुत गावंड, तोफिक अली, पर्जन्य म्हात्रे आणि प्रार्थना ठाकूर यांचा समावेश आहे. साक्षी पाटील आणि निशा पाटील यांनी ऑरेंज बेल्ट मिळवला. आद्या ठाकूर व सृजा गावंड यांनी ग्रीन बेल्ट तर वेदा नवनीत पाटील हिला पर्पल बेल्ट देण्यात आला. रुद्र मोहन ठाकूर याला ब्राउन-४ बेल्ट प्रदान करण्यात आला. परीक्षेसाठी असोसिएशनचे इंडिया अध्यक्ष सिहान राजू कोळी, तसेच सेन्साई गोपाळ म्हात्रे, शंपाय भूषण म्हात्रे आणि शंपाय राकेश म्हात्रे उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना कराटे स्पर्धांमधील संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मुली आणि मुले कराटेमार्फत आत्मविश्वास, शिस्त आणि स्वसंरक्षण या गुणांचे बळकटीकरण करत असल्याने सुरक्षिततेकडे महत्त्वाचे पाऊल टाकले जात असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

---

## अंध महिला विश्वचषकात चमकली सोलापूरची गंगा कदम



**। सोलापूर । वृत्तसंस्था ।**

अंध महिलांच्या विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारताने नेपाळचा पराभव करत अजिंक्यपद पटकावले आहे. या विश्वचषक स्पर्धेत सोलापूरच्या गंगा कदम हिने अष्टपैलू कामगिरी करत भारतीय संघाला अंतिम सामन्यापर्यंत पोचवण्यात सिंहाचा वाटा उचलला आहे.

गंगा कदम हिचे वडील सालगडी म्हणून राबतात. गंगा कदम हिने तीन गडी बाद केले. याशिवाय तिने सहा फलंदाज धावबाद केले. पहिल्याच सामन्यात तिने सामनावीराचा पुरस्कार पटकावला होता. विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात गंगाने सलामीला फलंदाजी करत येत ३१ चेंडूत ३ चौकारांच्या सहाय्याने नाबाद ४१ धावा केल्या. तसेच २ षटकांमध्ये ५ धावा दिल्या व एक षटक निर्धाव टाकले. हीच कामगिरी भारतीय संघाला विजेतेपदापर्यंत घेऊन गेली. भारताच्या विश्वचषक विजयात माझी शिष्य असलेल्या गंगा कदमचा बहुमूल्य वाटा आहे. एक प्रशिक्षक म्हणून तिच्या माध्यमातून विश्वचषक जिंकण्याची स्वप्नपूर्ती झाल्याचा आनंद मला आहे, असे प्रशिक्षक राजू शेळके यांनी सांगितले.

---

## बाबरची कोहलीच्या विक्रमाशी बरोबरी

**। लाहोर । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तानचा बाबर आझम याने आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये रोहितचा रेकॉर्ड मोडल्यावर आता कोहलीच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे. पाकिस्तानच्या मैदानात सुरु असलेल्या तिरंगी टी-२० मालिकेत बाबर आझमने झिम्बाब्वे विरुद्धच्या सामन्यात अर्धशतकी खेळीसह विराट कोहलीच्या रेकॉर्डची बरोबरी साधली. आणखी एका अर्धशतकासह तो रोहित पाठोपाठ आता विराट कोहलीला मागे टाकण्याच्या उंबरठ्यावर आहे. टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक अर्धशतकाचा विक्रम हा विराट कोहलीच्या नावे आहे. किंग कोहलीनं छोट्या फॉर्मॅटमध्ये ३८ अर्धशतके झळकावली आहेत.

---

## सलमान अलीने मोडला द्रविडचा विक्रम!

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तान आणि झिम्बाब्वे यांच्यात झालेल्या टी-२० सामन्यात पाकिस्तान टी-२० संघाचा कर्णधार सलमान अली आघाने खास कामगिरी केली आहे. सलमान अली खानने एका कॅलेंडर वर्षात सर्वाधिक आंतरराष्ट्रीय सामने खेळण्याचा विक्रम त्याने आपल्या नावावर केला आहे. या बाबतीत राहुल द्रविडला मागे सोडले आहे. हा सामना सलमान अली आघाचा वर्षातील ५४ वा आंतरराष्ट्रीय सामना होता. राहुल द्रविडने एका वर्षात सर्वाधिक सामने खेळण्याची किमया साधली आहे. त्याने १९९९ मध्ये ५३ सामने खेळण्याची कामगिरी केली आहे. मोहम्मद युसूफने ५३ सामने खेळले होते तर धोनीने ५३ सामने खेळले होते.

---

### रांचीच्या मैदानात मालिकेतील पहिला सामना | भारताची नंबर वन जोडी बनणार

## रोहित-विराट मिळून रचणार नवा इतिहास!

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाचा माजी कर्णधार आणि हिटमॅन रोहित शर्मा आणि रनमशिन विराट कोहली पुन्हा एकदा मैदान गाजवण्यासाठी सज्ज आहेत. रांचीच्या मैदानात या मालिकेतील पहिला सामना रंगणार आहे. या सामन्यात मैदानात उतरताच रोहित शर्मा आणि विराट कोहली ही जोडी इतिहास रचेल.



रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी आतापर्यंत ३९१ आंतरराष्ट्रीय सामने एकत्र खेळले आहेत. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात ही जोडी भारताकडून सर्वाधिक सामने खेळण्याचा सचिन तेंडुलकर आणि राहुल द्रविड या जोडीचा विक्रम मोडीत काढतील. सचिन-द्रविड या जोडीनं आपल्या मोठ्या कारकिर्दीत ३९१ आंतरराष्ट्रीय सामने एकत्र खेळल्याचा रेकॉर्ड आहे.

रोहित शर्मा आणि विराट कोहली दोघांनीही टी-२० पाठोपाठ कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ते फक्त आता वनडेतच सक्रीय आहेत. ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील वनडे मालिकेतील अखेरच्या सामन्यात दोघांचा जलवा पाहायला मिळाला होता. आता रांचीच्या मैदानात एकत्र मैदानात उतरताच रोहित-विराट भारताकडून सर्वाधिक सामने खेळणारी भारताची नंबर वन जोडी बनेल.

**भारताकडून सर्वाधिक आंतरराष्ट्रीय सामने खेळणाऱ्या जोड्या**

३९१ - रोहित-विराट - सचिन-द्रविड - द्रविड-गांगुली
३६७ - सचिन-कुंबळे
३४१ - सचिन-गांगुली
३०९ - कोहली-जडेजा
२९३ - सचिन-अझरुद्दीन
२८५ - कोहली-धोनी

**भारत-दक्षिण आफ्रिका वनडे मालिकेचे वेळापत्रक**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिला एकदिवसीय सामना ३० नोव्हेंबरला रांचीच्या मैदानात खेळवण्यात येईल. त्यानं दोन्ही संघ ३ डिसेंबरला रायपूरच्या मैदानात दुसरा सामना खेळताना दिसली. ६ डिसेंबरला विशाखापट्टणमच्या मैदानातून या दौऱ्याची सांगता होणार आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)